# पंडिता रमाबाई यांचा इंग्लंडचा प्रवास

लेखिका: पंडिता रमाबाई



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# पंडिता रमाबाई

— भाग १—

## इंग्लंडचा प्रवास

लेखिका — पंडिता रमाबाई

— भाग २—

## जीवन चरित्र

लेखक — द्वारकानाथ गोविंद वैद्य

संपादक

सुबोध पत्रिका

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

द्वितीयावृत्ती—डिसेंबर, १९८८.

प्रकाशक — सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई — ४०० ०३२

© — प्रकाशकाधीन

मुद्रक — व्यवस्थापक
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ग्रंथागार व टंकलेखन यंत्र शाळा,
ताराबाई पार्क, कोल्हापूर — ४१६ ००३

किंमत : रु. 21 — 00

## अनुक्रमणिका

# निवेदन

पंडिता रमाबाई यांनी आपल्या इंग्लंडच्या प्रवासाचे वर्णन त्यांचे एक मित्र श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांना पत्राच्या रुपाने लिहून कळविले होते. ते अनेक वर्षांपूर्वी प्रसिद्धपण झाले. शिवाय या पत्रासोबत श्री. वैद्य यांनी पंडिता रमाबाई यांचे अल्पसे चरित्रही जोडले होते. हे पुस्तक दुर्मिळ आहे. पंडिता रमाबाई मुक्ती मिशनकडून हे पुस्तक आम्हाला मिळवता आले आणि आज ते मंडळाच्या वतीने पुनश्च प्रकाशित होत आहे. त्यामुळे इतिहासाची काही जुनी पाने नवीन पिढीला कळावीत.

४२, यशोधन,
मुंबई – ४०० ०२०
दिनांक :१ मार्च, १९८८.

**सुरेंद्र बारलिंगे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

# सूचना

ही हकीकत पंडिताबाई ह्यांनी येथील आपल्या एका मित्रास लिहून कळविली ती त्याने पंडिताबाईंच्या परवानगीने पुस्तकरूपाने छापिली आहे. ह्या पुस्तकाचा छापण्याचा खर्च भागता, काही पैसा राहिल्यास तो पंडिताबाईंच्या विद्याभ्यासाच्या साह्यार्थ त्यांजकडे पाठवावा असा त्याचा निश्चय आहे. याकरिता बाईंच्या सर्व हितचिंतकांकडून ह्या पुस्तकास आश्रय मिळेल अशी त्यास पूर्ण आशा आहे.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ४

सूचना ........ ५

भाग पहीला

१. पत्र ........ ८

भाग दुसरा

१. महाराष्ट्रात येण्यापूर्वी ........ २६

भाग तिसरा

१. पूर्ववृत्त ........ ३२

२. पुण्यास आल्यानंतर ........ ३९

३. रमाबाईंचे पुढील कार्य ........ ४३

भाग पहिला

# इंग्लंडचा प्रवास

अनुक्रमणिका

# १.पत्र

सेंट मेरीज होम, वांटेज बर्कशायर, इंग्लंड

प्रिय बांधव,

काल दोन प्रहरी आपले पत्र पोहोचले. पत्र पहाताच मनाची कशी स्थिती झाली हे मी लिहून कळविण्यास असमर्थ आहे. ही माझ्या मनाची स्थिती माझ्यासारखे जे कोणी दीर्घप्रवासी आणि स्वजनांपासून चिरवियुक्त मनुष्य असेल त्याच्याच ध्यानात येण्याजोगी आहे; दुसऱ्या कोणासही हिचा अनुभव होणार नाही. कारण ज्याला कधी काटा बोचला नाही त्याला काटा बोचल्याने काय होते हे कसे कळणार? परंतु मला वाटते की माझ्यासारखे सुखी मनुष्यही या जगात फार कमी असेल. कारण मला जितके सुखाचे स्वरूप समजते तितके दुसऱ्याला समजत नाही असे मला वाटते (त्यावरून मला तुम्ही अभिमानीनी समजू नका) कारण ज्या मनुष्याने पुष्कळ दुःखे पाहिलेली असतात त्यालाच सुखाची किंमत काय ती समजत असते. ज्याने सुखातच दिवस घालविले त्याला सुख काय ते नीट कळत नाही. मी आजन्म वनवासिनी आहे आणि पुष्कळ दुःखेही पाहिली आहेत म्हणून मला थोडेसे सुख झाले तरी त्याचा पूर्ण अनुभव घेण्याची शक्ती देवाने दिली आहे. कोणीही आपल्यास दुःख किंवा विपत्ति असावी असे इच्छित नाही हे खरे. पण माझी गोष्ट तशी नाही. एकदा पांडवांच्या मातुश्रीने जसे म्हटले होते तसे मी ईश्वराला म्हणते "विपदः संतु नः शाश्वत तत्र तत्र जगत्पते!" म्हणजे हे जगत्पते! तू मला सर्वदा व सर्व स्थळी विपत्तीतच ठेव. कारण मला यांतच सुख आहे.

आपल्याला असे वाटेल, ही एवढी प्रस्तावना कशाची? ही प्रस्तावना एका नाटकाची आहे. या नाटकाचा एक अंक आपल्या [ पंडिताबाईंचे जन्मचरित्र मागे सुबोध पत्रिकेत छापले होते.]सुबोध पत्रिकेत आला आहे. दुसरा अंक तसाच राहिला आहे. [त्यांची या देशातील प्रवासाची हकीकत.] तो आताच प्रसिद्ध होईलसे वाटत नाही. पुढे एखाद्या वेळी होईल. हा तिसरा अंक आहे. त्याचीच ही प्रस्तावना. हा अंक सुमारे ७ – ८ वर्षे पर्यन्त संपावयाचा नाही. असे माझे अनुमान आहे; परंतु मनुष्याचे अनुमान सर्व काळी खरेच ठरते असे नाही. ईश्वरेच्छा काय असेल ती खरी.

मनुष्य जीवन हे एक नाटक आहे आणि हेच खरे नाटक. नाटकगृहात जी नाटके करतात ती सोंगेच होत. त्यांच्यात खरेपणा काही नसतो. ज्यास नाटके पहाण्याची फार आवड आहे त्यांनी आपापली जीवनरूपी नाटके पहावी अशी त्यांस माझी शिफारस आहे. खऱ्या गोष्टींचा अनुभव नसला तरी नुसती सोंगे पाहत काही फळ नाही आणि जर तो असेल तर सोंगे पहाण्याचीही काही आवश्यकता नाही.

मी तुम्हास सुमारे एक वर्षापूर्वी कळविले होते की, काही दिवसांनी माझा युरोपात प्रवास करण्याचा विचार आहे. त्याप्रमाणे गेल्या एप्रिल महिन्याच्या विसाव्या तारखेस सायंकाळी सुमारे ४ वाजता मी मुंबईहून "बुखारा" नावाच्या आगबोटीतून इंग्लंडकडे रवाना झाले हे तुम्हाला माहीतच आहे. माझे या वेळेस इकडे येणे हे मोठे साहस किंवा (तुमच्या मते) मोठ्या चुकीचे आहे. तुम्ही त्याची पुष्कळ कारणे दाखविलीत आणि एका पक्षी ती म्हणजे खोटी आहेत असे नाही तरी कित्येक लोकांनी गैरसमजुतीमुळे किंवा आपल्या प्रकृतीप्रमाणे माझ्या इकडे येण्याचे उद्देश नाना तऱ्हेचे कल्पून घेतले. ही गोष्ट खरोखरच मोठी दुःखास्पद

आहे. असो. माझ्या मित्रमंडळींच्या सांगण्यावरून म्हणा किंवा सवड नव्हती म्हणून म्हणा एकदा माझा बेत रहित झाल्यासारखा झाला होता. परंतु तो अगदी अनिश्चित होता. तसे होण्याचे कारण एवढेच की या नवीन देशात कोठेही ओळख नसून इकडे आल्यावर मी राहावे कोठे याची व्यवस्था होण्यापूर्वी एकदम आपला देश सोडण्याचे मला बरे वाटले नाही. मी इकडे येण्याच्या पूर्वी माझ्या कित्येक मित्रमंडळींच्या द्वारे या देशात कोठे तरी माझी राहाण्याची सोय होईल किंवा नाही याबद्दल शोध करविला होता. त्यावरून असे समजले की जाण्यायेण्याचे भाडे शिवाय करून सुमारे ४६०० रुपये हातात असले तर सुमारे दोन वर्षे एक मनुष्य या देशात राहू शकेल. मी तर जाणूनबुजून लक्ष्मीची कन्या आणि माझे नावसुद्धा रमा! मग काय पुसता? चिंतामणी माझा भाऊ! मला कशाचीच उणीव नाही! फक्त एकाच गोष्टीची काय ती उणीव!! अशा स्थितीत इंग्लंडचा प्रवास करणे माझ्यापक्षी केवळ आकाश पुष्पवत आहे असे मला वाटले. तरी मी प्रयत्नात काही कसर केली नाही. पुण्यात असता काही प्रसंगाने माझा आणि सेंट मेरीज होममधील सिस्टर सुपीरियर [ख्रिस्ती लोकांच्या एका पंथात स्त्रिया व पुरुष आजन्म अविवाहित राहून धर्मप्रचाराचे काम करतात. ह्यातील स्त्रियांस सिस्टर्स (बहिणी) असे म्हणतात. एका मठात जितक्या सिस्टर्स राहतात त्यांत एक मुख्य असते तिला सुपीरियर म्हणजे प्रमुख असे म्हणतात.] हिचा परिचय झाला होता त्याचप्रमाणे आणखीही कित्येक युरोपियन स्त्रियांशी माझा बराच स्नेह जमला होता, म्हणून मी त्यांच्या जवळही सदरहू शोध केला. त्यांपैकी कितीएकीने अगदी निराशा केली. कितीएक म्हणाल्या तुम्ही ख्रिश्चन असता तर काही सोय झाली असती. कोणी म्हणाल्या आमच्या एथे अगोदर उमेदवारी करा, पुढे पहाता येईल. एका बाईने लंडनहून मला लिहून कळविले की तुम्ही एकटीच (मुलीला हिंदुस्थानात ठेवून) साहा महिन्यांकरिता इकडे या पुढे तुमची काही एथे रहाण्याची तजवीज झाली तर बरेच आहे. नाही तर परत जाल. परंतु तसे करणे अशक्य होते. त्यात मुख्य दोन अडचणी होत्या. पहिली, दोन वर्षांच्या बाळाला सोडून इतक्या दूर येणे; आणि दुसरी केवळ सहा महिन्यांकरिता इकडे येऊन "न धड गाढव न धड ब्रह्मचारी" या म्हणीप्रमाणे होणे. काही दिवसांनी सदरहू सिस्टर सुपीरियरकडून मला निरोप कळला की एथे आले असता त्यांच्या ज्या पुष्कळ सिस्टर्स हिंदुस्थानात जाणार आहेत. त्यास मराठी शिकण्याची जरुरी असून ते काम जर मी पत्करिले तर त्या माझा खर्च (खाण्यापिण्याचा) चालवितील. आणि मला इंग्रजी शिक्षणही देतील. एक सिस्टर काही दिवसांपूर्वी हिंदुस्थानातून हवा बदलण्याकरिता आली होती ती माझी परिचित असून तिला माझी बरीच माहिती होती. सिस्टर सुपीरियरने असे सुचविल्यावर मी त्यांस सांगून पाठविले की, त्यांनी जो माझा खर्च चालविण्याचा पत्कर घेतला तो निःस्वार्थ असावा (म्हणजे पुढे मला आभारी करून ख्रिश्चन करण्याच्या आशेने किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या मतलबाने असू नये.) तरच मी त्यांच्या मंडळीपाशी रहाण्यास जाईन, नाही पेक्षा जाणार नाही. हे माझे म्हणणे त्यांनी कबूल केल्यावर माझे या देशात राहाण्याचे ठिकाण निश्चित करून मी इकडे येण्याची तयारी केली. असो. आता या देशात आताच आले पाहिजे असे मला वाटण्याची कारणे आणि माझ्या हितेच्छु मित्रमंडळीस मी आताच न यावे असे वाटण्याची कारणे यांचा विचार करू. माझ्या मताच्या विरुद्ध जी काही कारणे माझ्या मित्रांनी दाखविली त्यापैकी मुख्य अशी –

१. प्रकृतीची अशक्तता आणि मुलगी लहान आहे (हे सर्वांत सबळ.)

२. इंग्रजी बोलता येत नाही.

३. मी इकडे निघून आल्यावर आर्य महिला समाज वगैरे निद्रा घेऊ लागतील.

४. ख्रिश्चन लोकांच्या सहवासात राहाणे बरोबर नाही.

अनुक्रमणिका

५.	इंग्लंडसारख्या चैनबाजीच्या मुलखात या तरुण वयात येणे बरोबर नाही.

६.	या देशाची मला माहिती नसून इकडे पुष्कळ लबाड लोकांपासून मला अपाय होण्याची भीती आहे.

७.	इंग्लंडला गेल्यावर तिकडच्या वैभवाने डोळे दिपून जातील आणि मग स्वदेश प्रीती अगदी राहाणार नाही.

८.	एका गृहस्थानी तर मला असे सुचविले की, 'अहो इंग्लंडला मिसेस फॉसेट, मिस् म्यॅनिंग सारख्या विद्वान बायांसमोर जाऊन तुम्ही काय बोलणार? तुम्हाला इंग्रजी पुरते समजतसुद्धा नाही!"

९.	दुसऱ्या एका गृहस्थानी म्हटले, "अहो तुम्ही इंग्लंडला जाऊन जी जी ठिकाणे पाहाल त्यांचा इतिहास तुम्हाला माहीत नसला तर त्या पाहाण्यापासून काय फळ होणार? लंडनमध्ये एके ठिकाणी 'क्लिओपाट्राज नीडल' नावाचा खांब आहे तो पाहिलात तर तुम्हाला काय समजणार? [रोमचा कॉन्सल अथवा बादशहा ॲटनी याची बायको क्लिओपाट्रा हिच्या स्मरणार्थ हा खांब उभारलेला होता आणि आहे. तो इजिप्त देशात होता. परंतु इंग्रजांची आणि तुर्कांची लढाई झाली तेव्हा इंग्रजांचा विजय झाला. याच्या स्मरणार्थ तो खांब तेथून उपटून इंग्रजांनी लंडनमध्ये आणून टेम्स नदीच्या किनाऱ्यावर उभा केला आहे. लंडनमध्ये ज्या दिवशी मी पोहोचले त्याच दिवशी गाडीत बसून बिऱ्हाडी जाताना मला ह्या खांबाचे दर्शन झाले. तेव्हा मला वरच्या गोष्टींची आठवण झाली.] अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टी तेथे तुमच्या पाहाण्यात येतील म्हणून तुम्ही आधी सगळे इतिहास पाठ करा. आणखी असे की तुमचे वय अद्यापि लहान आहे. वयोवृद्ध झाले म्हणजे मनुष्यात पुष्कळ वजन येते. तुम्ही आणखी दहा – बारा वर्षांनी तिकडे जा."

१०.	कोणी असे म्हटले की, "तुमचा वैद्यकी शिकण्याचा इरादा आहे तर तुम्ही येथे एक – दोन परीक्षा पास केल्या पाहिजेत. एथे निदान चार वर्षे राहून चांगला अभ्यास करून मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाला म्हणजे मग जा." कोणाच्या मनाचा तर असा समज झाला की माझ्या स्वदेशीय मित्रांवर माझा अगदी विश्वास नसून माझा काय तो भरंवसा सर्व मिशनरी लोकांवरच आहे. इत्यादी.

यावरून माझे इकडे येणे माझ्या वाचून बहुधा कोणासही सयुक्तिक किंवा बरे वाटले नाही ते स्पष्टच आहे. तर मग मला का इकडे यावेसे वाटावे? सदरहू कारणे दाखविणाऱ्या मोठ्या विद्वानापेक्षा माझी बुद्धी अधिक होती असे नाही. परंतु प्रत्येक मनुष्याचा असा स्वभाव असतो की त्याला त्याने काय करावे आणि काय न करावे याचे चांगले ज्ञान आहे असे वाटते. (आणि ते असतेही. उदाहरणार्थ जेव्हा पाप किंवा पुण्य कर्मात मनुष्य प्रवृत्त होतो त्या वेळेस चांगले कोणते आणि वाईट कोणते हे त्याचा विवेक त्याला सांगत असतो. हे सर्वांस माहीत आहे. परंतु सर्वच मनुष्य आपल्या विवेकाला अनुसरून कृत्ये करतात असे नाही.) मीही मनुष्य जातीच्या बाहेर नाही, तेव्हा मलाही तसे वाटणे हे स्वाभाविकच आहे. लोकांच्या मताविरुद्ध माझी जी मते पडली त्याची कारणे अशी –

१. माझी प्रकृति असावी तशी सशक्त नाही तरीही माझी अशक्तता काही रोगमूलक नव्हे. काही कारणावरून गेल्यावर्षी याच दिवसामध्ये मी एका वृद्ध आणि अनुभवी युरोपियन (सिव्हिल सर्जन) डाक्टरास आपली प्रकृति दाखविली होती. त्याने अगदी निश्चयाने सांगितले होते की माझ्या शरिरात कोणत्याही प्रकारचा रोग नसून प्रकृती फार सुदृढ आहे; अशी सुदृढ प्रकृती फारशी लोकांची नसते. याचे कारण माझ्या शरिरातील रक्त मज्जादिक पदार्थांचा अकाली आणि अतिशयित व्यय झालेला नाही. आणि

आज सुमारे ८ वर्षांपासून सतत प्रवासात माझे आयुष्य गेले असून शेकडो ठिकाणचे हवा पाणी माझ्या प्रकृतिला मानवले आहे. आणि सुमारे २००० मैल काही एक वाहन नसता पायांनीच प्रवास केल्याने शीतोष्ण सहिष्णुताही माझ्या अंगी आहे. सतत मित भोजन आणि मिताचार असल्याने सहसा रोग होण्याचे भय नाही. हिमालयासारख्या थंड (जेथे बर्फ पडते) जाग्याची हवा मला मानवली होती तेव्हा इंग्लंडमधील थंड हवा माझ्या प्रकृतिस अपाय करील असे वाटण्यास काही आधार नाही. आता मुलगी लहान आहे आणि तिच्या प्रकृतीला समुद्रातील आणि येथील हवा मानवेल किंवा नाही हा प्रश्न राहिला. मुलीची आई सहा महिन्याची (तान्हे लेकरु) होती तेव्हाच तिची आई – बाप तिला एका वेताच्या पेटाऱ्यात घालून गड्याच्या डोकीवर देऊन प्रवासास निघाली! तेव्हापासून आजपर्यन्त तिच्या कपाळाचा प्रवास चुकला नाही, तेव्हा तिच्या मुलीची प्रकृति नाजूक कोठून होणार? बरे मुलीला तिच्या आईने "सुईवर ठेविली तर मुंगी चावेल आणि अधांतरी ठेविली तर कावळा नेईल" अशी आशंका करून अगदी नाजुकपणाने वाढविली आहे असेही नाही. मुलीचे वय आठ महिन्याचेही पुरते झाले नव्हते तेव्हाच तिची आई तिला घेऊन ऐन उन्हाळ्यामध्ये हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यावरून दुसऱ्या कोपऱ्यापर्यन्त (काचाराहून मद्रास आणि तेथून पुणे-मुंबई वगैरे) प्रवास करून आली आहे या प्रवासात मुलीच्या प्रकृतीचा बराच परिचय झाला आहे त्यावरून तिला एथील हवा मानवणार नाही असे मला वाटत नाही.

२. मी हिंदुस्थानाच्या पुष्कळ देशात फिरले. त्या देशातील भाषा मला कशी ती स्वप्नीसुद्धा माहित नव्हती. त्यांची माहिती नव्हती तरी त्या त्या देशांमधून मला कोणत्याही गोष्टींची अडचण सोसावी लागली नाही. त्या देशात काही दिवस राहिल्यानंतर चोहोकडे एकच भाषा ऐकू येऊ लागल्याने ती शिकण्याचा प्रयत्न करताच ती मला बोलता, लिहिता आणि वाचता येऊ लागली. तशीच इंग्रजी भाषा मला येणार नाही म्हणून कशावरून?

आता ती भाषा आमच्या मुलखा निराळी आहे हे खरे, तरी पहा, मूल जन्मास येते तेव्हा त्याला सर्वच भाषा मुलखा निराळ्या असतात. परंतु लोकांचे बोलणे ऐकून आणि पाहून त्याला भाषा येऊ लागते. इंग्रजी भाषेच्या अभ्यासात मी अगदी तान्हे बाळ आहे असे समजा. इतर मुले जशी बोलण्यास शिकतात तशी मीही शिकेन. आताच मला या देशात आल्याबरोबर मोठी मोठी व्याख्याने द्यावयाची आहेत असे नाही. मी जाणूनबुजून शिकण्याकरिताच या देशात येणार होते. तेव्हा मला ही भाषा येत नाही म्हणून माझी कोणती मोठी अब्रू जाणार होती!!

३. आर्य महिला समाज म्हणजे एके ठिकाणी आहे असे नाही. आणि तो जितक्या ठिकाणी आहे तितक्या ठिकाणी माझा राहण्याचा संभव नाही. कारण मला कृष्णासारखी पुष्कळ रूपे घेऊन सर्व ठिकाणी राहता येत नाही. समाज स्थापन करण्यास लोकांपाशी विनंती करणे हे माझे काम आहे परंतु तो चालू करणे आणि त्याची उन्नती करणे प्रत्येक सभासदाचे काम आहे ते माझ्या हाती नाही. जेथे सदरहू समाज चालविण्यासारखे लोक असतील तेथे तो मी हिंदुस्थानात बसले नसेल तरी चालेल. आणि जेथे तसे लोक नाहीत तेथे एक सोडून हजार रमाबाई असल्या तरी तो चालावयाचा नाही. उदाहरणार्थ अहमदनगरातील आर्य महिला समाज.

४. ख्रिश्चन लोकांच्या सहवासात राहणे का बरोबर नाही हे मला कळत नाही. या देशात ख्रिश्चन नाहीत असे लोक फार विरळा. पाण्यात रहावयाचे झाले तर तेथे कोरडी जमीन कोठून मिळणार? क्वचित एखादे मातीचे डिखळ असले तरी तेही भिजलेलेच असावयाचे. ज्याला समुद्रातच उडी टाकावयाची त्याने

थंडीला भिण्यात काय अर्थ आहे? एक मात्र भय ते हेच की ख्रिश्चन धर्म स्वीकारणे. ते करण्यास मलाही हिंदुस्थानात पुष्कळ ख्रिश्चन लोकांनी उपदेश केलेला आहे. मनुष्याचे मनाचा काही निश्चय नाही असे जर आहे तर त्याला हिंदुस्थान काय आणि इंग्लंड काय? आता मी ज्या ख्रिश्चन लोकांच्या सहवासात आहे त्यांच्या येथे असणे या मंडळीच्या ख्रिश्चनावाचून दुसऱ्या पुष्कळ मंडळीच्या ख्रिश्चन पाद्र्यास बरे वाटत नाही हे मला त्यांनी नीट उघड करून सांगितले. आपण हे ध्यानात ठेविले पाहिजे की हिंदुस्थानात जसा एका हिंदुधर्मात शैव, शाक्त, वैष्णव तांत्रिकादी मतभेद असतो तसा एका ख्रिश्चन धर्मातही रोमन कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, ग्रीक चर्च, चर्च ऑफ इंग्लंड, चर्च ऑफ स्कॉटलंड, चर्च ऑफ जर्मनी, मेथॉडिस्ट, युनिटेरियन वगैरे पुष्कळ मतभेद आहेत. त्या मतांमधील लोक एकमेकांचा बराच मत्सर करतात. शैवाला पाहिला म्हणजे वैष्णवाने सचैल स्नान करण्याची जशी हिंदुस्थानात चाल आहे तशीच सदरहू मतानुयायांचीही चाल असते. पण हा मुलूख पडला थंड. येथे घटकोघटकी सचैल स्नान केले की, सर्दी होऊन आयुष्य असतानाच येशू ख्रिस्तासमोर जाऊन "जजमेंट हे " येईतोपर्यंत तिष्ठत बसावे लागेल म्हणून या शहाण्या लोकांनी ती चाल पाडली नसावी. वर सांगितल्याप्रमाणे वेगळ्या वेगळ्या मतांचे पाद्री आणि पाद्रिणी यांनी जेव्हा मला या मंडळीशी संबंध न ठेवण्याविषयी आणि त्यांच्या समाजात जाऊन न राहाण्याविषयी उपदेश केला तेव्हा मी मुकाट्याने त्यांची बोलणी ऐकून मनात म्हटले, "मित्रांनो, मला तुम्ही सर्वच सारखे आहात कोणी लांब, कोणी आखूड, कोणी पांढरे, कोणी तांबडे, कोणी लठ्ठ, कोणी वाळके इतकाच काय तो भेद. पाहू गेले असता सगळे एका लाकडापासून झालेले एका माळेचेच माणी, मी इकडे येण्याच्या आदल्या दिवशी रात्री एका पाद्रीसाहेबांनी येऊन मला इकडे आणि विशेषकरून या मंडळीत न येण्याविषयी पुष्कळ समजावून सांगितले. परंतु माझी सर्व तयारी झालेली होती आणि माझा निश्चय काही केल्या फिरेना. शेवटी त्यांचे उपाय थकले तेव्हा साहेब मनातल्या मनात रागावले आणि मला म्हणाले, "पहा, बाई तुम्ही आता आमचे मत घेतल्यावाचून जात आहात, तुम्हाला तिकडची बोली येत नाही; तुमच्या जवळ पुष्कळ पैसाही नाही; अशा स्थितीत तुमच्यावर जर तेथे काही वाईट प्रसंग आला तर आम्ही काही सहाय्य करणार नाही. कारण तुम्ही आमचे ऐकत नाही." वास्तविक असे म्हणण्याचा त्यास काहीच अधिकार नव्हता; कारण मी कधी कोणत्याही प्रकारचे सहाय्य त्यांच्यापाशी मागितले नव्हते. असो. तरी मी त्यास उत्तर दिले, 'अहो साहेब, तुम्ही मला साह्य केले नाही म्हणून काय झाले? माझा ईश्वर मला साह्य करील. मनुष्याच्याने मनुष्याचे तारण किंवा मारण करवत नाही. जो मनुष्य वाघाच्या तोंडात आहे तो दुसऱ्याला वाघापासून कसे वाचवील? (सदरहू साहेबांनी जसे निष्कारण म्हटले तसेच माझ्या देशबांधवाजवळ इकडे येण्याबद्दल साह्य मागितले तर ते मला म्हणतील या भयास्तव मी कोणाचेही साह्य मागितले नाही कारण मी सर्वांच्या मताविरुद्ध इकडे निघून आले हे उघडच आहे.)

५. इंग्लंडच काय पण याच्यापेक्षा सहस्रपट चैनबाजीच्या मुलखात गेले तरी ज्याला जे करावयाचे नाही, ते त्याच्याने कधीच करवणार नाही. चैनीला तरुण आणि वृद्ध असा विचार नसतो. आमच्या देशात अनुभ्दिन्नश्मश्रु असे पुष्कळ राजासारखे श्रीमंत संन्यासी होऊन गेले आहेत. आणि उद्या ज्यांच्या शरिराची स्मशानात क्रव्यादाग्नीत आहुति पडणार जे "अंग गलितं पलितं मुंडं दशन विहीनं जातं तुंडं, वृद्धो याति गृहीत्वादंडं" या प्रकारचे सशक्त आणि तरुण असे हजारो वृद्ध ८—९ वर्षांच्या मुलींशी लग्ने करून आपले अग्निहोम कायम ठेवितात. [दुसऱ्या बाजीरावानी ६० वर्षांच्या वयात अंध झाल्यावर अग्निहोम कायम ठेवण्याकरिता एका ९—१० वर्षांच्या मुलीशी लग्न केले होते. या बाईसाहेब हल्ली नेपाळात आहेत. कपाळ आमच्या हिंदुस्थानातील बायकांचे! ! बाजीरावसाहेब आमच्या जातीचे राजे असून नात्याने माझे माणूस होते. तरी ते आपले म्हणून त्यांचे दुर्गुण माझे आवडते नाहीत.]

रानात गेल्यावाचून शूराची परीक्षा होत नाही, अभाव वैराग्याला वैरागी अशी संज्ञा देता येत नाही. एखादा पदार्थ आपल्याला मिळत नाही म्हणून त्यावर आपली इच्छा नाही असे दाखविणे किंवा तो नाही

म्हणून आपल्याला तो आवडत नाही म्हणणे हे शुद्ध ढोंग होय. मला या चैनबाजीच्या मुलखातच माझ्या मनाची परिक्षा करावयाची आहे. असो.

६. या देशाची मला माहिती नसली आणि येथे पुष्कळ लबाड लोक असले तरी मला त्याची काय भीती? येथे सर्वच म्हणजे लबाड आहेत असे नाही. मी ज्या स्त्रियांच्या समाजात राहते त्या सर्व स्त्रिया मोठमोठ्या संभावित आणि श्रीमंत घराण्यातील असून विशेषेकरून धर्मार्थ सर्व सोडून संन्यासिनी झालेल्या अशा आहेत. या घरात मोठ्या सभ्य पुरुषासही राहण्याची सक्त मनाई आहे. मग लबाड बायका किंवा पुरुष याचा येथे प्रवेश कोठून होणार? शिवाय पुष्कळ संभावित गृहस्थ व स्त्रिया यांचे येथे येणे जाणे आहे. दुसरे लोक ज्यानी हा समाज पाहिला नाही किंवा ज्यास याची योग्यता कळत नाही ते काही म्हणोत परंतु मला या बायांची सभ्य रीती आणि पवित्र आचरण फार आवडते.

थोड्या दिवसामागे एका ६५ वर्षांच्या गृहस्थाने एका ११ वर्षांच्या मुलीच्या बापाला ३०,००० रु. देऊन तिच्याशी लग्न लावले हे आपल्यास माहीत असेलच. असे पुण्यात्मे आमच्या देशात हजारो आहेत.

७. इंग्लंडातील वैभवाने डोळे दिपून आपल्या जन्मभूमीचा विसर पडणे हे मनुष्य स्वभावाच्याविरुद्ध आहे. आपली आई गरीब असून म्हातारी आहे म्हणून तिला टाकून (किंवा लाथ मारून) दुसऱ्या श्रीमंत तरुण आणि सुस्वरुप बाईला आईप्रमाणे सन्मान देणारे मनुष्य मनुष्यरूपी राक्षस असे म्हटले पाहिजे. अथवा भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे 'ते के न जानीं महे' ते कोण हे (त्यास काय म्हणावे हे) आम्हास माहीत नाही. इंग्लंडात येऊन इकडच्या वैभवाने डोळे दिपून आपल्या जन्मभूमीला तुच्छ मानणारे नरपिशाच्च आमच्या दुर्दैवी मातेच्या पोटी उपजले आहेत यात संशय नाही. परंतु हल्ली तर मला असे वाटते की, माझ्या आईवरची माझी प्रीती कमी होईल अशी पिशाच्चप्रकृति अद्यापि माझ्यात शिरली नाही आणि ईश्वर कृपेने तसे न होवो!

८. मिसेस फॉसेट, मिस् मॅनिंग वगैरे बायांच्या समोर व्याख्याने देण्याकरिताच माझे या देशात येणे आहे असा ज्यांचा समज झाला त्यांस माझे एवढेच उत्तर की, तो दिवस येण्यास अद्यापि ७ – ८ वर्षे विलंब आहे. तेवढ्यात मी कदाचित त्यांच्याशी बोलू शकेन असे होण्याचा संभव आहे आणि जरी तसा दिवस आला तरी त्यांच्या मनात जेवढा उद्देश आला तेवढाच माझा उद्देश नाही. माझा त्याहीपेक्षा मोठा उद्देश एकही अक्षर न बोलता सिद्धीस जाईल, आणि तो जावो, अशी माझी ईश्वरापाशी प्रार्थना आहे. मला मिसेस फॉसेटपुढे बोलण्याची गरजच लागणार नाही.

९. मी जेव्हा कोणते तरी ठिकाण पाहावयास जाईन त्यावेळेसच त्याचा इतिहास मी शिकेन अशी माझी आशा आहे. घरात बसून इतिहास तोंडपाठ केल्याने जेवढे ज्ञान होणार त्यापेक्षा प्रत्यक्ष पाहिल्याचे ज्ञान जास्ती आहे असे माझ्या अल्पबुद्धीला वाटते. वयोवृद्ध झाल्यावर मनुष्यात वजन वाढणे हे अचल. मिचल बाईला पाहिल्याने कोणासही खरे वाटण्याजोगे आहे. एक दिवस सदरहू बाई आणि मी गाडीत बसून फिरावयास गेलो होतो तेव्हा त्या गाडीत बसता क्षणीच गाडी आता मोडते की काय असे मला भय पडले होते! परंतु ईश्वरकृपेने तसे झाले नाही! पण वजन वाढण्याला ज्ञान जितके कारणीभूत आहे तितके वयोवाद्धिक्य आहे असे म्हणणे सर्वांशी खरे ठरत नाही. पुण्यात रस्त्यातून पायी फिरणाऱ्या वामनरावांचे वय ६५ वर्षांपेक्षाही जास्त आहे, परंतु त्यांची प्रकृति पाहिल्या त्रेतायुगातील समानुचर हनुमान मरून हे कलियुगातील वामनराव झाले आहे. असे वाटल्यावाचून राहात नाही.

अनुक्रमणिका

१०. माझा वैद्यकी शिकण्याचा इरादा आहे. परंतु हिंदुस्थानात राहून ४ वर्षांनी मॅट्रिक्युलेशन परीक्षा देऊनही येथे वैद्यकी शिकण्यात तिचा काही एक उपयोग झाला नसता. कारण हिंदुस्थानात बी. ए. परीक्षेपर्यन्त अभ्यास केला तरी लंडन युनिव्हर्सिटीत पुन्हा मॅट्रिक्युलेशन दिल्यावाचून येथील मेडिकल कॉलेजात प्रवेश होत नाही असा कायदा झालेला आहे. हिंदुस्थानात राहून मद्रास मेडिकल कॉलेजात शिकावे तर मला माझ्या देशभगिनींच्या उपयोगी पडण्यास जितके ज्ञान पाहिजे तितके मद्रासमध्ये होत नाही, येथे वैद्यकी शिकून कानांचे वैद्य, दातांचे वैद्य, पोटाचे वैद्य म्हणून ओरडत चूर्ण, अर्क वगैरे देत फिरण्याचाच केवळ माझा इरादा नाही, माझा उद्देश त्यापेक्षाही मोठा आहे. लंडन युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशन परीक्षा हिंदुस्थानातील मॅट्रिक्युलेशन परिक्षेपेक्षा सुलभ आहे. येथे राहून ती परिक्षा १ किंवा २ वर्षांनी मी देऊ शकेन अशी मला उमेद आहे. परंतु हिंदुस्थानात राहून ४ वर्षांनीही मला ही परीक्षा देण्याची शक्ती आली नसती. या देशात हिंदुस्थानापेक्षा अभ्यास जास्त वेळ करता येतो, कारण हा मुलूख थंड असल्याने सतत १२ तास मेहनत केली तरी फारसा थकवा येत नाही. परंतु अशी मेहनत हिंदुस्थानसारख्या उष्ण मुलुखात माझ्यासारख्या मनुष्याच्याने कदापि व्हावयाची नाही आणि येथे पाहून सवरून जितके लवकर ज्ञान होते तितके हिंदुस्थानात असताना कित्येक अनुभवी मित्रांनी सांगितले होते आणि आता तर स्वतःच्या अनुभवावरून समजले. असो.

मला ज्या ज्या कारणांनी हल्लीच या देशात यावेसे वाटले ती मी अनुक्रमाने आपल्यास कळविली. ही सर्व अगदी बिनचूक असतील असे माझे म्हणणे नाही. कारण मनुष्याचे ज्ञान कधीच भ्रमरहित असावयाचे नाही. माझ्या पुष्कळ मित्रांनी मला सुचविले होते की, हिंदुस्थानात राहून एकीकडे स्त्रियांच्या सुधारणेबद्दल होईल तितका प्रयत्न करावा आणि दुसरीकडे आपला अभ्यासही चालू ठेवावा. परंतु मनुष्यप्रकृतिला तशातून माझ्या प्रकृतिला दोन कामे एकदम करण्याचे सामर्थ्य नाही. दोन्ही एकदम करू गेले असता एकही नीट व्हावयाचे नाही असा माझा समज आहे. मी मुंबईहून निघण्याच्या पूर्वी आपण आणि दुसऱ्याही कित्येक माझ्या मित्रांनी आणि मैत्रिणींनी मला माझा बेत रहित करण्याविषयी पत्रे लिहिली होती. परंतु मला त्यावेळेस सवड नसल्याने मला कोणकोणत्या कारणांवरून इकडे यावेसे वाटले हे लिहून कळविता आले नाही. म्हणून मला फार वाईट वाटते. तरी या पत्राच्याद्वारे त्या सर्व पत्रांची उत्तरे आपल्यास पोहोचतील.

आता ज्यास असे वाटले होते की 'माझ्या देशबांधवावर माझा विश्वास नाही आणि ख्रिश्चन लोकच काय ते माझे हितकर्ते असे मी समजते'. त्यास माझे प्रेमपूर्वक असे सांगणे आहे की – प्रिय बांधव, मी आपल्या देशबांधवावर विश्वास ठेवीत नाही असे म्हणण्यास तुम्हास काही एक कारण नाही. इंग्लंडला जर तुम्ही अथवा तुमच्यासारखे दुसरे कोणी असते तर माझी प्रीति कोणावर जास्त आहे हे त्यास समजले असते. माझे हितकर्ते अख्रिश्चन लोकच काय पण सर्व माझे मित्र माझे हितकर्ते आहेत, असे मला वाटते. ज्या मनुष्याचा हितकर्ता सर्वसमर्थ ईश्वर आहे त्याचे हित करण्याची कोणाला बुद्धी येणार नाही? मी कोणाशी शत्रुभावाने वागत नाही. तेव्हा मला कोणी शत्रू होणार नाही. कोणाचे खरे रूप झाकून राहात नाही; हे तुम्हाला माहीत आहे.

मी ज्या दिवशी मुंबईहून रवाना झाले त्या दिवशी माझे पुष्कळ देशबांधव आणि भगिनी मला भेटण्याकरिता आले होते; आणि काही मंडळी तर आगबोटीवर पोहोचण्याकरिता आली होती. माझे एकाएकी निघणे झाले म्हणून मला सवड नसल्याने माझ्या पुष्कळ मित्रांची भेट घेता आली नाही याबद्दल मला फार वाईट वाटते. माझ्या जन्मभूमीचा आणि देशबंधु व भगिनींचा दीर्घ वियोग होतेवेळेस मला परम दुःख व्हावे हे तर स्वाभाविकच आहे. परंतु माझ्याकरिता ज्या कित्येक निःस्वार्थ प्रेमिक बंधु भगिनींच्या

डोळ्यातून अश्रुधारा वाहिल्या त्या निरंतर माझ्या ध्यानात आहेत. त्यावेळेस त्या मनुष्यांस पाहून मला फारच दुःख झाले खरे, परंतु आता त्याच दुःखातून एक अननुभूतपूर्व आणि अनिर्वचनीय सुख उत्पन्न होत आहे. हे वाक्य ऐकून तुम्हाला कदाचित खरे वाटणार नाही. कारण तुम्हाला असा अनुभव नाही. वर प्रस्तावनेत ते मी लिहिले आहे त्याचा संबंध येथे आणून लावा म्हणजे हे वाक्य चांगले जुळेल. मनुष्य हृदय फार हलके असते. तसे ते माझेही आहे. मला वाटते होते, या जगात माझ्यावर खरी प्रीति करणारी मनुष्ये फार कमी आहेत. कारण मी काही कोणाच्या उपयोगी पडत नाही. मग लोकांची प्रीति माझ्यावर कशावरून असणार? बरे, 'जर कोणी तुझ्यावर प्रीति करीत नसले तर तुला तरी कशाला तिची आशा बाळगली पाहिजे? असे मी आपल्यालाच विचारीत होते त्याचे उत्तर हेच येत होते की, कशाला ती आशा पाहिजे. हे मला सांगता येत नाही.' आपण लोकांवर प्रीति करून लोकांपासून प्रीति मिळण्याची इच्छा करणे हा मनुष्याचा (दुसरा कोणाचा नसला तर नसो पण माझा) स्वभाव आहे. आणि स्वभावाला औषध नाही. मला जेव्हा त्या निष्कारण मित्रांची आठवण होते तेव्हा खरोखरच अनिर्वचनीय सुख होते. या जगात काही एक स्वार्थ आणि संबंध नसताना लोकांवर ज्यांची प्रीति असते तेच धन्य आणि तेच सुखी. मनुष्यामध्ये कोठे जर देव शांती असली तर मी तसल्या मनुष्यांसच देव म्हणते. तशा प्रेमिक मनुष्यांचा एक एक अश्रुबिंदू ज्यास निर्मल प्रेमाची किंमत समजते असे मनुष्य स्वर्गसुखाच्या विनिमयानेही घेण्यास मागे घेणार नाही. कारण ती रत्ने अमोलिक होत. अशा निर्मल प्रेम विमलित हृदय मनुष्याच्या अश्रुरत्नमाला ज्याला मिळतात ते मनुष्य किती सुख आणि भाग्यशाली! आहा! जगात सर्वांच्या भाग्यात हे सुख असत नाही म्हणूनच लोक दुःखी असतात, नाही बरे? हिंदुस्थानातून आपल्या देशबंधु आणि भगिनींशी वियुक्त होऊन दीर्घ प्रवासास निघणे अशा प्रकारचे दुःख जर देवाच्या दयेने माझ्यावर आले नसते तर सदरहू सुख मला कोठून आणि कसे मिळाले असते? म्हणूनच मी देवाची प्रार्थना करते –

"विपदः संतुतः शश्वत् तत्र तत्र जगत्पते!" रत्नाकरांतून पहिल्याने हालाहल विष निघून मग सर्व संजीवनकारी अमृत निघाले होते अशी दंतकथा आहे. परंतु माझ्या आयुष्यात पुष्कळ वेळा ही कथा मी प्रत्यक्ष पाहिली. तुम्हीही ध्यानात ठेवा की विषाच्या मागून अमृत येते. सर्व दुःखी मनुष्ये एवढ्याच आशेवर आपले जीवन धारण करतात. ही आशा जर हृदयात जागरूक नसती तर त्याच्याने या दुःखमय जगात क्षणभरसुद्धा राहवले नसते.

तुम्ही आणि दुसरी ही माझी मित्रमंडळी जी मला आगबोटीवर पोहोचविण्याकरिता आली होती ती परत होडीत बसून किनाऱ्यावर चालली आणि एक मित्र होडीत बसून मला भेटण्याकरिता आगबोटीच्या अगदी जवळ येऊन पोहोचले होते इतकेच नव्हे पण त्यानी आगबोटीच्या शिडीवर पायही ठेविला होता; पण इतक्यात आगबोट चालू झाली. अर्थातच त्यास तेथून परत जावे लागले. माझी दृष्टी पोहोचली तो पर्यंत मी परत जाणाऱ्या माझ्या प्रिय जन्मभूमीचा किनारा दिसत होता तो पर्यंत मी डेकवर उभी राहून अतिमेष दृष्टीने त्याच्याकडे पाहात होते. त्यावेळेस माझ्या मनात किती प्रकारच्या कल्पना येत होत्या म्हणून सांगू! असा मनांतील हजारो भावनांचा एकच घोटाळा कधीच झालेला मला आठवत नाही. त्यावेळेस मी जशा अनंत कल्लोळमाला भीषण समुद्रात आगबोटीवर होते, तसाच एक समुद्र माझ्या हृदयात खवळला होता. त्यात किती तरंग वर येत होते आणि परस्परांशी झुंजून पुनः त्या अनंत सागर गर्भात कोठल्या कोठे लीन होऊन जात होते ते मला सांगता येत नाही.

जेव्हा भारत भूमि दिसेनाशी झाली तेव्हा तिला शेवटला नमस्कार करून मी आपल्या आगबोटीतील तळघरात गेले. त्या केबिनात एकावर एक अशी ओळीने एकंदर ६ अंथरुणे असून खोली अगदी लहान

अनुक्रमणिका

होती. त्या सहा अंथरुणांचा अर्थ तेथे सहा मनुष्ये असती तर खरोखरच आम्हाला फार त्रास झाला असता. त्या आगबोटीत लोकांची बरीच गर्दी होती, परंतु दुसरी सर्व माणसे युरोपियन पडली आणि आम्ही हिंदुस्थानच्या “नेटिव्ह”, आमचा वारा लागला तर त्यास विटाळ होईल या भयाने कोणी युरोपियन बाया आमच्या खोलीत राहावयास आल्या नाहीत. ही पुष्कळ युरोपियनांची नेटिव्हाविषयी मत्सर बुद्धी त्यावेळी आमच्या फार पथ्यास पडली. ईश्वराच्या सृष्टीत विषाच्या अंकुराची सृष्टीसुद्धा निरर्थक होत नाही. तिजपासून जगाला काही तरी उपयोग आहेच. तेव्हा त्या खोलीत मी, माझी मैत्रीण आनंदीबाई भगत आणि माझी मुलगी या तिघांचे एकाधिपत्य झाले. खोलीस एकच लहान खिडकी होती. तिच्यावाटे बराच वारा येत असे, परंतु आम्ही आगबोटीच्या ज्या बाजूला होतो त्या बाजूकडून वारा वाहात नव्हता. म्हणून तो आम्हास जितका पाहिजे होता तितका मिळत नसे. खोली चोहोकडून बंद असल्याने दिवसास आणि विशेषेकरून रात्री अतिशय उकाडा होत होता. आम्ही तांबडा समुद्र पार होऊन सुएझच्या कालव्यात पोहोचेपर्यंत या समुद्र प्रवासात ग्रीष्मकाली हिंदुस्थानातील मारवाड किंवा मद्रास इलाख्यात जितकी उष्णता असते त्यापेक्षाही जास्त आहे असे मला वाटते. परंतु हे माझे अनुमान कितपत खरे होते ते मला माहीत नाही. आगबोटीत आमच्या जेवणखाणाची तजवीज इतर लोकांपेक्षा निराळी होती, म्हणजे एका खानसाम्यास ५ – ६ रुपये देऊन आम्ही आमची तजवीज करून देण्याकरिता आपल्या तैनातीत ठेविला होता, तो दररोज आमच्या खोलीतच आम्हाला वाढून आणून देत असे. स्वतः स्वयंपाक करून घेण्याची तजवीज झाली असती. परंतु आगबोटीतील खलाशांच्या स्वयंपाक घरावाचून दुसरे स्वयंपाक करून घेण्यास ठिकाण नव्हते. त्या ठिकाणी चोहोकडे अमंगळ देखावा पाहून माझ्याने तेथे जाववेना सुद्धा. मग स्वयंपाक करण्याची गोष्ट दूरच राहिली. वर सांगितलेला मनुष्य आम्हाला जे आणून देत होता त्याचा आम्ही डोळे झाकून स्वीकार करीत होतो. आणि त्या अगाध समुद्रात देवाने एवढे अन्न दिले त्याबद्दल त्याचे फार फार उपकार मानीत होतो. खाण्याचे पदार्थ म्हटले तर शिजविलेले बटाटे, भात, पाव, जाम (एका प्रकारच्या इंग्रजी फळांचा मुरांबा) मीठ, वाटलेली मोहोरी, मिऱ्याची पूड आणि मुलाकरिता कांडेन्स्ड मिल्क (गोठवून तयार केलेले दूध टिनाच्या डब्यात बंद करून ठेवतात आणि लागेल तेव्हा त्यातून एक – दोन चमचे वाटीभर ऊन पाण्यात कालवून मुलास पाजतात आणि मोठे मनुष्यही चाहाबरोबर त्याचा उपयोग करतात.) इतके पदार्थ मिळत होते. याशिवाय आमच्याबरोबर आम्ही करून घेतलेले आंब्याचे लोणचे, आणि माझ्या एका मित्राने आपल्या घरून लिंबाचे लोणचे दिले होते. त्याच्या योगाने आमच्या जेवणाला बरेच साधन होत असे. परंतु, युरोपियनांच्या चालीचा अर्ध पक्व पुरोडाश (अर्धा शिजलेला भात) जेवणाची आम्हाला सवय नव्हती हे एक, आणि आमच्या चालीच्या भाज्या, वरण कढी वगैरे नसता स्वयंभू अन्न ब्रह्मसेवनाने आमची तृप्ती होईना अथवा आमच्याने पोटभर जेववेना हे दुसरे, या दोन कारणामुळे आगबोटीत २७ दिवस आम्हाला अर्धवट उपवासात काढावे लागले. या प्रसंगी मला माझ्या हिंदुस्थानातील प्रवासात नुसत्या पाण्यावरसुद्धा भूक-तहान भागविण्याची सवय होती. त्यामुळे फारसे कठीण गेले नाही. परंतु माझी मैत्रीण यापूर्वी कधी घराबाहेर निघालेली नव्हती; तिला पराकाष्टेचे कष्ट सोसावे लागले. आमच्या खोलीसमोरच इतर प्रवासी लोकांचे जेवण्याचे ठिकाण होते तेथे ते जेवण्यास ज्यावेळी बसत त्यावेळी मासे, मांस, आणि इतर त्याच्या खाण्याचे पदार्थांच्या दुर्गंधीमुळे (मलाच ती दुर्गंधी वाटत होती परंतु भोजनकारी मनुष्याच्या नाकास ती फार सुगंधी वाटत असेल यात काही संशय नाही!) त्यावेळेस माझ्या नाकाला गंधग्रहण शक्ती नसती तर बरे झाले असते असे वाटत होते. हा माझा समुद्रातील पहिलाच प्रवास नव्हे. या पूर्वी माझे वडील असता दोन-तीनदा मंगरुळपासून मुंबई, मुंबईहून द्वारका आणि तेथून परत मुंबईपर्यंत इतका माझा समुद्र प्रवास झालेला होता, त्यामुळे असो किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाने असो, यावेळेस मला समुद्रातील आजार झाला नाही. दुसऱ्या दिवशी फार उष्णतेच्या योगाने दोनदा उलटी झाली होती आणि मधून मधून थोडे थोडे डोकेही फिरू लागले होते. परंतु आनंदीबाई व दुसरी पुष्कळ मनुष्ये फारच आजारी झाली होती.

बुखारा आगबोटीवर हिंदुस्थानातील माणसे काय ती आम्ही तिघी, एक माझे धर्मबंधू बाबूबंक बिहारी शर्मा आणि एक पारशी तरुण गृहस्थ एवढीच होतो. आम्ही कधी कधी सकाळी किंवा संध्याकाळी डेकच्या एका बाजूवर जमून नाना प्रकारच्या गोष्टी सांगत बसत होतो. युरोपियन समाजाशी आमचा काही संबंध नसणे हे स्वाभाविकच आहे. परंतु एक म्हातारा युरोपियन सभ्य गृहस्थ आमच्याशी फार ममताळूपणाने वागत असे. हा गृहस्थ मँचेस्टर (हे ठिकाण हिंदुस्थानच्या लोकांना चांगलेच माहीत आहे) शहरातील एक व्यापारी होता. तरुण वयात व्यापारामध्ये पुष्कळ पैसा मिळवून या वृद्ध वयात आता त्याने व्यापार करणे सोडून दिले आहे. तो आपल्या घरात निश्चिंतपणे बसून आपल्या राहिलेल्या आयुष्याचा काळ सुखात घालविणार आहे; परंतु याचे सुख आळशीपणाने अंथरुणावर पडून झोपा काढण्याचे नव्हे; तो आज १९ महिन्यापासून प्रवास करीत सगळ्या पृथ्वीची प्रदक्षिणा करून आला. या प्रवासात त्याला सुमारे १००० पौंड खर्च करावा लागला, असे एकदा त्याने मला सांगितले. तो जितक्या ठिकाणी गेला तितक्या ठिकाणची माहिती मिळवून ती त्याने आपल्या स्मरणवहीत (राम राम! येथे नोट बुकात असे लिहावयाचे होते, कारण ‘स्मरणवही’ हा शब्द आमच्या केसरी जनकास पसंत नाही. पण या लेखणीपुढे माझे काय चालणार?) लिहून घेतले आहे आणि प्रसिद्ध प्रसिद्ध ठिकाणच्या देखाव्याची चित्रे (फोटोग्राफ) सर्व मिळून सुमारे सात हजार त्याने विकत घेतली आहेत. त्यापैकी सुमारे १६० हिंदुस्थानातील देखाव्यांची चित्रे त्याने मला दाखविली ती फार मनोरंजक आणि हुबेहुब उतरलेली होती. त्यापैकी पुष्कळ ठिकाणे मी पाहिलेली आहेत. त्यांच्या नावाचे अर्थ आणि त्यांचा इतिहास यांची मला जेवढी माहिती होती तेवढी त्याने विचारून घेतली. या वृद्ध गृहस्थाचा कित्ता आमच्या देशातील विलासप्रिय, आळशी श्रीमंत लोकांनी जर वळविला तर किती बरे लाभ होईल? असो. त्या गृहस्थाला हिंदुस्थानातील कोणतीही बोली येत नव्हती. आणि मी तर इंग्रजीत अरण्यपंडिता! मग काय पाहावे? आमची परस्परांची जेव्हा बोलणी चालत तेव्हा जवळ कोणी युरोपियन मनुष्ये नसत म्हणून बरे होत होते. नाहीतर माझे बोलणे ऐकून त्यांच्याने पोट धरून हसल्यावाचून रहावले नसते! तो गृहस्थ बोले तेवढे मला समजत असे परंतु बरोबर उत्तर देता येत नसे कारण यापूर्वी मला इंग्रजी बोलण्याचा मुळीच अभ्यास नव्हता. काही शब्द व काही संज्ञा मिळून कसा तरी तो माझा आशय समजून घेत असे.

मुंबईहून निघाल्यानंतर २७ दिवसात ४-५ ठिकाणी मात्र आम्हाला भूमीचे दर्शन झाले. एरवी खाली अगाध समुद्र आणि वरती अनंत आकाश आमच्या नजरेस पडत होते. संध्याकाळच्या वेळेस आम्ही जेव्हा डेकवर बसत होतो तेव्हा समुद्राची आणि आकाशाची अपूर्व व अनिर्वचनीय शोभा आणि महत्त्व पाहून माझ्या मनात किती प्रकारचे विचार येत असत हे सांगता येत नाही. एकीकडे सूर्य अस्ताला जात आहे, त्याची सायंकालीन कोमल प्रभा, अनंत नील नभो मंडलात जिकडे तिकडे विशेषेकरून पश्चिमेकडे पसरलेल्या, पिंजलेल्या शुभ्र कापसाच्या ढिगारासारख्या मेघराशींवर प्रतिबिंबित होऊन, आमच्या पुराणातील काल्पनिक सुवर्णगिरी मेरूची शृंगे चोहोकडे समुद्रातून आपली डोकी उचलून आकाशाचे चुंबन घेत आहेत की काय अशी भ्रांति होत असे किंवा समुद्रोदरांत कल्पिलेली कृष्णाची [मी लहान होते तेव्हा आमचे वडील १०/११ महिनेपर्यंत कच्छजवळ असलेल्या द्वारकेत समुद्र किनाऱ्यावर राहिले होते. तेथे कधी कधी संध्याकाळच्या वेळेस समुद्र किनाऱ्यावरील शुभ्र वाळवंटावर आम्ही फिरावयास जात होतो.] सुवर्णद्वारका अथवा रावणाची लंका माझ्यासमोर आहे की काय असे वाटत असे.

सूर्यास्त झाल्यानंतर बंगल्यातील पडतपोशी स्त्रिया जशा हळूच पडदा पलीकडे सारून लोकांस भीत भीत खिडक्यातून डोकावून पहातात आणि पुन्हा झटकन घरात आपले तोंड लपवितात, त्याप्रमाणे वायुवेगाच्या परवश होऊन आकाशातून इकडे तिकडे फिरणाऱ्या मेघेरूपी पडद्यांच्या अंतराळातून एका पाठीमागून एक अशा पुष्कळ तारकागगन सौधावरून (उंच र अथवा राजवाडा).

अनुक्रमणिका

आहा! ते किती सुखाचे दिवस होते! तसे दिवस या जन्मात पुन्हा यावयाचे नाहीत. माझ्या बालक स्वभावाला अनुसरून मी त्या वाळवंटावर किती कावड्या, शिंपल्या, दगड, धोंडे गोळा करून ओटींत भरून घरी नेत असे, आणि मला त्यावेळेस किती आनंद होई म्हणून सांगू! त्यावेळेस आतासारखे माझे डोळे समुद्राची किंवा आकाशाची शोभा पहाण्यात गुंतत नव्हते. माझी आई बापे, बहीण आणि भाऊ ही सर्वजण एकीकडे गोष्टी सांगत फिरत असत आणि मी त्याच्यापुढे आणि मागे घोटाळत दगड, धोंडे, काय हाती लागेल ते वाळवंटातून गोळा करित असे. मला वाटे माझी आई बापे, आणि बहिण भावंडे फार अरसिक आहेत का? तर माझ्यासारखी ती ही शंख, शिंपल्या, दगड, धोंडे गोळा करीत नाहीत म्हणून!!!

भक्तजनास दर्शन देण्याकरिता सूर्य वर येणार आहे. तेव्हा ज्यास त्याचे दर्शन घ्यावयाचे असेल त्यांनी समुद्रतीरावर यावे. त्याप्रमाणे द्वारकेत समुद्रकिनाऱ्यावर हजारो भक्त मंडळी जमली. आम्हीही द्वारका दर्शन लालसेच्या परवश होऊन तेथे गेलो. थोड्या वेळानेच पश्चिम गगन प्रांती दिनानाथ अस्तास जाऊ लागले आणि त्यांची स्वर्णप्रभा वर सांगितल्यासारख्या मेघराशीवर पसरून त्या अत्यंत शोभायमान होऊ लागल्या. पंड्यांनी तिकडे बोट दाखवून आम्हाला म्हटले, “ही पाहा सोन्याची द्वारका, हे ऐकून पुष्कळ भाविक लोकांनी भक्तिपूर्वक द्वारकेला उद्देशून नमस्कार केले! त्या पर्वणीत पंड्यांनी आपल्या पिशव्या चांगल्या भरून घेतल्या.”

एक दिवस द्वारकेतील पंड्यांनी (तीर्थपुरोहित) अशी गप्प उठविली की आज कपिलाषष्टी आहे. या थोरांस आज संध्याकाळी कृष्णाची समुद्रात बुडून राहिलेली सोन्याची द्वारका आमच्याकडे डोकावीत असत, आणि पुन्हा मेघांच्या आड आपले तोंड लपवित असत. एखाद्या वेळेस आकाश निरभ्र असले म्हणजे असंख्य नक्षत्रे दिसू लागत त्यावेळेस यमुनेच्या नील जलप्रवाहात भक्तांनी वाहिलेली शुभ्र जुईची पुष्पे चोहोंकडे पसरलेली आहेत की काय असे वाटत असे. आणि त्यावेळेस चंद्रोदय झाला असला तर त्या शोभेला पारावरच नसे. खालून अगाध समुद्राचा विस्तीर्ण वर्तुळाकार एक भाग आणि वर स्वच्छ नभोमंडळाचा वर्तुळाकार दुसरा भाग असे दोन्ही जुळलेले दिसत असून त्यात मोत्यासारख्या चोहोंकडे पसरलेल्या तारका जशा आकाशात, तशीच त्यांची प्रतिबिंबे समुद्रजलात दिसत असून मला असा भास होई की, हा आकाश आणि समुद्र अशा दोन भागांनी जुळलेला एक अति विस्तीर्ण मोत्यांचा शिंपला आहे आणि याच्यामध्ये ही पसरलेली मोत्ये आणि शिंपल्याच्या आंतील झळकदार दोन्ही बाजू मला दिसत आहेत! चंद्रप्रभेत समुद्रांतील उसळणाऱ्या कल्लोळांकडे पाहिले म्हणजे समुद्राचे पाणी पातळ झालेल्या चांदीप्रमाणे पांढरे व झळकदार दिसत असे.

खवळलेल्या समुद्रातील कल्लोळांच्या परस्पर संघर्षणाने उद्भवलेल्या फॉस्फरस नावाचे अग्नीच्या ठिणग्या जेव्हा झळकत तेव्हा आमच्या पूर्व कवीनी कल्पिलेल्या वडवाग्नीचे प्रकाशंतराने दर्शन होत असे. अशा त्या अगाध समुद्रामध्ये अविश्रांत कल्लोळ ध्वनि ऐकून मध्यरात्री मी झोपेतून जागी होऊन खिडकीतून डोकावून समुद्राकडे पहात असे. आगबोटीतील सर्व मनुष्य निजल्याने चोहोकडे सामसूम, खोलीत अंधेर, (रात्री दहा वाजल्यावर क्याबिनात दिवा ठेवण्याची मनाई असते). पुढे मागे जिकडे पहावे तिकडे समुद्र अशा वेळेस मनुष्याच्या मनाची स्थिती जशी असावी तशीच माझी असत होती. त्यावेळेस माझ्या मनात या अनंत जगाला सृष्ट करणाऱ्या ईश्वराचे महत्त्व, आपल्या नश्वर परमाणुमात्र वैभवाच्या अहंकारात गुंग असणाऱ्या मनुष्याचे क्षुद्रत्व, माझी हल्लीची स्थिती, माझ्या आयुष्यात जे जे घडून आले त्यांपैकी मुख्य मुख्य सुखाच्या आणि दुःखाच्या गोष्टी, मी आपला देश सोडून कशासाठी इतक्या दूरदेशी जात आहे, पुढे मी काय करणार? कोणत्या रीतीने मी आपल्या मातृभूमीची सेवा करावी, आणि कदाचित् दैवयोगाने हे जहाज

समुद्रात बुडाले तर माझे सर्व मनोरथ एका क्षणात कसे बुडून जातील, इत्यादी गोष्टींचा एक सारखा विचार चालत असे. असो.

एप्रिल महिन्याच्या २६ व्या तारखेस दोन प्रहरी सुमारे १२ वर २ वाजता आम्ही ‘एडन’ बंदरास पोहोचलो. एडन हे गाव अरब देशाच्या नैर्ऋत्येस समुद्रकिनाऱ्यावर असून चोहोकडे उंच उंच पर्वतानी वेष्टित आहे. या पर्वतावर किंवा त्याच्या आसपास झाडपाला, गवत काही एक नाही. चोहोकडे काळसर खडक, उंच उंच डोंगराच्या टेकड्या आणि पुढे समुद्र असा एडनचा देखावा आहे. हा देखावा मनाला संतोषप्रद नाही; तरी सहा दिवसांत कोठे एखाद्या मातीच्या डिखळा एवढीसुद्धा जमीन ज्यांच्या दृष्टीस पडली नव्हती त्या आम्हास तो देखावा पाहून फार आनंद झाला. एडनचे डोंगर दुरून दिसू लागताक्षणीच बंदर केव्हा येईल म्हणून उत्कंठित मनाने आम्ही सर्व उभे राहून वरती माना करून पाहू लागलो. बंदरात आगबोट तरंगता क्षणीच आम्ही एका लहान होडीत बसून किनाऱ्यावर गेलो. तेथे एक गाडी करून एडन गाव पाहाण्याकरिता गेलो. या गावात सगळी एक मजली धाब्याची घरे आहेत. तेथील वस्ती अरब, काफी आणि व्यापाराच्या संबंधाने हिंदुस्थानातून व दुसऱ्याही कित्येक देशातून आलेल्या लोकांची आहे. गावाच्या चोहोकडे डोंगर असल्याने ते गाव एका मोठ्या किल्ल्यात आहे असे वाटते. शिवाय गावाच्या भोवती गावकुसही आहे. उष्णता अतिशयित. पाण्याचे दुर्भिक्ष, चोहोकडे रुक्ष जमीन, असा तेथील सर्व प्रकार आहे. तेथे पाहाण्याजोगे ठिकाण एकच आहे. ते हे की, दोन उंच पर्वतांच्या टेकड्यांमध्ये पावसाचे पाणी धरून साठविण्याकरिता एकावर एक अशी मोठी मोठी १० टाकी बांधलेली आहेत. यांच्या योगाने येथील लोकांस बराच पाण्याचा पुरवठा होत असेल. तेथे एक – दोन विहिरी आहेत. त्या अतिशय खोल आहे. तेथे खालच्या बाजूला काही रानटी आणि समुद्राच्या वाळवंटात उगवणारी झाडे लावून एक लहानसा बाग केलेला आहे. तेथे मनुष्ये हवा खाण्यास जातात. आमच्या देशात तसली झाडे कोणी तरी ‘उगीच केर कशाला पाहिजे’ म्हणून उपटून टाकली असती. परंतु एडनात ती झाडे वाचवण्याकरिता किती प्रयत्न आहे! चोहोकडे कोणी झाडाला हात लावू नये म्हणून पहारे बसविले आहेत. ठिकठिकाणी काळ्या फळ्यावर मोठ मोठ्या अक्षरांनी – “झाडांची पाने कोणी तोडल्यास त्याला शिक्षा होईल” असे इंग्रजीत लिहिले आहे. ठीकच आहे. एका कवीने म्हटले होते “विरस्तपादमे देशे एरंडोपि दुमायाते” एडन सारख्या ठिकाणी तो बाग नंदनवनापेक्षा किंवा कलकत्त्यातील ‘इडन गार्डन’ नावाच्या बागेपेक्षाही जास्ती योग्यतेचा आहे, यात काही संशय नाही! परंतु तशा ठिकाणीही डोंगराच्या दरीत एका ठिकाणी आमच्या कवी गुरू कालिदासाच्या आवडत्या ‘शिरीष’ पुष्पाचे झाड पाहून मला मोठे आश्चर्य वाटले. ते झाड फुललेल्या शिरीष पुष्पाने अगदी भरले होते. पंजाबात आणि आसामात मी ही झाडे पुष्कळ पाहिली होती. पुष्कळ दिवसांनी हे झाड पाहून मला फार आनंद झाला. मी माझ्या मनाला म्हटले, “एडनच्या मरुभूमीतही शिरीषाची फुले फुलली आहेत, तशी कधी कधी दुःखात सुखे उद्‌भवतात”. असो. एडनात ६ तास आगबोट राहिली होती. तेथून रवाना झाल्यावर मे महिन्याच्या १ ल्या तारखेस आमची आगबोट सुएझ येथे पोहोचली. तेथून ब्रिंडिसीच्या रस्त्याने फ्रान्समधून पॅरिस वगैरे शहरे पाहू जाणारी मनुष्ये आगगाडीच्या रस्त्याने गेली. आम्हाला बुखारा आगबोट सोडून दुसऱ्या ‘कैसर – ई हिंद’ नावाच्या आगबोटीत यावे लागले. ही आगबोट पहिल्या आगबोटीपेक्षा पुष्कळ मोठी असून कलकत्त्याहून आली होती. तिच्यात मनुष्यांची फार दाटी होती. क्याबिनामध्ये मनुष्यास राहाण्याची जागा कशी तरी मिळाली. तेथे आमच्याकरिता एकही सेकंड क्लासचे क्याबिन रिकामे नव्हते. म्हणून आम्हाला एका फर्स्ट क्लासच्या क्याबिनात जागा मिळाली. त्यात मात्र दुसऱ्या ठिकाणी फार दाटी होती. म्हणून एक बाई आणि तिची मुलगी राहावयास आल्या. ती बाई होती हिंदुस्थानातीलच परंतु ख्रिश्चन असून तिची रीतभात सगळी युरोपियनांसारखी होती म्हणून तिला आम्हा नेटिवांचा वारा सोसत नसे. तरी करते काय बिचारी? निरुपायास्तव ती आमच्या शेजारी राहावयास आली होती. त्यामुळे आम्हाला आणि

अनुक्रमणिका

तिलाही बराच त्रास सोसावा लागला. सुएझ गाव समुद्रतीरावरून सुमारे २ मैल आहे. या ठिकाणची गोदी वगैरे ठिकाणे पहाण्याजोगी आहेत. सुएझमध्ये घोडे किंवा गाड्या काही नाहीत. तेथे सर्व लोक मोठ मोठ्याल्या गाढवांवर बसून फिरतात. तेथे गाढवेच घोड्यांच्या जागी आहेत. आमच्या आगबोटीतील पुष्कळ मोठमोठाले साहेब आणि मडमा गाढवावर बसून धिंड काढण्याची रीत होती. परंतु सुएझमध्ये मनुष्य मोठ्या हौशीने गाढवावर स्वारी करितात! आम्हीही त्या सुखाचा अनुभव घेण्यात विमुख झालो नाही! सुएझ गाव फारसे मोठे नाही. तेथे सर्व ईजिप्शियन लोकांची वस्ती आहे. बायका रस्त्यात फिरतात परंतु त्यांचे डोळे मात्र उघडे असतात. बाकी सर्व तोंड बुरख्याने झाकलेले असते. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही तेथून निघालो आणि संध्याकाळपर्यंत सुएझच्या कालव्यात चालून भूमध्य समुद्रात आमची आगबोट येऊन पोहोचली. सुएझचा कालवा दोन मोठाल्या आगबोटी एकदम जाऊ शकतात इतका रुंद आहे. भूमध्य समुद्रात आल्यानंतर सर्व क्याबिनातील खिडक्या बंद केल्या, कारण समुद्राच्या लाटा फार वरपर्यंत येऊ लागल्या. खिडक्या बंद केल्या तरी मधूनमधून एके एकदा आम्हाला समुद्रस्नान होत असे. अरबी आणि तांबड्या समुद्रापेक्षा भूमध्य समुद्रात आगबोट फार हालत होती. तेथूनच थंडीचा प्रारंभ झाला. आम्ही सुती कापडाचे पोषाख सोडून लोकरीच्या कापडाचे पोषाख घेतले.

सुएझ येथेच थोडा थोडा थंडीचा प्रारंभ झाला होता. परंतु तेथेच लोकरीची वस्त्रे घेण्याची काही गरज लागली नाही.

तुम्ही जर रॉबिन्सन क्रूसोची गोष्ट वाचली असेल तर आता आमची स्वरूपे कशी आहेत हे बऱ्याच अंशाने तुमच्या ध्यानात येण्याजोगे आहे. रॉबिन्सन क्रूसो याने वस्त्रांच्या अभावामुळे आपल्याला कातड्याचे चमत्कारिक पोषाख करून घेतले होते तसे आमचे पोषाख कातड्याचे नाहीत. परंतु चमत्कारिकपणाविषयी त्याच्यापेक्षाही बोटभर जास्ती आहेत म्हटले तरी चालेल. या थंड देशात आल्यावर आमच्याने पुरता स्वदेशी पोषाख ठेववत नाही. तरी आमच्या हृदयात स्वदेशाभिमान सतत जागृत आहे, आणि इकडे थंडी तर आम्हाला आपल्या हुकमात वागवू पाहाते. अशा उभय संकटाच्या प्रसंगी त्रिशंकू राजा जसा वर व खाली असा अधांतरी उभा होता, म्हणून दंतकथा आहे तशीच आमची स्थिती आहे. अर्धी लोकरीची कपडे व अर्धी सुताची कपडे मिळून आमचा पोषाख बनतात. पायात मोजे असल्यावाचून एक घटकाभरसुद्धा राहण्याचा उपाय नाही. इकडच्या देशचे हे उन्हाळ्याचे दिवस आहेत. तरी आमचे माघ महिन्यात प्रयागात जितकी थंडी पडते तितकी थंडी आहे. त्या दिवसात आम्ही दक्षिणी जोडेच वापरतो. परंतु थंडीच्या दिवसात जेव्हा बर्फ पडते तेव्हा आम्हांला जानुदघ्न (गुडघ्यापर्यंत लांब) बूट अवश्य वापरले पाहिजेत. घरात किंवा बाहेर जोड्यावाचून चालण्याचा उपाय नाही. जर थोडा वेळपर्यंत मोजे आणि जोडे काढत चालले तर पाय जमिनीवर आहेत की पायावर जमीन आहे हे भान राहात नाही! याच कारणामुळे इंग्रज लोकांच्या पायात रात्रंदिवस जोडे असतात. अगदी गरीब मनुष्याच्यानेसुद्धा जोड्यावाचून राहावत नाही. एक वेळ पोटाला नसले तर पुरवले परंतु अंगावर लोकरीची कपडे आणि पायात जोडे ही अवश्य असलीच पाहिजेत. भूक सोसण्यापेक्षा इकडची थंडी सोसणे कठीण आहे. मे महिन्याच्या ६ व्या तारखेस सकाळी आम्ही माल्टा द्वीपात पोहोचलो. सुमारे १० वाजण्याच्या वेळेस आम्ही माल्टा शहर पाहावयास गेलो. माझ्या जन्मात युरोपातील शहर काय ते हेच पहिले पाहाण्यात आले. ते शहर फार सुबक आणि मोठे आहे. रस्ते फार स्वच्छ आणि कोठेही गडबड नाही. बाजारात हजारो मनुष्ये जातात येतात, परंतु गाड्यांच्या चाकांचा जो आवाज होतो त्याहून दुसरा आवाज कोठे ऐकू येत नाही. आमच्या देशात बाजारामध्ये जशा कानारंगाच्या पगड्या दिसतात तसे या देशात नाही. सगळ्यांचे पोषाख टोप्या काळ्या, त्या काळ्या पोषाखांमधून त्यांचे हात आणि तोंड एवढी बाहेर दिसतात. आम्ही त्या शहरात गेलो तेव्हा ते सकाळी माणसे आमच्याकडे टक

लावून पाहू लागली. त्यांना वाटले असेल हे पांढऱ्या कपड्याने वेष्टिलेले नवीन पदार्थ कोणत्या प्रदर्शनाकरिता कोणी येथे पाठविले आहेत कोणास ठाऊक? आम्ही हिंदुस्थानात होतो तेव्हा काही युरोपियन स्त्रियांनी आणि युरोपियन चालीचा पोषाख करणाऱ्या नेटिव्ह ख्रिश्चन बायांनी आम्हाला सांगितले होते की, “तुम्हाला युरोपात आपल्या चालीचा पोषाख करून बाहेर जाता येणार नाही. आणि जर तुम्ही तसे कराल तर रस्त्यात पोरे तुमच्या पाठीमागे लागून टाळ्या पिटतील”. परंतु आम्हाला त्या बायांसारखे मणभर वजनाचे गाऊन (झगे) कसे उचलणार? तशात पडले मी निरामिष (मांस न खाणारी) भुकी माझ्या अंगात गाऊन उचलण्यापुरते बळ नाही म्हणून थंडीच्या निवारणार्थ काही लोकरीचे कपडे अंगावर घालून वरून माझी चादर घेऊनच मी ते शहर पाहावयास गेले. तेथे सर्व मनुष्ये आमच्याकडे टकमका पाहू लागली. आणि मुले व कांही मोठी माणसेही आमचे विलक्षण पोषाख पाहून गालातल्या गालात हसू लागली खरी, परंतु कोणी टाळ्या पिटल्या नाहीत. हा देश सभ्य देश आहे. म्हणून कोणी कोणाला उघड रीतीने हसण्याची आणि रस्त्यातून जात असता कुचेष्टा करण्याची चाल येथे नाही.

माल्टाद्विप आता इंग्लीश लोकांच्या ताब्यात आहे. तेथे इंग्लीश गव्हर्नर राहातो. तेथील लोक माल्टी नावाची भाषा बोलतात. ती भाषा काहीशी अरबी भाषेसारखी आहे. तेथील लोकांस ‘माल्टिज’ असे म्हणतात. परंतु त्यांचे आचार आणि चालीरीति, इंग्लिश लोकांसारख्याच आहेत. पुरुषांचे आणि स्त्रियांचे पोषाख सर्व इंग्रजासारखेच असतात. परंतु बायका टोपी न घालता डोकीवर ख्रिश्चन संन्यासिनी (नन्स) जसे एक कापड घेतात तशाच प्रकारचे पण आकृतीत काहीसे विलक्षण असे काळे कपडे डोकीवर घेतात. आम्ही तेथील गव्हर्नरचा बंगला पाहिला. त्यापैकी दोन मोठे मोठे भव्य दिवाणखाने पाहाण्यासारखे होते. त्यापैकी एक दिवाणखाना सुमारे ५ – ६ शे वर्षांपूर्वी माल्टी लोक जी चिलखते अंगात घालून लढत होते आणि त्यावेळेस जी शस्त्रे वापरीत होते त्यांनी भरलेला आहे. ती चिलखते आणि शस्त्रे सर्व लोखंडी व पोलादी असून फार मोठाली आहेत. ती साधारण मनुष्याच्याने उचलवणार देखील नाहीत. अशी जड कवचे अंगावर घालून रणात लढणारे लोक केवढाले राक्षस असतील कोण जाणे! तेथे एक ‘जायंट’ (फार मोठा मनुष्य) म्हटलेल्या मनुष्याचे चिलखत पाहिले ते फारच मोठे होते. त्याच्या डोकीची टोपीच ३७ पौंड (सुमारे १८॥ शेर) वजनाची आहे. यावरून चिलखताचे वजन आणि ते व ती टोपी अंगावर घालणाऱ्या शूर मनुष्याचे बळ किती असेल याचे अनुमान करावे. सदरहू मनुष्य स्पानियार्द्र (सोन देशातला) असून तो माल्टी सेनेचा अध्यक्ष होता असे ऐकले.त्याच दिवाणखान्यात एके ठिकाणी सुमारे सहाशे वर्षामागे केलेली कित्येक मातीची भांडी आहेत. त्यावर केलेली फार सुंदर नक्षी आणि त्यातील रंग अद्यापि नवीन असल्यासारखी दिसतात. दुसरा दिवाणखाना पाहिला तोही मोठा विस्तीर्ण आहे. त्या दिवाणखान्याच्या सर्व भिंती कशीदा काढलेल्या मनोहर पडद्यांनी आच्छादित आहेत. त्या पडद्यांवर अमेरिकेतील रम्य अरण्ये, असभ्य इंडियन लोक, हबशी लोक, हत्ती, घोडे व पुष्कळ जातींची पांखरे यांची चित्रे व इतर वेलबुट्टी अशी हुबेहुब काढली आहेत की, ती दुरून पाहिली तर हा कशीदा काढलेला आहे असे कोणासही वाटावयाचे नाही. हा कशीदा सुमारे दोनशे वर्षांमागचा आहे असे तेथील एका माहितगार मनुष्याने सांगितले. तेथून पुढे आम्ही एक रोमन क्याथोलिक मनाचे ख्रिस्ती लोकांचे देऊळ पाहावयास गेलो. तेथे धर्माचार्यांनी (पाद्री लोकांची) बसण्याची पुष्कळ आसने आहेत. ती एका लहानशा कोठडीप्रमाणे असून लाकडाची असतात. त्यामध्ये खुर्चीसारखे बसण्याची जागा असून त्यांच्या दोहोंबाजूस लाकडी फळ्याच्या भिंतीला लहान लहान जाळीच्या खिडक्या असतात. त्यातून बाहेरील बाजूस गुडघे टेकून मनुष्ये आपली सर्व पापे आत बसलेल्या धर्माचार्यांच्या कानात सांगून त्यांच्याद्वारे परमेश्वरापाशी क्षमा मागतात. तेव्हा रोमन क्याथोलिक आचार्य ज्यास मंक म्हणतात तो देवाची प्रार्थना करून त्या मनुष्यास त्याच्या सर्व पापांची क्षमा झाली असे सांगतो. ते त्याचे वचन मिळाले म्हणजे आपल्यास परलोकी दंड, भय नाही असा रोमन क्याथोलिक मनाच्या लोकांचा समज आहे.

त्यांच्यातील मंक लोक मेले म्हणजे साधारण लोकांप्रमाणे त्यांची शरीरे जमिनीत पुरीत नाहीत. ती उन्हात पुष्कळ दिवस वाळवून एका सुरक्षित जाग्यात ठेवतात. अशा प्रकारची पुष्कळ शवे आम्ही सदरहू देवळाच्या तळघरात पाहिली. ती उंच उंच कोनाड्यामधून उभी करून ठेवली होती. त्यापैकी कित्येक शवे पुष्कळ वर्षांमागची होती. त्या देवळाच्या चोहोंकडे मेरी, योसेफ आणि ख्रिस्त यांच्या निरनिराळ्या अवस्था प्रदर्शक पुष्कळ मूर्ती होत्या. रोमन क्याथोलिक लोक इतर मूर्तीपूजकांप्रमाणे ख्रिस्ताच्या मूर्तीची पूजा करतात. इतर मूर्तिपूजकात आणि यांच्यात भेद इतकाच की, ते लोक ख्रिस्त आणि मेरी या दोघांच्याच मूर्तीचीच पूजा करतात आणि इतर अनंत देवतांच्या मूर्ती करून पूजतात. माल्टा द्विपातील लोक बहुतकरून सर्व रोमन क्याथोलिक मताचे आहेत. ते लोक फार उद्योगी आहेत तरी भीक मागणारेही तेथे पुष्कळ आहेत. चोहोकडे व्यापाराचा भर दिसतो. माल्टा शहराच्या सभोवती फार मजबूत आणि सुंदर किल्ला आहे. हे शहर केवळ युद्धोपयोगी रीतीचेच बांधिले आहे तरी त्यात इतर सोयी नाहीत असे नाही. तेथील लोक पूर्वकाळी मोठे शूर होते. प्राचीन काळच्या पुष्कळ युद्धांच्या संबंधाने हे शहर आणि द्विप इतिहासात फार प्रसिद्ध आहे. या शहराची रमणीयता, स्वच्छता व जिकडे तिकडे लोकांची टापटीप वगैरे पाहून आम्हास फार संतोष झाला. या द्विपाच्या किनाऱ्यावर आमची आगबोट दहा तास उभी होती.

या पुढे चार दिवसांनी जिब्राल्टर शहर लागले. ते शहर पाहाण्यास जाण्यापुरता वेळ नव्हता म्हणून आम्ही ते शहर पाहावयास गेलो नाही. तरी ते शहर समुद्रकाठापासून डोंगराच्या वरच्या बाजूपर्यन्त एकावर एक अशा घरांच्या रांगांनी रमणीय करून वसविलेले आहे. म्हणून आगबोटीतून आम्ही त्याची रचना पाहिली. शहरा सभोवती मोठा मजबूत किल्ला असून मधून मधून पुष्कळ बगीचे असल्याकारणाने ते अत्यंत शोभायमान दिसते. ते स्पेन देशातील एक प्रख्यात शहर आहे. तेथे झालेल्या मोठमोठाल्या युद्धांच्या संबंधाने इतिहासांतही त्याची ख्याती आहे. तेथे आगबोट सुमारे चार तास उभी होती. तेथून निघून जिब्राल्टरची सामुद्रधुनी रात्री पार उतरून आम्ही अटलांटिक महासागरात आलो. दुसऱ्या दिवशी बिस्केच्या उपसागरात समुद्राचे प्रशांत गंभीर रूप नव्हते. तेथे त्यावेळेस स्वारी बरीच खवळलेली होती. बिस्केचा उपसागर पार होण्यास आम्हाला दोन दिवस आणि एक रात्र लागली. लाटांच्या उसळण्याबरोबर रात्रंदिवस आमची आगबोट एकदा आकाश आणि एकदा पाताळ पहात होती. आगबोटीच्या डेकवरपर्यन्त समुद्राच्या लाटा उसळून वर उभ्या राहिलेल्या मनुष्यास स्नान घालीत होत्या. आगबोटीच्या पुढल्या बाजूस डेकवर खलाशांवाचून दुसरे कोणी जात नव्हते. बहुत करून जहाजातील सर्व मनुष्ये त्या भयंकर हालण्याने आजारी होऊन आपआपल्या खोल्यात निजून राहिली होती. दोन दिवसांपर्यन्त आमच्याने खोलीच्या बाहेर निघवले नाही. आगबोट हाले तेव्हा आम्ही आपआपल्या अंथरूणावरून कोसळून एकमेकांच्या अंगावर आदळतो की काय असे वाटत असे. खोलीत सुद्धा आमच्याने उभे राहवेना, उठून बसलो तर आगबोटीच्या हलण्याने आमची डोकी भिंतीशी आपटत.

ते महिन्याच्या तेराव्या तारखेस एक बंदर लागले. तेथून पुष्कळ मनुष्ये उतरून रेल्वे मार्गाने लंडन शहरास आणि निरनिराळ्या ठिकाणी जेथे ज्यास जावयाचे होते तेथे गेली. तेथे समुद्राच्या किनाऱ्यावर एक जबरदस्त किल्ला आणि पुष्कळ आरमारे होती. ते ठिकाण फार मनोहर दिसत होते. त्या भागातले हे दिवस वसंत आणि ग्रीष्म या दोन ऋतुतले आहेत. तेव्हा येथे स्वाभाविक शोभा अगदी तरुण वयात असता आमच्या दृष्टीस पडत आहेत. १६व्या तारखेस लंडन शहरापासून बरीच दूर एका ठिकाणी आमची आगबोट थांबली. तेथे सर्व मनुष्ये उतरून रेल्वेमार्गाने लंडन शहरी आली. माझ्या एका सिस्टर मैत्रिणीने आपल्या भावाला पत्र लिहिले होते ते मी मागे सांगितलेल्या बंदराहून डाकेत रवाना केले. ते पावताच तो सभ्य गृहस्थ आम्हास नेण्याकरता या ठिकाणी आला आणि सेंट मेरीज होमच्या पुष्कळ शाखा लंडनमध्ये आहेत त्यांपैकी एका

अनुक्रमणिका

घरातील दोन सिस्टर्सही आम्हास नेण्याकरिता तेथे आल्या होत्या. आम्ही त्यांच्याबरोबर रेल्वे मार्गाने त्याच दिवशी लंडन शहरी पोहोचलो. तेथे पोहोचताच सदरहू गृहस्थ आमचा निरोप घेऊन आपल्या घरी गेला आणि आम्ही सिस्टर्स यांच्याबरोबर त्यांच्या घरी गेलो. तेथे त्यांनी उत्तम रीतीने आमचा पाहुणचार केला. बाबूबंक बिहारी शर्मा हे रेल्वे स्टेशनवरूनच आमचा निरोप घेऊन ज्या गृहस्थाकडे त्यास उतरायास जावयाचे होते तिकडे गेले. ता. १७ रोजी मी एका सिस्टरच्या बरोबर डाकवर (टेम्स नदीच्या किनाऱ्यावर आगबोटीचा पडाव आहे तेथे पुष्कळ मोठमोठाल्या गोद्या आहेत.) आगबोटीत राहिलेले माझे सामान आणावयास गेले. लंडन शहर फार विस्तीर्ण आहे. मुंबईत जशा शहरातून फिरण्याकरता ट्रामगाड्या झाल्या आहेत तशा लंडन शहरात रेलगाड्या आहेत. घोड्याच्या गाड्यास फार भाडे लागते. आम्ही ज्या ठिकाणी उतरलो होतो ते ठिकाण लंडन शहराच्या एका टोकावर आहे. तेथून सुमारे दोन तासपर्यंत रेलगाडीमध्ये बसून आम्ही लंडनशहरामधून जात होतो. त्यांपैकी एक तास शहराच्या खाली भुयारात रेलमार्ग बांधलेला आहे त्यावरून गाडी चालली होती. पुण्याहून मुंबईला जाताना जसे रस्त्यात बोगदे लागतात तशाच प्रकारचा सदरहू भुयारातली रस्ता आहे. त्या रस्त्यातून जाताना अंधार असतो म्हणून गाड्यातून दिवे लावतात. आम्ही दोघीजणी डाकवर ज्या गोदीत माझे सामान होते तेथे जाऊन सामान घेऊन परत आपल्या बिऱ्हाडी गेलो. गोदीमध्ये सामानाची झडती घेतात. झडती घेण्याचे कारण इतकेच की कोणी जकात दिल्यावाचून कैफी पदार्थ बरोबर नेऊ नयेत.

या वेळेस मला लंडन शहरात राहून तेथील प्रख्यात अशी ठिकाणे पहावयास वेळ नव्हता म्हणून मी ती पाहिली नाहीत. तरी रस्त्यातून जाताना पार्लमेंट सभेची आणि लॉर्ड मेयर जीत राहातो ती अशा दोन भव्य इमारती बाहेरून पाहिल्या. टेम्स नदीच्या किनाऱ्यावर एके ठिकाणी क्लिओपाट्राज नीडल नावाचा दगडी खांब इंग्रजांनी इजिप्त देशातून आणून लंडन शहरात उभा केला आहे. म्हणून वर सांगितले तो आणि मी काही पुष्कळ इमारती बाहेरून पाहिल्या. सध्या मी आपल्या अभ्यासात निमग्न आहे; म्हणून मला पुष्कळ ठिकाणी जाऊन तेथील माहिती आणि या देशाची रीतीभातीचीही माहिती आपल्यास देता येत नाही. पुढे कधी तरी पाहू. आता येथील साधारण ज्या गोष्टी मी पाहात आहे त्या अशा :--

आजकाल उन्हाळ्याचे दिवस असल्याने इकडे सर्व ठिकाणी जमीन, झाडे, वेली, गवत, फुलझाडे वगैरेंच्या हिरव्याचार रंगाने आच्छादित आहे. चोहोकडे कोठेही पडित जमीन दिसत नाही. येथील मनुष्यास स्वाभाविक शोभा फार आवडते. आमच्या देशातही लोकांस बागबगीच्यांची आवड आहे. परंतु दुःखाची गोष्ट एवढीच की त्यास बागात खरी शोभा आणता येत नाही. येथील मनुष्ये आपल्या बागस फार जपतात. मोठ्या मोठ्या घराण्यातील स्त्रिया आणि सुंदर अर्ध्या फुललेल्या गुलाबासारख्या लहानलहान मुली आपल्या बागेत कोणी झाडास पाणी घालीत आहेत, कोणी नाना प्रकारची फुले वेचून पुष्पपत्रमिश्रित गुच्छ करीत आहेत, कोणी नुसत्या फुलाकडे आणि झाडांकडे पाहातच आहे. अशा स्थितीत त्यास पाहिले म्हणजे आमच्या महाभारतात वर्णिलेले पवित्र ऋषींचे आश्रम आणि त्यामधून सदरहू प्रकारची वनशोभा वाढविण्यात गुंतलेल्या ऋषिकन्या आणि ऋषिकन्यांची आठवण झाल्यावाचून राहात नाही. येथे ‘एलम’ नावाचे मोठे उंच उंच वृक्ष रस्त्याच्या दोहोंबाजूस आणि बागांमधूनही असतात. त्याची छाया फार दाट आणि थंड असते. त्या वृक्षात चमत्कार हा की ते बुडख्यापासून शेंड्यापर्यंन्त हिरव्या चार पानांनी आच्छादिले असतात. त्या वृक्षांच्या मोठमोठाल्या फांद्या फार उंचावर फुटतात परंतु बुडख्यापासून तर त्या मोठ्या फांद्या फुटतात तेथपर्यन्त बारीक बारीक बोटाएवढ्याला फांद्या अगदी जवळजवळ बुंधाला फुटलेल्या असून त्या हिरव्याचार पानांनी गजबजलेल्या असतात. म्हणून ते वृक्ष खालपासून वरपर्यन्त वेलींनी वेष्टिलेले असल्यासारखे दिसतात. ते आणि दुसरेही पुष्कळ वृक्ष, नाना प्रकारच्या वेली (झाडांवरून पसरलेल्या)

अनुक्रमणिका

आणि अनेक रंगाची फुललेली फुले वगैरेंचा हा मनोहर देखावा पाहून खरोखरच आम्ही स्वर्गभूमीत आहोत की काय अशी भ्रान्ति होते. जमिनीवर उगवलेल्या चारीत सुद्धा पांढरी आणि पिवळी अगदी लहानलहान डेजी नावाची फुले चोहोकडे फुललेली आहेत. या फुलांची आकृति कांहीशी शेवंतीच्या फुलांसारखी असते. अशा प्रकारची रानटी फुले येथे चोहोकडे आहेत. रानात सुद्धा स्वाभाविक शोभेचा अगदी बहर आहे. हा देखावा पाहिला म्हणजे मला हिमालयातील आणि ब्रह्मपुत्र नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या श्वाशियात व गारो पर्वतातील वन प्रदेशाची आठवण होते.

असो. या देशातील कित्येक घराण्यातील मनुष्ये फारच सभ्य आहेत. तशीच जी मनुष्ये हलक्या प्रतीची असतात त्यांच्या असभ्यापणाचीही कमाल आहे. या देशातील गृहसंबंधी व्यवस्था कशी असते ती पुढच्या वेळेस मी आपल्याला लिहून कळवीन. आमच्या देशभगिनींनी ही व्यवस्था अनुकरण करण्याजोगी आहे.

अनुक्रमणिका

भाग दुसरा

# महाराष्ट्रात येण्यापूर्वी
# व
# आल्यानंतर

अनुक्रमणिका

# १.महाराष्ट्रात येण्यापूर्वी

सन १८७८ साली जुलै महिन्यात, म्हणजे सुमारे बेचाळीस वर्षांपूर्वी मुंबई शहरात असे वर्तमान प्रसिद्ध करण्यात आले की, 'हल्ली कलकत्त्यास कोणी एक रमाबाई नावाची मराठा (महाराष्ट्रीय) बावीस वर्षांची अविवाहीत तरुण स्त्री कर्नाटक प्रांतातून आली असून जगन्नाथपुरीकडे जात असता तिने कलकत्त्यास काही दिवस मुक्काम करून तेथील विद्वान पंडितास चकित करून सोडिले आहे. बाई संस्कृत भाषा बोलते. संस्कृतमध्ये जागच्या जागी काव्य रचते.' मराठा तरुण स्त्री, बावीस वर्षेपर्यन्त अविवाहित राहू शकली. ती महाराष्ट्र सोडून कर्नाटकात गेली. तेथे तिचे अध्ययन झाले, आणि आज त्या कलकत्त्यासारख्या पंडितांनी गजबजलेल्या शहरातील लोकांस थक्क करून सोडीत आहे. ह्या गोष्टींवर मुंबईतील उदारमतवादी लोकांचाही प्रथम विश्वास नसतो व म्हणून त्यांनी ह्या बाईविषयी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अशी अधिक माहिती मिळाली की, ह्या बाईला भागवतातील १८ हजार श्लोक मुखोद्गत आहेत. पाणिनीचा पहिला भाग बाई चांगली पढली आहे. बाई सुंदर, सतेज, विनयशील व दिसावयासही हुषार आहे. एके दिवशी रमाबाई कलकत्त्याच्या सेनेट हाऊस येथे गेल्या. तेथे प्रोन्टॉने, प्रो. गो. व पंडित महेशचंद्र न्याय रत्न बसले होते. बाईच्या विद्वत्तेची किर्ती सेनेट हाऊसपर्यन्त आली होती, म्हणून त्या तिघांही संस्कृतज्ञ पंडितांनी प्रथम रमाबाईंचे स्वागत करून टॉनेसाहेबांच्या मदतीने रमाबाईच्या स्वागतपर एक सुंदर श्लोक रचला. हा श्लोक आज उपलब्ध नाही. परंतु त्याचा सारांश आम्ही पाहिला आहे तो असा आहे – "ज्या आपण मोठमोठ्या पंडितास थक्क करून सोडले आहे त्या आपण मनुष्य योनीतील एक व्यक्ती आहात असे आम्हास वाटत नाही. आपण प्रत्यक्ष विद्यादेवी श्री सरस्वतीच ह्या भूतलावर मनुष्यरूप घेऊन अवतरला आहात असे वाटते. मी स्वतः जरी जन्मतः म्लेंछ आहे तरी मी आजपर्यन्त पुष्कळ पंडितांचे विद्वत्तेचे प्रदर्शन पाहिले आहे. परंतु आपल्यासारखे उदाहरण आपलेच! मी आपल्यासारखा कवी नाही. आपली स्तुती काव्यद्वारे करावयास मी असमर्थ आहे. म्हणून मी आपल्याला नमस्कार करितो. ह्यास रमाबाईंनी जागच्या जागी संस्कृत श्लोक रचून उत्तर दिले. त्याचा मतितार्थ असा होता की, "मी एक मोठी पंडिता आहे असे मला वाटत नाही आणि म्हणून आपण जो मजवर स्तुतीचा वर्षाव केला त्यास मी मुळीच पात्र नाही. आपली स्तुती आपल्या चांगुलपणाची व आपल्या गुणग्राहकत्वाची साक्ष पटविते. मी आपली सरस्वती देवीच्या मंदिरातील एक गरीब अशी उपासिका आहे आणि आपल्यासारख्या विद्वान लोकांनी मजविषयी जे उद्गार काढले ते ऐकून मी ह्या विद्वानांच्या पंडितांच्या शहरात आल्याचे सार्थक झाले असे मला वाटत आहे.

त्यानंतर बाईकडून जागच्या जागी दुसरे काही श्लोक रचवून घेण्यात आले व रमाबाईंची कवित्व शक्ति पाहून सर्व विद्वान गृहस्थ महामहोपाध्याय, पंडित व इतर जन अगदी थक्क होऊन गेले व बाईंना 'सरस्वती' ही पदवी मिळाली. आणखी एका प्रसंगीही त्यांच्या विद्वत्तेची साक्ष पटवून देण्यात आली. हा प्रसंग महाराज ज्योतिंद्रमोहन टागोर ह्यांनी जुळवून आणला होता. त्यावेळीही निरनिराळ्या रीतीने त्यांची कसून परीक्षा घेण्यात आली. त्यांची असाधारण विद्वत्ता, त्यांची समयसूचकता, त्यांचा विनोद आणि त्यांचे शुद्ध स्पष्ट शब्दोच्चार पाहून सर्व मंडळी अगदी थक्क झाली. ह्यानंतर रमाबाईची ओळख पुष्कळ ठिकाणी करून देण्यात आली. शेवटी प्रसिद्ध देशभक्त आनंद मोहन बोस ह्यांनी आपल्या येथे फक्त स्त्रियांचीच सभा भरविली. त्यावेळीही रमाबाईनी आपल्या विद्वत्तेची साक्ष आपल्या सर्व भगिनींस पटविली. त्यांची विद्वत्ता पाहून मानपत्र अर्पण केले. हे मानपत्र बंगाली भाषेत लिहिलेले होते. त्याचा सारांश पुढे दिला आहे –

अनुक्रमणिका

‘हे आर्यबाई, आपण भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण आहा. या शहराचे सर्व लोक विस्मय पावले आहेत. आपण आमची देश भगिनी म्हणून आपल्या बुद्धिस विद्वत्तेस आणि कविता शक्तिस जो मान मिळत आहे, त्याचे आम्हास मोठे भूषण वाटत आहे. आम्हासच नव्हे तर सर्व भरतखंडास आपला अभिमान वाटावा हे योग्य आहे. उच्च शिक्षणाने स्त्रियांची मने किती अलंकृत होतात याची प्रचिति आपल्याच उदाहरणावरून येते. हल्लीच्या काळातील विद्वान स्त्रियांचे दृष्टांत द्यावयास आजपर्यन्त आम्हास परदेशातील स्त्रियांची नावे घ्यावी लागत, परंतु आपले दर्शन आम्हास झाले, तेव्हा आता तसे करावे लागणार नाही. आमच्या प्रचलित हिंदू चाली आणि रीतिभाति ह्यास अनुसरून चालले तर आमच्या देशातील स्त्रियास केवढा लाभ होण्याचा संभव आहे हे आपल्या उदाहरणावरून आता लोकांच्या लक्षात सहजच येईल. पुरातन काळच्या पुष्कळ नामांकित विद्वान स्त्रियांविषयी वाचण्यात ऐकण्यात येते ते त्यांचे उत्तम गुण आपल्या ठायी आज प्रत्यक्ष पहाण्यात येत आहेत.’

‘आपली एवढी विशाल बुद्धि व उत्तम विद्वत्ता असून आपल्या ठायी गर्व यत्किंचित नाही. परंतु उलट आपण विनय लिनता, सरळ भाव आणि सात्त्विकपणा याची प्रत्यक्ष मूर्तीच भासता.’

या देशाच्या कोणा स्त्रीचा सन्मान करण्याकरिता आजपर्यन्त (१८७८) प्रसिद्ध सभा कधी झाली नाही. परंतु आपले आगमन येथे झाल्यामुळे असल्या सभांस प्रारंभ झाला. आपले सद्‌गुण आणि मनाची स्वतंत्रता पाहून स्वदेशातील स्त्रियांचा योग्य मान ठेवण्याविषयी आणि त्यांचा आदरसत्कार करण्याविषयी आमच्या देश बांधवांची प्रवृत्ति होईल अशी आम्ही मनापासून उमेद बाळगतो. स्त्रियास स्वतंत्रता असणे ही गोष्ट शुद्ध विदेशी व परद्विपातली होय हा समज आपण आमच्या देशातील पुरुषांच्या मनातून दूर करावा.

ह्या मानपत्राचा अर्थ रमाबाईंना एका पंडिताने संस्कृतात सांगितला. रमाबाईंनी आपले उत्तर संस्कृत भाषेत दिले ते त्यांच्या बंधूने हिंदी भाषेच्याद्वारे सर्व भगिनीस समजावून सांगितले. रमाबाईंचे उत्तर पुढील अर्थाचे होते :-

“हे भगिनी बंधूनो! आज आपण माझा मोठाच सन्मान केला आहे. तेणेकरून मला फार आनंद झाला आहे. परंतु आपण माझी स्तुती वाजवीपेक्षा अधिक केली आहे.

तुम्हास ज्या गोष्टींची माहिती आहे त्यांची मला नाही. आपण विद्या शिकून संसार कसा करावा हे जाणता. संस्कृताच्या अध्ययनाने तुम्हास मोठा लाभ होईल. शास्त्रे म्हणजे काय? शास्त्रे ही ज्ञानप्राप्तीची साधने होत....आपण संस्कृत शिकला म्हणजे पुरातन काळच्या स्त्रियांची माहिती आपल्याला सहज होईल. पुरातन काळी आपल्या देशात स्त्री-शिक्षण होते व स्त्रियास मोकळीक व स्वतंत्रता होती असे आपणास आढळेल, द्रौपदी आपल्या बापाजवळ भर दरबारात बसत असे. तिने युधिष्ठिरांस बोध करावा की आपण द्यूत खेळू नये कारण त्यापासून हानि होते असे माझ्या पित्याने मला सांगितले आहे. श्रीकृष्ण सभेत आपल्या मातेस जवळ घेऊन बसत असे. यावरून स्त्रियास कोंडून ठेवण्याची चाल त्या काळी नव्हती असे सिद्ध होते. मुसलमान लोकांनी भरतखंड घेतले त्या काळापासून ही चाल सुरू झाली आणि हल्ली तरी जे देश मुसलमानांच्या अमलात फार काळ आहेत त्यात ही चाल फार कडक आहे. जसजसे पश्चिमेकडे जावे तसतसा ह्या चालीचा अंमल कमी होतो. देशाटन फार उपयोगाचे आहे. तेणेकरून भिन्न लोकांच्या रीतीभातींची माहिती होऊन ज्ञान प्राप्त होते. बालविवाहामुळे ज्ञानप्राप्तीचे मार्गच सर्व बंद होतात. पुरातन काळी भरतखंडात बालविवाहाची चाल नव्हती, हे शास्त्राध्ययन केल्याने आपणास विदित होईल. स्त्रियांची

**अनुक्रमणिका**

लहानपणी लग्नेच केली आणि त्या विद्या शिकल्या तर त्या दुर्गुणी होतील असे लोक म्हणतात परंतु ही चूक आहे. सत्यभामा, सावित्री आदिकरून पुष्कळ स्त्रियांच्या उदाहरणावरून ही कल्पना मिथ्या ठरते. इतकेच नव्हे तर विद्येच्या योगाने स्त्रिया अधिक सद्‌गुणी होतील. शिकलेल्या स्त्रियांमध्ये कोणीच दुर्गुणी निघणार नाहीत असे माझे म्हणणे नाही, परंतु घरात कोंडून ठेवलेल्या व अक्षरशत्रु बायकांमध्ये अशा दुर्गुणी निघत नाही काय?

अशा प्रकारे कलकत्त्यास त्यांचा सन्मान झाल्यावर रमाबाई आपल्या बंधुसमवेत पुढे प्रवासास निघाल्या. रमाबाई महाराष्ट्रीय म्हणून त्यांच्याकडे ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील पुढाऱ्यांचे सगळे लक्ष लागून राहिले होते, त्याचप्रमाणे महाराष्ट्र हा आपला देश—मराठी आपली मातृभाषा म्हणून महाराष्ट्राकडे बाईचे लक्ष होते व इंदुप्रकाशपत्र त्यांच्या वाचनात होते. त्यामुळे महाराष्ट्रातील चळवळी व विशेष गोष्टी त्यास कळत असत. १८७९ साली नाशिक येथे सौ. अनुसयाबाई उर्फ अण्णू अक्का यांचा सन्मान करण्यात आला. ही बातमी ऐकून रमाबाईस किती आनंद झाला त्याची कल्पना त्यांच्या पुढील पत्रावरून होण्यासारखी आहे. हे पत्र रमाबाईनी शिलांगहून लिहिले आहे :--

वि. वि. गेल्या ११ ऑगस्ट १८७९ च्या इंदु-प्रकाशमध्ये वाचण्यात आले होते की सौ. अनुसयाबाई उर्फ अण्णू अक्का ही ब्राह्मण कन्या संस्कृतमध्ये उत्तम अधीन असून भागवताचा अर्थ चांगला लाविते. तिचा विद्वत्व चमत्कार पाहून नासिकवासी लोक साश्चर्य झाले आहेत. हे वाचून मला जो आनंद झाला तो माझ्या हृदयात मावत नाही व लिहून कळविण्यासही मी असमर्थ आहे. आज आमच्या म्हणजे स्त्री जातीच्या जीवनाचे सुप्रभावच झाले म्हटले पाहिजे. कां. न म्हणावे? पाहा! जी प्राचीन माननीय भारतवर्षवासी लोकांची पवित्र भाषा संस्कृत, जिचे ज्ञान होणे अतिदुर्घट व गहन, त्या भाषेत लोकाश्चर्यकारक विद्वत्ता संपादन करून शद्वाक्या मृत निधी एक महिना मुखचंद्र अज्ञानांध नमसाच्छत्र-जावत स्त्रीजन नभो मंडळात उगवला! आमच्या वाडवडिलांच्या आणि मोठे सूज्ञ लोकांच्या सांगण्यावरून व इतिहासाचे परिशिलन केल्याने समजते की, पूर्वी भारतवर्षामध्ये उत्तम धर्मनीतिज्ञान संपन्न स्त्रिया पुष्कळच होत्या. परंतु आजकाल तशा स्त्रिया पृथ्वीवर विराळाच असतील. स्त्री जातीची आजच्या काळात जी शोचनीय दशा आहे तिचे स्मरण करून सर्व सहृदय मनुष्यास दुःखच वाटेल. जिकडे पाहावे तिकडे अज्ञानांध स्त्रिया घोर दुःख सागरात गटंगळ्या खाताना दृष्टीस पडतात. त्यास कोणत्याही प्रकारचे अवलंबन (?) मिळत नाही. आज जर शाण्डिली, अत्रेयी इत्यादिकांसारख्या ज्ञानयुक्त स्त्रिया भारतवर्षात असल्या तर कशाकरिता स्त्री जातीस लाजेने मस्तक अवनत करावे लागते ? स्त्रीने विद्याभ्यास केला असता ती विधवा होते ही परिभाषा देशात कोणत्या मुहूर्तावर चालू झाली आहे कोण जाणे! हिच्या भयाने अद्यापि पुष्कळ बायका शास्त्रपुराण इत्यादी नावे सुद्धा तोंडी आणीत नाहीत! असो. आता पुढे तरी अनुसयाबाईसारख्या स्त्रियांचा कित्ता घेऊन सूज्ञ लोकांच्या साहाय्याने भारतवासी बायका आपल्या दुर्दशेकडे लक्ष देऊन धर्मनीति शास्त्राध्ययनपूर्वक औनत्यकारक सुदशा आणण्याचे उद्योग करतील तर लवकरच ईश्वर कृपेने आमच्या जातीचे दैव उघडेल.

अनुसयाबाई यांजकडून विद्याभ्यास ज्या गुरुंनी करविला व त्यास एवढ्या योग्यतेस पोहोचविले व अज्ञ स्त्री जनास ज्ञानोपदेश करून अपार दुःख पारावारांतून उद्धार करण्याचा ज्यांनी पाया बांधिला त्यांचे आम्ही फारच आभार मानतो व या सत्कार्याबद्दल जितकी त्यांची प्रशंसा करावी तितकी थोडीच. सौ. अनुसयाबाई ह्यास माझी अशी सूचना आहे की, केवळ पुराण श्रवणाने बायकांस नीतीचा व धर्माचा चांगला बोध होत नाही. कां की, त्या केवळ कथा रसात निमग्न असतात. नीतीने कोणता मार्ग धरल्यास उन्नति व

सुख होईल तो मार्ग रुचण्याचा उपदेश करावा, म्हणजे परस्परांची चाल पाहून स्त्रियांची दशा सुधारेल व देशावर आणि जातीस फार उपकार होतील हे विनंती. शिवमस्तु."

'ह्या पत्रामध्ये रमाबाईनी जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांची प्रसिद्धी झाल्यावर त्यांच्याविषयी अधिक कुतूहल मुंबईमध्ये जागृत झाले व त्यांचे आपल्याला दर्शन व्हावे, त्यांनी आपल्यामध्ये राहावे, आपल्या स्त्री समाजामध्ये जागृती करावी असे पुढारी लोकांना वाटू लागले व सुबोध पत्रिकेने ता. २७ सप्टेंबर १८७९ रोजी म्हटले की, "ह्या बाई मराठी (महाराष्ट्रीय) असल्यामुळे तर आम्हास यांचे विशेषच भूषण वाटत आहे. शिवाय आम्हास असे वाटते की, रमाबाई जर महाराष्ट्र देशी येऊन मुंबई, पुणे आदि करून शहरी लोकांस दर्शनाचा लाभ देतील, तर त्या सर्वांस अत्यानंद होणार आहे. आणि मग त्यांच्या अचाट बुद्धिचा व विद्वत्तेच्या साहाय्याने त्यांच्या महाराष्ट्र भगिनींचा उर्जित दशा करण्याचा काही मार्ग निघण्याचा संभव आहे. त्यांच्या गुणाचा उपयोग महाराष्ट्रातील स्त्रियास पडणार आहे तितक्या दुसऱ्या कोणत्याही प्रांतातील स्त्रियांस होणार नाही हे उघड आहे. म्हणून आपल्या विद्येचा उपयोग भारतवर्षीय भगिनींच्या स्थिती सुधारण्यास व्हावा असा जो रमाबाईंचा मनोरथ दिसतो तो महाराष्ट्र लोकात परिपूर्ण होण्याचा संभव अधिक आहे." यानंतर रमाबाई प्रवास करीत असता ता. १५ मे १८८० रोजी त्यांचा प्रिय व विद्वान बंधु रा. श्रीनिवास शास्त्री डोंगरे ह्यास कलकत्ता येथे देवाज्ञा झाली. त्यावेळी रमाबाईनी आता मुंबईतच येऊन रहावे अशी चळवळ सुरू होण्याचा रंग दिसू लागला. रमाबाईवरील हा प्रसंग जाणून पत्रिकेने म्हटले आहे – रमाबाईंच्या विवाहाची कायमची तजवीज आपल्या इकडे होईल तर फार चांगले होईल. रमाबाईस विदेशी हाल व संकटे भोगू न देता त्यास स्वदेशी परत आणून महाराष्ट्र स्त्रियांच्या उन्नतीच्या कामी त्यांच्या अपूर्व विद्वत्तेचा काही उपयोग झाला तर करावा हे आमच्या लोकांस मोठे हितावह आणि भूषणास्पद होणार आहे. आम्हास वाटते की येथील स्टुंडट्स सोसायटीच्या मराठी मुलींच्या शाळेत यांची तजवीज होण्यासारखी आहे. परंतु सोसायटीच्या कमिटींने ह्या गोष्टीकडे थोडे लक्ष पुरविले पाहिजे" ....... रमाबाईस परदेशी अनाश्रित स्थितीत संकटे भोगीत राहू द्यावे हे फारच अश्लांघ्य आहे ........ रमाबाईसारख्या प्रसिद्ध पंडितेची योजना एका शाळेवर होईल तर ज्या प्रौढ वयाच्या स्त्रियांची अधिक मराठी किंवा संस्कृत शिकण्याची इच्छा असेल त्यांची सोय होणार आहे. यत्न करून पहाणे हे आपले काम आहे. परंतु कमिटी अशा रत्नाचा लाभ आपल्या शाळांसाठी सुधारण्याविषयी कांही यत्न करील काय?" अशा प्रकारे रमाबाईस मुंबईस कसे आणिता येईल याची चर्चा सुरू झाली व स्वतः रमाबाईंनी तर "मला सर्व भरतखंडांतील स्त्रिया एकसारख्याच आहेत. जेथपर्यन्त माझ्या शरीरामध्ये रक्ताचा एक बिंदुमात्र आहे तेथपर्यन्त आपल्या जातीचे अर्थात स्त्री जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामात मी पराङ्मुख होणार नाही. आजपासून स्त्री जातीची सुधारणा करावयाची हे व्रत मी धारण केले आहे" अशी त्यांनी ढाका येथे प्रतिज्ञा केली. ढाका येथे असतानाच त्यांचा प्रिय बंधु परलोकस्थ झाला. ढाका सोडताना रमाबाईंच्या सन्मानार्थ स्त्रियांनी सभा भरविली होती. त्या ठिकाणी रमाबाईनी वरील प्रतिज्ञा केली.

अशा प्रकारे पंडिता रमाबाईनी स्त्री जातीची सुधारणा करण्याचे व्रत पत्करिले व मुंबईतील काही गृहस्थांनी येथे येऊन आपण स्त्री शिक्षणाचे काम हाती घ्यावे अशी त्यांस विनंती केली. हा विचार त्यांना पसंतही पडला. मुंबईस येऊन मग काय तो विचार मुकरर करावयाचा असे ठरले. इतक्यांत मुंबईत एक 'चमत्कारिक वर्तमान कळण्यात आले'! ते हेच की, ता. १३ ऑक्टोबर रोजी सिल्हट येथे तेथील जज्ज कोर्टातील वकील बाबू बिपिन बिहारीदास मेधावी एम. ए. बी. एल. ह्या गृहस्थाशी रमाबाईंचा विवाह होणार असून हा विवाह १८७२ च्या ३ ऱ्या आक्टान्वये रजिस्टर होणार आहे! अर्थात ही बातमी खरी ठरल्यामुळे मुंबईकरांच्या सर्व आशा मनातल्या मनात राहिल्या!

अनुक्रमणिका

परंतु ईश्वरी नेमानेमच काही निराळाच होता! रमाबाईनी संसारात पडावे आणि त्यांची प्रतिज्ञा तर खोटी होऊ नये असा योग असावा. काही महिने रमाबाईने संसार सुखाचा लाभ घेतला, सिल्हट येथे त्या अत्यंत लोकप्रिय झाल्या, त्यांस एक कन्या झाली, परंतु अशा प्रकारे संसार सुखाचा लाभ घेत असतानाच त्यांजवर आकाशाची कुऱ्हाड पुन्हा एकदा कोसळली! ह्यावेळी त्यांचे सर्वस्व जे त्यांचे यजमान बाबू बिपिन बिहारीदास मेधावी त्यांस काल-याचा उपद्रव होऊन त्यांजवर काळाने झडप घातली! रमाबाईंचा फिरता संसार उघडा पडला व त्या मुंबईस अखेरीस कशा आल्या हे व त्यांचे सर्व पूर्वचरित्र पुष्कळशाने त्यांच्या शब्दांत पुढील प्रकरणांत दिले आहे. त्यावरून कळून येईल.

अनुक्रमणिका

भाग तिसरा

# जीवन चरित्र

अनुक्रमणिका

# १.पूर्ववृत्त

पंडिता रमाबाई १८८२ साली पुण्यास येऊन दाखल झाल्या व आपल्या स्वीकृत व्रतानुसार कामास लागल्या. त्या बरोबर त्यांच्या विषयी ज्याप्रमाणे लोकांमध्ये अधिक आदर उत्पन्न झाला त्याचप्रमाणे ह्या बाई कोण? यांचे मूळ घर कोठे? ह्यांचे वडील जर जुन्या वळणातले तर त्यांचे शिक्षण इतके झाले कसे? याचा लोकांस उलगडा होईना. कोणी नाना प्रकारच्या गप्पा उठविल्या तेव्हा हे बरे नाही असे जाणून रा. रा. सदाशिव पांडुरंग केळकर ह्यानी पंडिता बाईस आपले वृत्त लिहावयाची विनंती केली. त्या विनंतीस मान देऊन पंडिता रमाबाईंनी आत्मचरित्र लिहिले व ते आमच्या सुबोध पत्रिकेमध्ये त्यावेळी प्रसिद्ध झाले. वस्तुतः पंडिता रमाबाई ख्रिस्ती झाल्या व आपल्या सदनांतील स्त्रिया विषयींची त्यांची धर्म संबंधाची तटस्थ वृत्ती नष्ट झाल्या दिवसापासून हिंदू महाराष्ट्र त्यांना व त्या हिंदू महाराष्ट्राला मुकल्या सारख्या झाल्या. तथापि त्यांचे चरित्र आजही महाराष्ट्रास अत्यंत बोधप्रद असे असल्यामुळे व ते सर्व कोठे स्वतंत्रपणे प्रसिद्ध न झाल्यामुळे नवयुगाच्या वाचकांसाठी रमाबाईंच्या आत्मवृत्ताच्या आधारे त्यांचे पूर्ववृत्त थोडक्यात या लेखाचा दुसरा भाग म्हणून आम्ही येथे सादर करितो.

“रमाबाईंचे वडिल अनंत शास्त्री डोंगरे हे घरचे संपन्न असून दक्षिण कानडा मंगळूर जिल्ह्यात पश्चिम घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या माळहेरबी नावाचे गावांत राहत असत. सुमारे बारा वर्षांचे वयात त्यांचे पहिले लग्न झाल्यानंतर कोणाला न सांगता ते घरांतून पळून शृंगेरी नांवाच्या शंकराचार्याच्या संस्थानात गेले आणि ब्रह्मीभूत नृसिंह सरस्वति शृंगेरी मठाचे अधिपती यांच्या बरोबर एका गुरूजवळ त्यांनी चांगल्या प्रकारे वेदाध्ययन केले. पुढे त्यांचे वय १८ वर्षांचे असता ते तसेच निघून पुण्यास आले आणि श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे गुरू कै. वे. शा. रामचंद्र शास्त्री साठे यांचे जवळ संस्कृत शास्त्राध्ययन करू लागले. ते पुण्यामध्ये शास्त्राध्ययनाकरिता सुमारे चार वर्षे राहिले होते. त्या वेळेस श्रीमंतांच्या वाड्यात त्यांचे रामचंद्र शास्त्र्यांचे शिष्य या नात्याने जाणे येणे असे. तेव्हा श्री बाजीराव साहेबांची पत्नी श्रीमती वासणसी बाईसाहेब यांस रामचंद्र शास्त्री हे पेशव्यांच्या सुचनेवरून संस्कृत रघुवंश काव्य शिकवित असत. सदरहू बाईसाहेबांची वाणी फार मधुर आणि शुद्ध असून त्या वाणीस माणिक कांचन योगाप्रमाणे संस्कृत भाषा, तशातून कालिदासाची कविता यांचा संयोग झाल्याने फारच सौंदर्य येई. बाईसाहेबांनी जेव्हा ते श्लोक म्हणावे त्यावेळेस रमाबाईंच्या वडिलांनी ते ऐकून फारच संतुष्ट व्हावे. तेव्हापासून त्यांनी आपले घरी जाऊन घरच्या स्त्रियांस संस्कृत भाषा शिकविण्याची प्रतिज्ञा केली. पुढे १८१८ इसवीत श्रीमंतांचे राज्य इंग्रजांनी घेतले तेव्हा ते पुण्याहून ब्रम्हावर्ताकडे रवाना झाले. त्यांच्या पाठीमागून रामचंद्रशास्त्री यांनी आपला प्रिय शिष्य अनंत यास “शास्त्री” असे उपपद देऊन मोठ्या दुःखाने त्यांस आपल्या घरी जाण्याची रजा देऊन आपण ब्रम्हावर्तास चालते झाले. मग अनंत शास्त्री परत आपल्या घरी गेले.

तेथे त्यांचे वडील आळशी असून गृहकृत्य नीट रीतीने चालवीत नसत म्हणून कार्य झाले होते. ते करण्यासाठी अनंत शास्त्री पुन्हा घरातून निघाले आणि म्हैसूर राजधानीस गेले. तेथे म्हैसूरचे महाराज कृष्णराज वडेर हे असून त्यांचे मुख्य राजा पंडित रामशेषशास्त्री द्रविड यांच्या पदरी होते. ते रामचंद्रशास्त्री साठे यांचे शिष्य अनंतशास्त्री यांवर अतिशय प्रीति करीत असत. त्यांनी अनंत शास्त्र्यांची आणि कृष्णराज महाराजांची गाठ घालून दिल्यावर अनंत शास्त्र्यांची विद्वत्ता पाहून महाराज खुष झाले आणि एकदम पंचवीस हजार रुपयांची देणगी अनंत शास्त्र्यांस दिली. महाराजांच्या मनाचा कल कांही विलक्षण असून ते मोठे उदार होते. म्हणूनच त्यांनी एवढी मोठी देणगी एकदम दिली असे वाटते. पुढे येऊन जाऊन दहा एक वर्षे अनंत शास्त्रांनी त्यांचे पदरी राहून काढिली. महाराजांनी त्यांस पहिल्या चालीप्रमाणे पालखी, चवऱ्या

अनुक्रमणिका

वगैरे उत्तम मान आणि पुष्कळ रुपये बक्षीस दिले होते. पुढे काही दिवसांनी वडिलांच्या मनात सहकुटुंब काशी यात्रा करण्याचे आल्यावरून कुटुंबांतील आणि इतर पुष्कळ माणसे बरोबर घेऊन अनंत शास्त्री आपल्या वडिलांबरोबर काशी यात्रेस निघाले. त्यांच्या बरोबर एक पालखी दोन गाड्या, बारा घोडे आणि भोई वगैरे चाकर आणि कुटुंबातील मिळून साठ माणसे होती. हे सर्व खटले वाटेत जाताना काही नुकसान होऊ नये, म्हणून जाताना अनंत शास्त्र्यांना आपल्या सहीचा एक 'रहदारी' नावाचा परवाना दिला होता. त्यांत त्यांनी अनंत शास्त्रांची माहिती देऊन या देशातील राजे राजवाडे, सरदार वगैरे बडे लोकांस वाटेने अनंतशास्त्रांचा चांगला बंदोबस्त ठेवावा अशी विनंती केली होती. हा परवाना घेऊन ते काशीस गेले तोच रस्त्यात त्यांची पहिली पत्नी यमुनाबाई ही संग्रहणी रोगाने वारली. ह्या बाईला संस्कृत शिकविण्याचा अनंतशास्त्री यांनी पुष्कळ प्रयत्न केला. आई बापांची त्यास अनुमती नव्हती व पत्नीही शिकावयास तयार नव्हती. त्यामुळे त्यांचे बेत जागच्या जागीच राहिले. तिच्या पोटी पुष्कळ मुले झाली होती त्यांपैकी एक मुलगी आणि एक मुलगा अशी दोन मुले मात्र वाचली.

नंतर काशी वगैरे त्रिस्थळी यात्रा करवून अनंत शास्त्र्यांनी आपल्या वडिलांस खटल्यासहित परत घरी पाठविले आणि आपण तेथील षटशास्त्र निष्णात प्रसिद्ध पंडित भाऊ शास्त्री. वियोग आणि प्रसिद्ध तैथ्याथिक गणेश शास्त्री दातार यांजपाशी राहून चार वर्षे सतत दर्शन शास्त्राचे अध्ययन केले. यापूर्वी अनंत शास्त्री शैवमतावलंबी असून अद्वैतवादी होते, परंतु न्यायदर्शनाच्या अध्ययनाने त्याचे अद्वैताचे बंड अगदी नाहीसे झाले. ज्या मनांत ईश्वराचा आणि प्राण्यांचा सेव्य सेवक भाव आहे असे मत त्यांस पसंत पडून पुढे त्यांनी तेथेच वैष्णव दिक्षा घेतली. नंतर ते नेपाळास गेले. तेथील राजाने त्यांचा सन्मान फार चांगल्या रीतीने केला आणि त्यांस एक पालखी, दोन हत्तीची पिले, एक कस्तुरी मृग नाजी समवेत (ते मृग शिकारीत मारून त्यांच्या शरीरांतील सर्व पदार्थ साफ करून त्यांत काही मसाला, गवत वगैरे भरून ठेवल्याने जशाचे तसेच रहातात) आणि पुष्कळ द्रव्य असे त्यांस बक्षीस देऊन पाठविले. तेथून परत येतेवेळी वाटेत हत्तीची पिले एकाएकी मरून गेली, परंतु त्यांच्या रेशमी आणि वनातीच्या झुली व कस्तुरी मृगाचे शरीर नेपाळच्या आठवणीकरिता पुष्कळ दिवसपर्यन्त ठेवलेली रमाबाईंनी लहानपणी पाहिली होती. नंतर अनंतशास्त्री गुजरात देशात पर्यटण करण्याच्या इराद्याने जात होते, इतक्यात पैठण मुक्कामी रमाबाईंचे मातामह माधवराव अभ्यंकर हे काशी यात्रेस चालले होते. त्यांची आणि यांची भेट झाली. अभ्यंकरांची कन्या अंबाबाई ही त्यावेळेस नऊ वर्षांची होती. माधवरावांस काल विपयत्वामुळे त्या वेळेस फार दारिद्र्य आले होते. सन १८१८ तील राज्य क्रांतीच्या लुटालुटीत वाई मुक्कामी लुटारू लोकांनी त्यांचे पुष्कळ द्रव्य लुटले. त्यांचे घर मूळचे वाईसच होते. माधवराव स्वतः काही दिवस पुणे मुक्कामी राहून इंग्रज सरकारचे पदरी चाकरी करीत असत. पुढे काही कारणावरून त्यांचे वरिष्ठांबरोबर वैमनस्य झाल्या कारणाने त्यांनी चाकरी सोडली. परंतु सरकारने मेहेरबानी करून त्यांचा देहांत होईपर्यन्त त्यांस पेन्शन चालू ठेवले होते. वर सांगितल्याप्रमाणे चाकरी सोडल्यावर त्यानी घरदार विकून कांही पैसे जमा करून साष्टांग नमस्कार घालीत काशी यात्रेस जाण्याचा बेत केला. त्याप्रमाणेच करीत ते पैठण पर्यन्त गेले. परंतु अशा अचाट श्रमाच्या कृत्याने त्यांचे अंग सुजून ते अंथरुणास डकले. पुढे कांही दिवस तेथे राहून ते बरे झाले. परंतु त्यांचे जवळ खर्चास काय ते चौदाच रुपये राहिले होते. अशा स्थितीत दोन लहान मुले आणि पूर्व गर्भी स्त्री बरोबर घेऊन कोठे जावे अशी काळजी करत असता पैठण मुक्कामी माधवरावांस अनंत शास्त्री भेटले. तेव्हा त्यांचे वय सुमारे ४४ वर्षांचे असून शरिर बलिष्ठ आणि चेहरा फार तेजस्वी होता. माधवराव त्यांस भेटले तेव्हा त्यांनी त्यांची सर्व माहिती विचारून ठेविली आणि त्यांची विद्वत्ता, रूप, गंभीर स्वभाव आणि संपत्ति हे सर्व गुण पाहून आपल्या उपवर झालेल्या कन्येचे अनंत शास्त्र्यांबरोबर लग्न करून दिले व आपण आपल्या धाकट्या कन्येस विवाहित कन्येबरोबर देऊन तिला पतीबरोबर पाठवून तसेच पुढे काशीस चालते झाले. इकडे अनंत शास्त्री अनायासे

लब्ध नव विवाहित वधुला तिच्या भगिनीसह घेऊन परत आपले घर माळहेरंबी येथे गेले. तेथे जाता क्षणीच लहानपणी पुण्यास असताना मनात धरलेला आपले घरांतील स्त्रियांस संस्कृत भाषा शिकविण्याचा हेतु सिद्धिस नेण्याचा उपक्रम केला. या पूर्वी त्यानी पुष्कळ देश पर्यटन करून जे ज्ञान मिळविले होते त्याच्या योगाने ते जुनाट चालीचे होते, तरी देवभोळेपणा त्यांच्या मनात अगदी नव्हता, त्यांनी आपल्या घरी होत असलेले कुळधर्म, भूतांच्या पुजा वगैरे वेडेपणाचे विधी चटसारे बंद करून टाकले होते. हरितालिका, चंपाषष्ठी, गणेश चतुर्थी वगैरे हिंदु लोकांची व्रते ते आपल्या घरांत कोणाला करू देत नसत. ते वैष्णव होते म्हणून तेवढ्या मनाच्या अनुरोधाने एक एकादशीव्रत मात्र करीत असत. बाकी भूत, प्रेत, पिशाश्च, ग्रह, देव, राक्षस वगैरेंच्या पूजा किंवा या न केल्यापासून त्याकडून होणारे उपद्रवांस ते तृणासारखेही मोजीत नव्हते.

या आपल्या तरुण पत्नीच्या शिक्षणासाठी अनंत शास्त्र्यांनी फार त्रास सोसले. घरांतील वडील माणसांची अनुमति नाही, एवढेच नव्हे तर विरोध, स्वतःपुरता विचार करण्याचे सामर्थ्य अद्याप पत्नीच्या ठिकाणी आलेले नाही. अशा स्थितीत त्यांनी तिच्या शिक्षणास निर्धाराने प्रारंभ केला. त्रास होऊ लागताच त्यांनी आपले घर सोडून ते रानांत एक झोपडी बांधून राहिले. प्रथम रानांत गेले. त्यावेळी तेथे झोपडीही नव्हती. पहिल्या रात्री पासोडी घुरगटून भीतीने गांगरलेली लक्ष्मीबाई डोळे झांकून पडली असता एक भला थोरला वाघ ही दोघे निजली होती त्याच्या आसपास येऊन मोठमोठ्याने किंकाळ्या फोडून आपले अस्तित्व अनुभवास आणून देऊ लागला! त्यावेळी ह्या नऊ वर्षांच्या लक्ष्मीबाईची भीतीने किती गाळण उडाली असली पाहिजे ह्याची कल्पना करावी! वर म्हटल्याप्रमाणे लक्ष्मीबाईनी पासोडीमध्ये आपल्याला गुंडाळून घेतले व अनंत शास्त्री रात्रभर पहारा करीत बसले! मग दुसऱ्या दिवशी त्यानी काटेकुटे जमा करून एक खोपट तयार केले व तेथे लक्ष्मीबाईंचे शिक्षण सुरू झाले. पुढे पुढे शहरांतील इतर विद्यार्थीही अध्यापनासाठी त्यांच्याकडे येऊ लागले व त्यामुळे त्यांची बरीच प्रसिद्धी झाली.

पत्नीस संस्कृत विद्या शिकवू लागल्या कारणाने आणि आपले पहिले मत बदलून नव्या मताचा स्विकार करून घरी कुलाच्या रीतीप्रमाणे चालू असलेल्या भूतप्रेतग्रहादिकांच्या पूजा बंद केल्याने त्यांच्या जातीचे लोक त्यांचा द्वेष करू लागले. परंतु त्या कृत्यास अनंत शास्त्र्यांनी न भिता आपला वर्तनक्रम यथास्थित चालू ठेवला. तेव्हा उडुपि (मध्वाचार्यांचे मुख्य स्थान) येथे त्यांच्या धर्मगुरुजवळ लोकांनी पुष्कळ चहाड्या सांगून त्यांस जातीबाहेर टाकण्याला सुचविले. गुरुंनी अनंत शास्त्र्यांस आपल्या मठात बोलावून जाति बहिष्कृत करितो असे सांगितल्यावर माझा काय अपराध आहे असे विचारल्यावरून स्त्रियांस संस्कृत (देववाणी) शिकविण्याचा अधिकार नसता तुम्ही आपल्या बायकोस शिकवून शास्त्र्याविरुद्ध आचरण करता हा तुमचा अपराध आहे असे सांगितले. त्यावर अनंत शास्त्र्यांनी मी बाबा – वाक्य प्रमाण मानीत नाही. मी शास्त्राविरुद्ध आचरण करितो असे आपण कशावरून समजला, आणि स्त्रीजनांकडून संस्कृताध्येयन करविणे जातिभ्रंशकारक पाप आहे असे कोणत्या धर्मशास्त्रांत आहे हे मला सांगावे असे म्हटल्यावर काही दिवसांनी त्या धर्मगुरुकडून शिरूर सोदे मुक्कामी एक मोठी पंडितांची सभा भरविण्यात आली. त्या ठिकाणी कर्नाटक प्रदेशातील प्रसिद्ध विद्वान आचार्य, शास्त्री आणि पुराणिक मिळून सुमारे चारशे लोक अनंत शास्त्र्यांच्या मताविरुद्ध वाद करण्यास तयार होऊन आले होते. त्यावेळेस अनंत शास्त्र्यांनी पुष्कळ श्रुती, स्मृति, संग्रह पुराणे आणि इतिहास (महाभारत आणि रामायण) यामधून स्त्रियांस शास्त्राध्ययन करण्याचा अधिकार आहे या अर्थाची वचने गोळा करून एक ग्रंथ लिहिला आणि तेथे सभेत जमलेल्या पंडिताबरोबर एकसारखा दोन महिने वाद करून शेवटी आपला पक्ष सिद्ध केला आणि आपण लिहिलेला ग्रंथ प्रमाण असून सर्वांस मान्य आहे. या अर्थाच्या सह्या त्यांतील दोन मुख्य विद्वानांकडून करून घेतल्या.

अनुक्रमणिका

तो ग्रंथ हस्तलिखित असून रमाबाईंनी पाहिलाही होता. परंतु या देशामध्ये छापखाने नसल्याकारणाने त्या ग्रंथाची प्रसिद्धी झाली नाही आणि वर्तमानपत्रे त्यावेळेस नव्हती. म्हणून सदरहू बड्या सभेची आणि वादाची हकीकत इकडे कोणाच्या ऐकण्यातही नाही. अनंत शास्त्र्यांनी ही हकीकत आणि ग्रंथ लिहून ठेवला होता म्हणून त्यांच्या मुलांस पहावयास मिळाला होता. परंतु मोठ्या दुःखाची गोष्ट ही आहे की तो ग्रंथ रमाबाईंच्या हाती आला नाही, नाही तर त्यांनी तो लोकांस सादर केला असता व त्यामधील काही उतारे घेतले असते किंवा सवड सापडल्यास तो ग्रंथ छापून प्रसिद्धही केला असता.

रमाबाईंचे तीर्थरुप सुमारे १८७१—७२ साली पुण्याहून कर्नाटक देशात परत गेले ते वेळेस त्यांनी पुष्कळ पुस्तके आणि इतर सामान पुणे मुक्कामी त्यांचे कोणी आप्त आहेत त्यावर विश्वासून त्यांचे घरी ठेविली, त्यामध्ये सदरहू ग्रंथ होता. आता अनंत शास्त्री वारले. आणि त्यांच्या कुलात मीच काय ती एकटी राहिलेली आहे म्हणून आमच्या वडिलांची पुस्तके मला कृपा करून आपण द्यावीत अशी रमाबाईंनी सदरहू गृहस्थांजवळ पुष्कळ वेळ विनंती केली तरी ती त्यांनी दिली नाहीत. बरे ती पुस्तके म्हणजे त्यांच्या कांही उपयोगाचीही नव्हती असे असून ती त्यांना कां मिळाली नाहीत ते कळत नाही.

असो. याप्रमाणे वादात जयी होऊन अनंत शास्त्री आपले घरी परत गेले. तेव्हापासून त्यानी सर्व लोकांस चांगले ओळखून ठेविले होते. पुढे त्यांनी कोणापाशी अन्नव्यवहार वगैरे संबंध ठेविला नाही. याचा हेतू जन समाजाचे त्यांच्यावर अधिपत्य चालू नये एवढाच होता. ते समाजाविरुद्ध कोणतेही कृत्य करू लागले आणि समाजाने जर त्यांस त्याने अडथळा केला तर ते स्पष्ट सांगत की “मी तुम्हांबरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध ठेविला नाही. तुम्ही माझ्या कामांत विनाकारण ढवळाढवळ करू नये. कर्तव्य आणि अकर्तव्य त्याचे ज्ञान माझ्या पुरते मला आहे. मी एका ईश्वराला भिऊन चालेन पण त्याज्य कृत्यात समाजाला भिऊन त्याच्या स्वाधीन होऊन राहाणार नाही. माझ्याशी समाजापैकी कोणाला वाटेल त्याने संबंध ठेवावा, नाही त्याने ठेवू नये.”

ज्या अरण्यात अनंत शास्त्र्यांनी आपला आश्रम स्थापिला त्यांस गंगामूल अरण्य म्हणतात. सदरहू अरण्यास गंगामूल अरण्य पडण्याचे कारण त्या ठिकाणी प्रसिद्ध तुंगा, भद्रा आणि नेत्रावती अशा नद्यांचा उगम आहे. गंगामूल ह्या अरण्यात तुंगभद्रेचा उगम पहाण्यासाठी मधून मधून यात्रेकरू लोक जात असतात. परंतु तेथे अनंत शास्त्री गेले त्यावेळी कोणाची वस्ती नव्हती. सुमारे सहा कोस आसपास बळगी नावाच्या अत्युच्च वृक्षांची किर्र झाडी आहे आणि त्या जंगलात वाघ, अस्वले, रानडुकरे, वनगाई, लांडगे, कोल्हे वगैरे क्रूर श्वापदे पुष्कळच आहेत. पहिल्याच दिवशी वाघ्या संबंधाचा अनंत शास्त्र्यांचा अनुभव वर आलाच आहे.

त्या ठिकाणी वर्षातून ८ महिने सतत पाऊस पडत असतो. यात्रेकरू लोक तेथे जातात पण तीन दिवसांहून जास्त दिवस तेथे राहात नाहीत. कारण तेथील देवांना व ऋषींना ते खपत नाही. देवाकडून वाघ वगैरे क्रूर प्राणी खावयास येतात. वणवा पेटतो असा यात्रेकरूंचा समज आहे! परंतु अनंत शास्त्री असल्या बांडावर विश्वास ठेवणारे नव्हते. त्यांनी हळूहळू त्या अरण्यात आपला संसार सुंदर रीतीने थाटला. डोंगराच्या माथ्यावर सपाट जमीनीत सुमारे एक मैल औरस चौरस जागेतील जंगल कापून जागा स्वच्छ करविली आणि तुंगा नदीच्या तीरी स्वतःला राहाण्यासाठी घर बांधविले. त्याचप्रमाणे आल्यागेल्या यात्रेकरूंसाठी आणि आपल्या शिष्यवर्गासाठीही त्याने बांधविले. जेथे पूर्वी भयंकर वन होते तेथे एक टुमदार गांव त्यानी बसविले. जेथे वाघासारख्या हिंस्त्र पशूपासून बचाव करण्यासाठी प्रथम दिवशी अनंत शास्त्र्यांना रात्रभर पहारा करावा लागला तेथे शंभर सव्वासे गुरे, ७ — ८ कुटुंबांतील माणसे स्वतःच्या कुटुंबांतील २०

– २१ माणसे व विद्यार्थी आनंदाने, सुखाने व निर्भयतेने वावरू लागले. या ठिकाणी लक्ष्मीबाईनी एक लहान व सुंदर बगीचा केला होता. त्यांत तिने चाफा गुलाब व इतर फुलझाडे त्याचप्रमाणे आंबे फणस वगैरे फळझाडे स्वतः लाविली होती. १८८२ सालपर्यन्त तरी ती तेथेच असून रमाबाईंनी म्हटल्याप्रमाणे मातुश्रीच्या सदाचरणाबद्दल व वडिलांच्या धैर्याबद्दल साक्ष देत होती! पुढे त्यांचे काय झाले. हल्ली तेथे जंगल माजले आहे किंवा कसे ते कळावयास आज मार्ग नाही. गंगामूल अरण्यात वास असेतोपर्यन्त संसाराचे सर्व काम लक्ष्मीबाईवरच पडत असे. तथापि एवढ्या मोठ्या खटल्याचे काम ती एकटी दक्षतेने पहात आली. पुढे यांच्या दक्षतेची अनेक पट वाढ रमाबाईमध्ये झाल्याचे दिसून आले. लक्ष्मीबाई १०० – १२५ गुरे, २० – २१ माणसे संसार पहात होत्या, पण रमाबाई तर एकेकाळी तीन हजार मुलींचा संसार पहात होत्या! अनेक कुटुंबे स्वतः जमवून आणीत होत्या व सर्वांचा योगक्षेम स्वतः पहात होत्या. मातुश्रीच्या दक्षतेचीही कन्येमध्ये झालेली अशी वाढ कोठे आढळली आहे काय?

रमाबाईच्या मातुश्री विषयी एक विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे की एवढ्या मोठ्या खटल्याचे काम ह्या स्वतः जरी चालवीत होत्या तरी त्यानी आपले ज्ञानार्जनाचे पवित्र कार्य सतत चालू ठेविले होते. रात्रंदिवस मेहनत घेऊन संस्कृत व्याकरण व न्याय शास्त्र यांचा त्यांनी फार चांगला अभ्यास केला; इतका की अनंत शास्त्री काही विशेष कामासाठी जेव्हा परगावी जात त्यावेळी शिष्यांना पाठ देण्याचे काम स्वतः लक्ष्मीबाईच करीत असत! त्या ठिकाणी अनंत शास्त्री १२ वर्षे राहिले व त्यांस सहा मुले झालीपैकी तीन मुलगे लहानपणीच वारले. ज्येष्ठ कन्या तुंगभद्रा उर्फ कृष्णाबाई पुत्र श्रीनिवास उर्फ नारायण व रमाबाई ही मागे राहिली. रमाबाईचा जन्म गंगामूल अरण्यात शके १७८० साली (सन १८५८ एप्रिल महिना) वैशाख शुक्ल दशमी रोजी प्रातःकाळी झाला. कृष्णाबाईंच्या बाबतीत अनंत शास्त्रांची फार मोठी निराशा झाली. आपल्या पत्नीला ज्याप्रमाणे आपल्याला सुशिक्षण देता आले त्याप्रमाणे आपल्या मनाप्रमाणे आपल्या मुलीचे शिक्षण चालवावे असा त्यांनी विचार चालविला होता व शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून निदान २० – २१ वर्षेपर्यंन्त तिचे लग्न उरकून घ्यावयाचे नाही असा ते निश्चय करित होते. तो ही बातमी त्यांच्या मातुश्रींच्या कानी गेली. आपल्या मुलाचा हा विचार त्या म्हातारीला बिलकुल पसंत पडला नाही. प्रत्यक्ष आपल्या सूनेचे शिक्षण झालेले तिने पाहिले; आपल्या मुलाकडे येणाऱ्या विद्यार्थ्यास आपल्या सूनबाई पाठ देत अशतात हे म्हातारीही पहात होती. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अनर्थ कोसळल्याची जागृती नव्हती. तरी पण कृष्णीचे आधी लग्न उरकून घे, माझ्या देखत ती उजविली जावो असा म्हातारीने हट्ट घेतला व अनंत शास्त्री त्यास बळी पडले! परंतु आपल्या दृष्टीने त्यानी एक मोठी खबरदारी घेतली होती. आपल्या मुलीच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यानी कृष्णाबाईच्या नवऱ्यास आपल्या कुटुंबातच ठेऊन घेतले व दोघांच्याही शिक्षणास प्रारंभ केला. परंतु जावई बोवांनी लवकरच आपले खरे स्वरूप दाखववायस सुरुवात केली, त्यानी अभ्यास न करण्याचे व्रत उचलले, वाईट संगतीला ते लागले व एके दिवशी घरदार सोडून पळून गेले! या जावयाने असा प्रकार केला तर वडील जावयाने कृष्णाबाईची सावत्र बहिण सासऱ्याला धुळीला मिळविण्याचे मार्ग पत्करिले! अनंत शास्त्री गंगामूल अरण्यात रहात. त्यांना शहरातील वडिलार्जित मिळकतीची व्यवस्था पहावयास फावस नसे; म्हणून त्यांनी जावईबोवांस कुलमुखत्यावर नेमिले. जावईबोवा शिरजोर झाले, त्यानी कर्ज केले, वाईट छंद त्याना लागले व ते सर्व कर्ज निवारण्यासाठी अनंत शास्त्र्यांना आपल्या वाट्याचा भाग विकून टाकावा लागला. याचवेळी रमाबाईच्या सावत्र भावाने भांडून आपला अर्धा हिस्सा घेतला. त्यामुळे सर्व कर्ज वारण्यासाठी शास्त्रीबोवाजीना आपल्या सर्व घरादारावर तुळशी पत्रे ठेवून मुलांबाळासह बाहेर पडावे लागले. येथपासून अनंत शास्त्र्यांच्या कुळाला उतरती कळा लागली. लक्ष्मीबाईनी आपल्या मुलीच्या-रमाबाईच्या शिक्षणाची मुळीच हयगय होऊ दिली नाही. प्रवास करित असताना त्यांना पुष्कळ पैसे मिळत त्यांचा मानसन्मानही होई; परंतु हा पैसा त्याचेजवळ

राहिला नाही. रमाबाई म्हणतात एकदा तर आमच्या वडिलांना "एक लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांचा फायदा झाल्याचे मला आठवते" हे एवढे रुपये कोठे गेले व त्या कुटुंबाला गावोगाव अखेरीस फिरावे का लागले याचा खुलासा आम्हाला उपलब्ध माहितीच्या आधाराने करिता येत नाही. एवढे खरे तथापि अनंत शास्त्र्यांच्या हातून झालेल्या आणखी एका चुकीचा येथे उल्लेख केला पाहिजे. कृष्णाबाईचा २०-२१ वर्षेपर्यन्त विवाह करणे बरे नाही असे त्यांस वाटत होते व आपण होऊन रमाबाईच्या विवाहाचा विचार करावयाचा नाही. असा ज्यांनी निश्चय केला होता त्याच अनंत शास्त्र्यांनी प्रवासात असताना आपल्या मुलाचे श्रीनिवासाचे लग्न त्याच्या १८ व्या वर्षी त्याला पसंत नसणाऱ्या मुलीशी उरकून घेतले! अनंत शास्त्र्यांच्या हातून ही चूक कशी झाली याचा मात्र उलगडा रमाबाईना करता आला नाही. या कुटुंबाने सात वर्षे गोगलगायीप्रमाणे आपले बिऱ्हाड पाठीवर ठेवून काढिली. पुढे पुढे तर सर्वांचे अतिशय हाल झाले. अनंत शास्त्र्यांचा वृद्धापकाळ झाला, त्यांची दृष्टी नष्ट झाली ज्या कुटुंबामध्ये शे – सव्वाशे ढोरे होती, तेथे आता मध्यान्हाची पंचाइत पडू लागली!

ह्या आपत्तीच्या काळात ह्या कुटुंबाने दिवस कसे काढले ह्याचे वर्णन वाचून आज अंगावर शहारे उभे राहतात. देवाने पुन्हा चांगले दिवस दाखववावे म्हणून जवळचा पैसा दानधर्मात खर्च करणारे कुटुंब दूरदर्शी असे कोण म्हणेल? दूरदर्शित्व अथवा परहित हानी न करिता स्वार्थाची जोपासना करणे हे गुण ह्या कुटुंबापैकी एकाही व्यक्तीत नव्हते. दोघी मुली व मुलगा ह्यांचे शास्त्रज्ञान पुष्कळ होते. भागवताचे हजारो श्लोक रमाबाईच्या मुखोद्गत होते आणि रा. श्रीनिवास हे तर चांगले शास्त्री होते; पण अशा आपत्तीच्या वेळी विद्वत्तेचा बोज राखलाच जर जाता तर कोणीही विद्वान मनुष्य केव्हाही गरिबीत नसता! असो. देवाना नवस कर, तीर्थयात्रा कर, दानधर्म कर ह्यात होते नव्हते ते पैसे घालविल्यावर काळ कठीण आला! जवळचे धान्य संपले! ११ दिवस ११ रात्री झाडाचा पाला, खजुरीच्या थोड्या बिया व पाणी ह्यावर दिवस कंठिले, सर्व माणसे दिवसेंदिवस अधिकाधिक अशक्त होऊ लागली आणि मरणावाचून दुसरा मार्ग नाही असे वाटू लागले. सर्वांना मरण बरे वाटू लागले! सर्व मरणास तयार झाली, परंतु अनंत शास्त्री सर्वांत वडील म्हणून त्यांनी जलसमाधी घेण्याचा विचार कायम केला? जलसमाधी म्हणजे आत्महत्या नव्हे. त्यांनी कुटुंबातील सर्व व्यक्तींची एकामागून एक रजा घेतली व अखेरीस रमाबाईची पाळी आली. डोळ्यांनी दिसत नव्हते. तरी रमाबाईंना घट्ट धरून म्हाताऱ्याने कुरवाळीले व खोल गेलेल्या आवाजात त्यांनी पुढील आशयाचे उद्गार काढिले. "बाळे, मी तर आता जातो. परंतु माझे तुजवर किती प्रेम आहे. याचे नित्यस्मरण ठेव, जे सत्य, नित्य व धर्म्य आहे तेच तू आचार. तू जर जगली वाचलीस तर नित्य देवाच्या मार्गात रहा व नित्य देवाची सेवा करणे हेच तुझे ध्येय असू दे. तू माझे ज्याप्रमाणे शेवटले बालक त्याचप्रमाणे तू सर्वांहून अधिक प्रिय आहेस, तुला मी देवाच्याच स्वाधीन केले आहे, तोच तुझे रक्षण करील, त्याचीच तुझ्यावर सत्ता आहे आणि त्याचीच तू नित्य सेवा केली पाहिजेस" हा प्रकार श्रीनिवासास पहावेना. त्याने वडिलास जलसमाधि घेऊ दिली नाही, व वाटेल ती मोल मजुरी करून कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याचा त्यानी निश्चय केला व हे कुटुंब काही कालासाठी जे रानात गेले होते ते शहराकडे आले. वाटेत एक देऊळ लागले. तेथे मुक्काम करावयाचा विचार केला, कारण उपाशी पोटी पुढे पाऊल पडणे शक्य नव्हते. त्यांची इतकी करुणाजनक स्थिती होती तरी देवळाचे रक्षण करणाऱ्या ब्राह्मणाला त्याची दया आली नाही व त्याने देवळातून त्यांना हाकून लावले!

अशा कष्टमय स्थितीत असतानाच म्हाताऱ्याने परलोकाची वाट धरिली! श्रीनिवास व रमाबाईने काबाडकष्ट करून आपली उपजीविका करावी! इतक्यात रमाबाईच्या सर्व कर्तृत्व शक्तीचे मूळ जी त्यांची मातुश्री श्री लक्ष्मीबाई त्यांनी अंथरुण धरले! पैसा टक्का जवळ नाही. भरपूर दूध नाही, लोकांची मदत नाही.

अनुक्रमणिका

अशा स्थितीत भुकेने व वळवळणाऱ्या मातुश्रीसाठी एक भाकरीचा चतकोर मागण्यासाठी रमाबाईना शेजाऱ्याच्या घरी याचना करावी लागली! माझी आई फार आजारी आहे. तिच्यासाठी थोडी भाकर द्याल काय? असे डोळ्यात आसवे आणून म्हणताना रमाबाईच्या मनामध्ये किती विचार आले असतील? आपले पूर्व वैभव कसे दृष्टीपुढे आले असतील. याची आज आपण केवळ कल्पनाच केली पाहिजे. मृत्युची वाट पहात असलेली ती बाई भाकरीच्या तुकड्यासाठी कोठे थांबणार? ती मरणोन्मुख स्थितीत असताना भाकर आली आणि पुढे लक्ष्मीबाईचे प्राणोत्क्रमण झाले! पण पुढील व्यवस्था कशी लावावयाची हे ह्या पुढे दोन उघड्या पडलेल्या मुलांना कळेना! कोणाचे साहाय्य नाही, पैशाचे पाठबळ नाही. रायचूर शहरात लोकांची ओळख नाही अशा स्थितीत चार माणसेही मिळविण्याची पंचाइत पडली! कोणा शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या हातापाया पडून दोघे गृहस्थ खांदा द्यावयास पुढे आले आणि श्रीनिवास आणि रमाबाई यानी खांदे देऊन आपल्या मातुश्रीची प्रेत यात्रा काढिली! तीन मैल पल्ला चालावयाचा असल्यामुळे आणि रमाबाई ढेंगण्या असल्यामुळे त्याना आपल्या डोईवर तिरडी ठेवून चालावे लागले. ह्या नंतर पिता व माता ह्यांच्या मृत्युनंतर उघडी पडलेली ही मुले प्रवासास निघाली. प्रवास करीत असता उपजीविकेसाठी त्यानी वाटेल ते काम करावे, कधी काम मिळे, कधी उपवास काढावे लागे. अशा स्थितीत ही बहिण भावंडे कलकत्ता शहरी आली. तेथे आल्यावर त्यांच्या उर्जित कालास पुन्हा एकदा प्रारंभ झाला. आता रमाबाईचा सर्व प्राण आपल्या बंधूमध्ये अडकलेला होता. श्रीनिवास शास्त्री चांगला पढलेला विद्वान, धर्मनिष्ठ ब्राह्मण होता. परंतु प्रवासाच्या दगदगीने, विवंचनेने त्याची प्रकृति ढासळली व डाक्का येथे असताना आपल्या आवडत्या बहिणीला या अफाट जगामध्ये अगदी एकटी टाकून त्यास जावे लागले. पंडिता रमाबाईवरील कोणते दारुण प्रसंग! श्रीनिवास शास्त्री फार दिवस आजारी नव्हते; परंतु आपल्या आजाऱ्याच्या काळजीपेक्षा रमाबाईचे कसे होईल, तिचे संरक्षण कोण करील, संकटामध्ये तिला सहाय्य कोण करील ह्याच काळजीमध्ये तो होता व त्याने असे बोलूनही दाखविले. त्यावेळी धीर देऊन रमाबाई त्याला म्हणाल्या "दादा! तू असा काळजी कशाला करतोस? तुझी व माझी काळजी त्या पराशर परमेश्वराला आहे. तू काळजी करू नकोस." अशा प्रकारे संकटामध्ये असताना रमाबाईना परमेश्वराचाच आधार होता. त्यात काही अतिशयोक्ति नाही. त्याना परमेश्वर आपल्या समवेत आहे. त्याचा आपल्याला आधार आहे, तो आपल्याला संकटात हात देत आहे. असा अनुभव येत होता व तसे त्यानी लिहूनही ठेविले आहे.

Indeed in my loneliness it seemed as if God was near me I felt His presence.

अत्यंत घोर अशा संकटाच्यावेळी रमाबाईंना आपल्याला देवाचा आधार आहे असा प्रत्यक्ष अनुभव येत असे. १९ महिने आपल्या पतिसमवेत आनंदाने घालविल्यावर कॉलेराच्या उपद्रवाने त्यांचे पति जेव्हा परलोकवासी झाले तेव्हासुद्धा त्यांना हा अनुभव झाला व त्यांनी त्या वेळेचाही आपला अनुभव लिहून ठेविला आहे :--

The great grief draw me reared to God. I feel that He was teaching me and that if I was to come to Him. He must Himself draw me.

अशा प्रकारे निरनिराळ्या संकटांचा अनुभव घेत घेत अखेरीस आपली विवाहपूर्वीची प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी पंडिता रमाबाई आपली कन्या मनोरमा हीस घेऊन १८८२ साली येवून दाखल झाल्या.

अनुक्रमणिका

## २. पुण्यास आल्यानंतर

थोड्या दिवसापूर्वी पुणेयेथे तेथील कलेक्टर मि. हडसन यांच्या अध्यक्षतेखाली पंडिता रमाबाईंच्या संबंधाने एक सभा भरली. तीत प्रो. कर्वे ह्यांचे झालेले भाषण अत्यंत परिणामकारक होते. रमाबाईंचा उद्योग पाहून आपल्याला स्फूर्ति झाली असे त्यांनी सांगितले. परंतु त्यांना असेही सांगितले की, अनंत शास्त्र्यांनी रमाबाईना अविवाहित ठेवण्याचे ठरविले होते म्हणून त्यांनी त्यांचे पंढरपूरच्या विठोबाशी लग्न लावून दिले होते! ही गप्प कशी उठली त्याचा खुद्द रमाबाईनाच अचंबा वाटत असे, म्हणून त्यांनी स्वतः त्या संबंधाने आपले विचार स्पष्टपणे नमूद केले आहेत तेच येथे देणे अगत्याचे आहे. पंडिता रमाबाई म्हणतात:--

"आमचे वडिल होते तोपर्यंत पुष्कळ श्रीमंत आणि विद्वान गृहस्थांकडून मजकरतां मागण्या येत असत आणि त्या त्या स्थळी माझे लग्न करून द्यावे म्हणून पुष्कळांचा आग्रह पडे. तरी वडिलांची पूर्वीची प्रतिज्ञा-मुलगीस ज्ञान झाल्यावाचून आणि तिची खुषी असल्यावाचून स्वतःच्या मर्जीत तिचे लग्न करून द्यावयाचे नाही-चालविण्यात त्यांचे पाऊल मागे पडले नाही. ह्या त्यांच्या लोक विलक्षण कृत्यांबद्दल त्यास स्वजनांकडून आणि समाजाकडून फार त्रास सोसावा लागला. तरी ते निस्पृह असल्याकारणाने व कोणाशी कोणत्याही प्रकारचा व्यावहारिक किंवा इतर संबंधाने ठेवीत. लहान म्हणून समाजाने त्यांचे काही एक करवले नाही. कोणी कोणी अशी कल्पना करितात की, आमचे वडील हे ज्योतिष शास्त्रात निष्णात होते. त्यांनी माझ्या जन्मपत्रिकेत मला वैधव्य योग (सप्तम स्थानी मंगळग्रह असणे) होता म्हणून माझे लग्न मुळीच न करण्याचा निश्चय केला आणि पंढरीच्या विठोबाबरोबर माझे लग्न करून दिले! ह्या कल्पनांमध्ये काडीमात्रही सत्यांश नाही. कारण आमचे वडील देवभोळेपणाचे व भूते, ग्रह वगैरेंचे उपद्रवास मुळीच जुमानीत नव्हते. खुद्द आमच्या मातुश्रींच्या जन्मपत्रिकेत वैधव्य योग असून त्यांनी तिच्याबरोबर विवाह करून घेतला होता. तशीच महाराष्ट्र, कर्नाटक व द्रवीड या देशांतून भुतें, ग्रह, देवी, देव वगैरेंच्या मुलांस सोडून देण्याची चाल आहे. ही शुद्ध वेडेपणाची आहे असे ते म्हणत असत. असे असून ते स्वतः तसे कृत्य करितील हे कितपत खरे असावे? बरे, जर त्यांनी आपल्या मुलीला देवालाच अर्पून दिली तर मग तिला आपले घरी न ठेवता सोडून का नाही दिले? पंढरपूरास किंवा द्वारकेस त्यांनी आपल्या मुलीला देवास समर्पण करून देताना कोणत्या मनुष्याने पाहिले आहे? जर त्या देवळांमधून देवास त्यांनी आपली मुलगी एखाद्या स्थावर मालमत्तेप्रमाणे भेट केली तर ती परत घेण्याचा त्यांचा काय अधिकार होता? वर लिहिलेल्या लोकांच्या अदृष्टश्रुत कल्पना माझ्या कानी आल्या म्हणजे लोकांच्या डोक्यातून अशा विलक्षण कल्पना उद्‌भवतात ती कशा म्हणून मला फार चमत्कार वाटतो. जे लोक लोकांच्या तोंडून उडत असणाऱ्या भलभलत्या गप्पा ऐकून माझी माहिती लोकांस देऊ इच्छितात किंवा देतात त्यांनी तसे करू नये. अशी त्यास माझी विनयपूर्वक सूचना आहे. कारण माझी पक्की माहिती पहिल्यापासून शेवटपर्यंत ज्यांस आहे असे माझ्यावाचून दुसरे मनुष्य ह्या जगात मिळणार नाही. जी गोष्ट माझ्या वडिलांच्या किंवा मातुश्रींच्या तोंडून मी कधी ऐकिली नाही, आणि त्यांनी करिताना पाहिलीही नाही अशी जर लोकांनी ती आम्ही पाहिली किंवा ऐकली आहे असे बळेंच म्हटले तर त्यास काय म्हणावयाचे? पंडिताबाईंची या बाबी संबंधाने इतकी खात्री असतांना प्रो. कर्वेसारख्यांचा वर म्हटलेला समज कसा झाला ह्याला आमच्या दृष्टीने एकच उत्तर आहे. अनंतशास्त्री जलसमाधी घ्यावयास सिद्ध झाले त्यावेळी त्यांनी मी तुला देवाच्या स्वाधीन केले आहे. त्याचीच तुझ्यावर सत्ता आहे व त्याचीच तू सेवा केली पाहिजेस. असे जे उद्‌गार काढले त्यामुळे लोकांचा हा गैरसमज झाला असावा असे आम्हांस वाटते. परंतु गैरसमजास काहीही कारण असले तरी स्वतः पंडिता रमाबाईनी जे उद्‌गार काढले ते सुदैवाने आज आपल्यापुढे आहेत व त्यावरून ह्याबाबतीत तथ्य नाही यांत काही संशय नाही असे सिद्ध होते. पंडिता रमाबाईनी पुण्यास आल्यावर मी चार मोठी कामे केली त्यावरून

अनुक्रमणिका

त्यांची महाराष्ट्रास चांगली ओळख पटली. कोणत्याही एका शाळेच्या शिक्षकीण होऊन आपल्या कर्तृत्वशक्तिला अकुंचित करणे अगर गारंटी देणे हे त्यांस पसंत पडले नाही. त्यांनी लोकांमध्ये स्त्री शिक्षणाविषयी जागृत करण्यास आरंभ केला. हिंदू समाजाची जी अत्यंत केविलवाणी स्थिती झाल्याचा त्यांना अनुभव आला होता ती स्थिती घालविण्यासाठी स्त्रियांत ज्ञानसंपन्न करणे हा एकच उपाय आहे असे त्यांचे निश्चित मत होते, म्हणून स्त्रियांना व पुरुषांना जागे करण्याचा त्यांनी क्रम सुरू केला. अशा एका व्याख्यानात त्यांनी असे बोलूंन दाखविले की, "हल्लींची स्त्रियांची स्थिती फारच शोचनीय आहे. त्यास विद्या नाही, ज्ञान नाही, कोणी म्हणतात त्यास विद्या शिकवून मग पुरुषांनी काय करायचे? पण हल्ली पुरुषांची तरी स्थिती कोठे चांगली आहे? ते केवळ लाकडाच्या बाहुल्याप्रमाणे होऊन दास्यत्वात पडले आहेत. हे पुरुषत्वाचे लक्षण नव्हे, स्त्रियांची स्थिती सुधारली असता पुरुषांची स्थिती सुधारेल. ज्या देशातील स्त्रियांची स्थिती सुधारते त्याच देशाची एकंदर स्थिती सुधारते. जशा स्त्रिया असतात तशी त्यांची संतती होते. हल्ली स्त्रियांची स्थिती पाहिली तर त्यांच्यात कित्येक दुर्गुण शिरले आहेत. त्या सासुरवासात असल्यामुळे खोटे बोलण्याची त्यास संवय लागते व ती मग संवय पुढे मुलांस लागते. अशारितीने देशांतील लोक सत्य, तेज व साहसहीन होतात. आपण सर्वांनी सत्याचे व्रत धरले पाहिजे व ते आमरण चालविले पाहिजे. कोणास वाटेल की, आम्ही स्त्रियांनी काय सुधारणा करावी. आम्ही पडलो परतंत्र. तर मी त्यांस असे सांगते की, आम्ही स्वतंत्र आहों, आम्ही आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण मात्र केले पाहिजे. आमच्यापेक्षा पुरुषास जास्त हक्क अगर स्वातंत्र्य असण्याची काही एक जरूरी नाही. सध्या पुरूष आमच्यावर अधिक हक्क अम्मल चालवित आहेत व आम्हांस घरांतील इतर वस्तुप्रमाणे लेखीत आहेत. ह्या स्थितीतून आम्ही आपला उद्धार करून घेण्यास झटले पाहिजे. आपण सर्वांनी मिळून एक सभा स्थापन करावी असा माझा हेतु आहे. कोणास वाटेल की, हे पुरुषांच्याविरुद्ध बंड आहे आणि पुरुषांच्याविरुद्ध काही करणे हे पाप आहे. त्यास माझे असे उत्तर आहे की, आपण हल्ली पुष्कळ मोठे पाप करीत आहो. पुष्कळ पुरूष वाईट गोष्टी करितात. आपण त्याविषयी निषेध न करितां स्वस्थ बसतो हेच मोठे पाप आहे. आपणास अनितीची किंवा अन्यायाची गोष्ट करावयाची नाही तर न्याय व नीती ह्यांस अनुसरूनच चालावयाचे आहे. द्रव्यसहाय्य करणे हेही आपल्याला कठीण नाही. उगीच काहीतरी भाकड कथा सांगणारे जे पुराणिक त्यास आम्ही स्त्रिया द्रव्य पुरवीत असतो. त्यांच्या कुटुंबास दागदागिन्यांनी मढवितो. त्यातुनच अशा सभेच्या कार्यासाठी थोडे द्रव्यसहाय्य करावयाचे मनात आणिल्यास ते मुळीच जड जावयाचे नाही."

**आर्य महिला समाजाची स्थापना**

अशा प्रकारे सर्व महाराष्ट्रामध्ये त्यांनी चळवळ करून प्रथम पुणे येथे आर्य महिला समाजाची स्थापना केली. आज मुंबई शहरात आर्य महिला समाज ह्या नावाची ती संस्था आहे. ती रमाबाईंनीच १८८३ साली स्थापन केलेली होय. ह्या संस्थेचे मुख्य उद्देश व साधारण नियम पुढीलप्रमाणे होते :-- (१) आम्हा स्त्री-वर्गाचा अभिलाष पूर्ण होण्याकरता स्थापन केलेल्या ह्या समाजाचे नाव आर्य महिला समाज असे ठेविले आहे. (२) भारत वर्षातील सर्व सभ्य स्त्रियांस फार दिवसांपासून चालत आलेल्या अंध परंपरेच्या चालीप्रमाणे जे (बाल्यावस्थेत विवाह करणे, अज्ञत्वामुळे पराधीन व दास्य स्थितीत रहाणे वगैरे) अत्याचार होत आहेत त्यापासून स्त्रियांची मुक्तता करण्याकरिता आणि स्त्रियांच्या धर्म, नीती व व्यवहार वगैरेची हल्ली असलेली शोचनीय स्थिती जाऊन पुढे त्यांची उन्नती व्हावी याकरिता झटणे हे दोन त्या समाजाचे मुख्य हेतू होय. (६) ह्या समाजाद्वारे होणारी सर्व कृत्ये व्यक्ति विशेषाची नसून सार्वजनिक आहेत. यास्तव समाजाच्या सभासदांनी काही विशेष आग्रह किंवा पक्षपात करू नये. (७) या समाजात सर्व सभासदांचा सारखा अधिकार आहे. म्हणून कोणी कोणाच्या जाती, कुल, धन इ. पदावर नजर देऊ नये. (१३) या समाजाचे

सभासद व्हावे अशी ज्या स्त्रियांची इच्छा असेल त्यांनी या सार्वजनिक कृत्यामध्ये पक्षपात आणि दुराग्रह सोडून "आमचा प्राण आहे तोपर्यन्त आम्ही आमच्याने होईल तितके सहाय्य करू अशी सर्वसाक्षी परमेश्वराला आणि धर्माला स्मरून प्रतिज्ञा केली पाहिजे.

अशा प्रकारच्या सभा स्थापन केल्याने स्त्रियांमध्ये थोडीबहुत जागृती झाली, पण कार्य विशेष झाले नाही व आज मुंबईच्या समाजाचे हेतू व नियमही थोडे बहुत बदलले आहेत हा समाज स्थापन करण्याच्या पूर्वी पंडिता बाईंनी जे विचार प्रदर्शित केले ते व वरील नियम ह्याचे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, पुरुष आपले हक्क हिरावून घेत आहेत. ते आपल्याला पुन्हा मिळवावायचे आहेत. असा समज हे विचार व नियम करू पहातात. परंतु रमाबाईंना पुरुषांनीच पुढे आणिले. नवीन विचारांची माणसेच त्यांचा गौरव करू लागली. केशवचंद्रसेन, आनंदमोहन बोस इ. गृहस्थच त्यांच्या प्रसिद्धीस कारण झाले. पुण्यास आल्यावर रानडे; भांडारकर, मोडक वगैरे गृहस्थांच्या सहाय्याने त्यांना चळवळ करता आली. सदाशिव पांडुरंग केळकरांच्या आग्रहाने त्यांनी आपले पूर्वचरित्र लिहून काढले व त्यास प्रसिद्धी मिळाली. स्त्रियांच्यासंबंधाने अन्याय होत आहे हा विचार प्रथम विद्याविभुषित पुरुषांनाच सुचला; तेच स्त्रियांना ज्ञानद्वारे मुक्त करू लागले, तेच त्यांच्या सुधारणेसाठी झटू लागले; मग बंडाचा अविर्भाव कशाला? ही गोष्ट त्याचवेळी पंडिता रमाबाईंच्या ध्यानी आणून दिली होती; आणि म्हणूनच त्या विलायतेस गेल्यानंतर मुंबईच्या समाजाने आपले हेतू व नियम त्यास थोडे सौम्य स्वरूप दिले असावे.

रमाबाईंची विलायतेस जाण्यापूर्वीची तिसरी मोठी कामगिरी म्हणजे हंटर कमेटीपुढे त्यांची पुण्यास झालेली साक्ष ही होय. १८८२ साली सप्टेंबर महिन्यात हे कमिशन पुण्यास गेले. तेथे गेल्यावर पंडिता रमाबाईंची कीर्ती कमिशनचे अध्यक्ष डॉ. हंटर यांच्या कानी गेली व त्यांचा चाललेला उद्योग, त्यांचे प्रौढ विचार त्यांची विद्वत्ता, त्यांचे ज्ञान ह्याविषयी अध्यक्षांचे इतके अनुकूल मत झाले की, कमिशनपुढे रमाबाईंची साक्ष तर त्यांनी घेतलीच, पण एवढेच करून साहेब मजकूर थांबले नाहीत. त्यांनी रमाबाईंच्या उत्तराचे इंग्रजीत भाषांतर करवून ती उत्तरे स्वतंत्रपणे छापविली व एडिंबरो येथे गेल्यावर तेथे त्यांनी रमाबाई व त्यांचे कार्य अशा विषयावर एक स्वतंत्र व्याख्यान दिले व बाईंच्या सर्व उद्योगाची जेव्हा डॉ. हंटर यांनी माहिती दिली, तेव्हा सर्व माणसे उभी राहून त्यांनी टाळ्यांचा गजर करून रमाबाईसंबंधाने आपला आदर व्यक्त केला. हंटर कमेटीपुढे प्रथमच स्त्री-शिक्षणाविषयी काही सूचना करण्याचा तुम्हाला कसा अधिकार पोहोचतो असा प्रश्न रमाबाईस केला होता. त्यास उत्तर देताना त्यांनी असे स्पष्ट सांगितले की, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केल्याबद्दल ज्यांचा अतिशय छळ झाला, लोकांनी ज्यांच्या मार्गात अनेक अडचणी उपस्थित केल्या, लोकांनी ज्यांच्यावर बहिष्कार घातला अशा एका गृहस्थाची मी कन्या असून स्त्रियांचा दर्जा उच्च वाढविण्यासाठी आजन्म कार्यमग्न राहावे असा मी निश्चय केला आहे. या साक्षीमध्ये मुलींच्या शाळांवर शिक्षकिणीच असाव्यात, त्यांचे स्वतंत्र शिक्षण झालेले असावे. त्या कुलीन व सद्‌गुणीच असाव्यात, त्यांना आपल्या कामाची आवड असावी त्यांना इंग्रजीचे चांगले ज्ञान असावे, त्यांस वेतन भरपूर असावे, त्यांना व मुलींना राहण्यासाठी स्वतंत्र वसतिगृहे असावीत व सर्वांवर देखरेख करण्यासाठी एक पोक्तबाई असावी असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मुलींच्या शाळांवर मुलीच शिक्षिका, मुलींच्या शाळांवर स्त्रियाच इन्स्पेक्टर असल्या पाहिजेत असे त्यांनी निक्षून सांगितले. त्याची कारणे त्यांच्याच शब्दांत दिली असता रमाबाईंनी ह्या विषयाचा किती दूरवर विचार केला होता त्याची साक्ष वाचकास सहज पटेल त्या म्हणाल्या,

"The women of this country are very timid. If a male inspector goes into female school, all the women and students are thrown into confusion and are unable to speak……….

अनुक्रमणिका

as the education of girls" is different from that of boys, female schools ought to be the hands of female teachers ………….. In ninety nine cases out of a hundred, the educated men of this country are opposed to female education and the proper position of women. If they observe the shifted fault, they magnify the grain of mustard seed into mountain and try to rain character of a woman, after the poor woman not being very courageous and well informed, her character is completely broken.

हे उद्गार वाचताना आपण १८८२ सालात आहोत हे वाचकांनी लक्षात ठेविले पाहिजे. रमाबाईंच्या काही उद्गारात थोडी अतिशयोक्तीची छाया कोणास दिसण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ :--

It is evident that women being one half of the people of this country are oppressed and cruelly treated by the other half, to put a stop to this anomaly in worthy of a good government.

ह्यात अतिशयोक्ती आहे आणि हे सिद्ध करावयास स्वतः रमाबाईंचेच उदा- हरण पुरेसे आहे. पत्नी, भगिनी, माता ह्या नात्याने त्यांनी इतरांचा छळ झालेला पाहिला, पण त्यांचा स्वतःचा छळ तसा झाला नाही. ज्ञानदाता पिता, बंधूसारखा बंधू व पतीसारखा पती इतर भगिनीसह लाभले असतील! मग हे सरसकट विधाने कशाला? असो. ह्याच आपल्या साक्षीमध्ये स्त्रियास औषधोपचार करण्यासाठी स्त्रियाच डॉक्टर असण्याची अत्यंत आवश्यकता असल्याचे त्यांनी फार कळकळीने सांगितले असे म्हणतात की, ही त्यांची साक्ष प. वा. व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या वाचनात आली व त्यांच्याच सूचनेने लेडी उफरिन फंडाची व इस्पितळांची वगैरे व्यवस्था झाली.

रमाबाईंची विलायतेला जाण्यापूर्वीची चौथी मोठी कामगिरी म्हणजे स्त्री-धर्मनीति हा ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध करणे होय. ह्या ग्रंथाची योग्यता फार थोर आहे. परंतु तो आता दुर्लभ झाल्यामुळे अलीकडल्या स्त्रियांना त्याचे नावही नवेच वाटते. हा ग्रंथ प्रत्येक स्त्रीने अवश्य मनन करण्यासारखा आहे. ह्यात रमाबाईंनी स्त्रियासंबंधाने अनेक फार उपयुक्त विषयाचे विवेचन केले आहे. परंतु रमाबाई हिंदू समाजास मुकल्यामुळे त्यांच्या कार्याविषयी लोकांची सहानुभूती कमी झाली व हा ग्रंथ कालांतराने लोकांच्या स्मृतीतून गेला! त्यांचा दुसरा ग्रंथ म्हणजे युनायटेड संस्थानातील लोकांची स्थिती हा होय. या ग्रंथासारखा ग्रंथ अद्याप झालेला नाही असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही.

अनुक्रमणिका

# ३. रमाबाईंचे पुढील कार्य

रमाबाई विलायतेस का गेल्या? विलायतेस जाताच त्यांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा का घेतली? परत आल्यानंतर त्यांनी एकदम ख्रिस्ती संस्थाच का स्थापन केली नाही? त्यांनी दुष्काळातील हजारो मुली कोणत्या हेतूने मिळविल्या? इ. प्रश्न आता साहजीकच आपल्यापुढे उभे राहतात. त्यांचा अल्प विचार येथे केल्यावाचून हा लेख अपुरा राहील.

पुण्यास असतानाच रमाबाईंच्या इंग्रजी शिक्षणास आरंभ झाला होता. हंटर कमिटीपुढे त्यांना मराठीतच साक्ष द्यावी लागली. आपल्याला पुढे जे काम करावयाचे ते जर चांगल्यारितीने व्हावयास हवे तर आपल्याला इंग्रजी भाषेचे ज्ञान चांगले असले पाहिजे असे त्यास वाटू लागले व हे असे ज्ञान मिळविण्याचे ठिकाण इंग्लंडच होय असे त्यांच्या मनाने घेतले. कित्येक लोकांचा अद्यापिही असा समज आहे की महाराष्ट्राने पंडिता रमाबाईंची योग्यता जाणिली नाही. महाराष्ट्राने त्यास सहाय्य केले नाही. महाराष्ट्राने त्याचा उल्हास द्विगुणित न करिता तो करपवला म्हणून त्या विलायतेस गेल्या व तेथील बायांची जिवंत कळकळ व सहानुभूति-अनुभवून त्या ख्रिस्ती झाल्या. त्यात काहीही तथ्यांश नाही. रमाबाई आपल्या बंधुसमवेत कलकत्यास गेल्या त्यावेळी त्यांनी वेदाध्ययन बिलकुल केलेले नव्हते. उलट ब्रह्मानंद केशवचंद्रसेन ह्यांनी आपण वेदाध्ययन केलेले नाही काय? असा प्रश्न रमाबाईस केला. त्यावेळी स्त्रियांस वेदाध्ययनाचा अधिकार नाही व वेदाज्ञेविरुद्ध वागणे हे पाप आहे असे सरळ उत्तर रमाबाईंनी दिले! बाईंचा साधेभोळेपणा दाखविणारे हे उत्तर ऐकून केशवचंद्रानी मंद हास्य केले व त्यांस वेदांतील यजुर्वेदाचे पुस्तक देऊन उपनिषदे वाचण्याचा आग्रह केला. त्या वेळेपर्यन्तचे निरनिराळे अनुभव लक्षात घेऊन रमाबाई थोड्या साशंक वृत्तीच्या बनल्या होत्या. कलकत्यास असताना ब्राह्म गृहस्थानीं त्यांचा प्रथम सत्कार केला व त्यांस ब्राह्म धर्मही निवेदिला. परंतु ब्राह्म धर्मातील सर्व विचार, सर्व सिद्धांत त्यांस पटले नाहीत. ब्राह्म धर्म हा व्यक्तीचा धर्म होतो. प्रत्येक व्यक्तिने त्याचा स्वतःसाठी विकास करावयाचा असतो. अशी मनाची स्थिती असता त्यांनी एकेक उपनिषद वाचावयास घेतले व ती वाचून त्यांची अधिक साशंक वृत्ती बनली. पुढे त्यांचा विवाह झाल्यावर त्यांच्या पतीच्या कपाटात त्यांस लुकाचे बंगाली भाषेत छापलेले शुभवृत्तमान आढळले. त्यांनी ते आस्थापूर्वक वाचले व ख्रिस्ती धर्माकडे कल होऊ लागला. मेधावींना ख्रिस्ती धर्म व ख्रिस्त याविषयी फार आदर होता; परंतु ते आपल्याला ख्रिस्ती म्हणवून घेण्यास तयार नव्हते व आपल्या बायकोने प्रसिद्धपणे ख्रिस्ती व्हावे हाही विचार त्यांस मानवणे शक्य नव्हते. अशी ही झटपट व खटपट चालू असतानाच रमाबाईंचे पती श. मेधावी याजवर दुष्ट काळाने अचानक अचानक झडप घालून रमाबाईंना पुन्हा एकट्यानेच दिवस काढण्याचा प्रसंग आला. नाही म्हणावयास त्यांच्या सुखाची व दुःखाचे वाटेकरी व्हावयास त्यांची लहानशी मनोरमा मात्र होती. पुण्यास आल्यावर त्यास योग्यप्रकारे सहाय्य मिळाले नाही, त्यास प्रोत्साहन मिळाले नाही, हे म्हणणे संयुक्तिक नाही कारण स्वतः रमाबाईच म्हणतात :--

"The leaders of the reform party and the member of the Prarthana Samaj treated me with great kindness and gave me some help. Messrs. Ranade, Modak, Kelkar and Dr. Bavdekar were among the people who showed great kindness to me."

ह्यावरून उदारमतवादी लोकांनी त्यांची हेळसांड केली असे म्हणता येत नाही. परंतु एकीकडे त्या आर्य महिला समाजाची स्थापना करीत असता पुढे हुजूर पागेतील शाळेच्या सुपरिटेंडेंन्ट झालेल्या मिस् हरफर्ड ह्या त्यावेळी घरोघर जाऊन बायबलचा प्रसार करण्याचे काम करीत असत. मधून मधून मिस्

हरफर्ड त्यास इंग्रजी शिकविण्याचा आव घालीत असत. परंतु हे प्रकरण जड आहे असे पाहून त्यांनी रे. निमाया गोरे यांची व रमाबाईंची गाठ घालून दिली! गोरे साहेबांनी हिंदू धर्म व शास्त्रे पाहिली होती. त्यांनी ख्रिस्ती दृष्टी कायम ठेऊन हिंदू व ख्रिस्ती धर्माची वारंवार रमाबाईपाशी तुलना करून ख्रिस्ती धर्माची श्रेष्ठता त्यांच्या नजरेस आणून द्यावी! पंडिता रमाबाईंनी विलायतेत जावयाचे ज्यावेळी ठरविले त्यावेळेला त्यांच्या मनोभूमीची ही अशी स्थिती होती. मिस हरफर्ड यांनी आपल्या मिशनच्याच मंडळीमध्ये इंग्लंडात त्यांची रहाण्याची व्यवस्था केली व तेथे असतानाच त्यांनी आपल्या मुलीसह ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली! एकदा लंडन येथील ह्याच मिशनचे दुसरे एक होम पहावयास रमाबाईंना पाठविण्यात आले. तेथे त्यांनी जे काही पाहिले त्याच्यामुळे त्यांनी ताबडतोब ख्रिस्ती होण्याचे ठरविले असे त्याचे म्हणणे आहे. पतित स्त्रियांना ह्या ठिकाणी इतके प्रेमाने वागविलेले पाहून रमाबाई जागच्याजागी थक्क होऊन गेल्या. ह्या प्रेमाचा तरी काय परिणाम झालेला! प्रेमाने ह्या बायांचे अंतःकरण पश्चातप्त केले व त्या इतरांची सेवा करावयास तयार झाल्या. आमच्या हिंदू धर्माची पतित स्त्रियांविषयी अत्यंत क्रूर दृष्टि आहे. कुत्र्यांनी त्यास फाडून खुशाल खावे. पतित स्त्रियांविषयी प्रेमाचा विचार कोणाच्या मनांत यावयाचा नाही. त्यांना प्रेमाने जवळ करून, त्यांच्याशी प्रेमाने वागून, त्यांस सदाचरणी करण्याचा व पुढील सर्व आयुष्य सत्कार्यात घालविण्याची पात्रता त्यांच्यात आणण्याचे महान कार्य ह्या सिस्टर्स ऑफ मर्सी करीत आहेत व हा सर्व ख्रिस्ती धर्माचा, ख्रिस्ताच्या उपदेशाचा परिणाम होय, असे पाहून त्यांचे मन ख्रिस्ती धर्माकडे पूर्णपणे वळले व त्या ख्रिस्ती झाल्या. हिंदू लोकांनी आपल्याला प्रोत्साहन दिले नाही म्हणून त्या ख्रिस्ती झाल्या हे अगदी अवैध आहे. परत स्वदेशी आल्यावर आपल्या भगिनींच्या उद्धारासाठीच झटावयाचे असा त्यांचा निश्चय कायम राहिला. एवढेच नव्हे तर तो दुणावला. अशा प्रकारे त्यांचे अध्ययन, शिक्षण चालू असतानाच त्यांना अध्यापनाची संधी मिळाली होती. चेल्टन हॅम कॉलेजमध्ये त्यांस संस्कृताचे अध्यापक नेमले गेले. असा त्यांचा क्रम चालू असतानाच त्यांस अमेरिकेस जाण्याचा योग जुळून आला व अमेरिकेत डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांच्या पदवीदान प्रसंगी त्या तेथे प्रथम गेल्या. त्यापुढे स्वदेशी येईतो तेथेच राहिल्या. तेथील शिक्षण पद्धती, तेथील सुधारणा, तेथील संपत्ती, तेथील लोकांची हिंदू स्त्रियांच्या उद्धार कार्यास सहाय्य करण्याची उत्सुकता पाहून रमाबाई तेथेच राहिल्या. शिक्षणाच्या बाबतीत नवीन अनुभव त्यांस तेथे मिळाला व पुढील सर्व कार्याची त्यांनी तेथे तयारी केली. High Caste Hindu Woman हे पुस्तक त्यांनी फिलाडेल्फीया येथे लिहिले. ह्या पुस्तकाच्याद्वारे त्यांची तेथे प्रसिद्धी झाली व त्यांच्या भावी कार्याविषयी सहानुभूती अमेरिकेत उत्पन्न झाली आणि दहा वर्षेपर्यन्त हिंदुस्थानातील कार्यास रमाबाई असोसिएशनने अमेरिकेहून मदत करण्याचे ठरविले. रमाबाईंनी स्त्रियांच्या उन्नतीचे कार्य करावे, धर्मशिक्षण द्यावयाचे तर ते ख्रिस्ती द्यावे, परंतु संस्था ख्रिस्ती म्हणून चालवू नये असे ठरले व त्याप्रमाणे १८९२ साली मुंबई येथे शारदा सदन नावाची संस्था स्थापन झाली. ही संस्था स्थापन झाली त्यावेळी ख्रिस्ती नव्हती. आपण स्वतः ख्रिस्ती असल्याचे रमाबाईंनी त्यावेळी लपवून ठेविले नाही. परंतु येथे कोणालाही इच्छेविरुद्ध ख्रिस्ती केले जाणार नाही असे त्यांनी आश्वासन दिले होते व प्रथम प्रथम त्यांचे धोरण तसेच होते. शारदा सदनाची स्थापना झाली त्यावेळी प्रथम तेथे दोनच विद्यार्थीनीं होत्या. श. श. गंगाधरपंत गद्रे ह्यांच्या मुलीच्या शारदा सदनावरूनच सदनास शारदा सदन हे नाव देण्याची पंडिता बाईस स्फूर्ति झाली. दुसरी विद्यार्थीनी एक बालविधवा होती. हिने तीन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु आत्महत्येचे पातक केल्यास पुन्हा स्त्रीच व्हावे लागेल ह्या भीतीने ह्या बाईने आत्महत्या केली नाही व सदनात दाखल झाली. मुंबईच्या सदनात ज्यांचे प्रथम थोडे शिक्षण झाले अशा स्त्रियां, अद्यापि, मुंबई शहरात रमाबाईंचा त्यावेळेचा उत्साह, त्यांची टापटीप, त्यांची काम करण्याची शिस्त, त्यांची आस्था यांची साक्ष द्यावयास सिद्ध आहेत. पुढे शारदा सदन खर्चाच्या व जागेच्या सोयीसाठी पुण्यास नेण्यात आले.

अनुक्रमणिका

ज्यावेळी रमाबाईंनी आपले सदन पुण्यास न्यावयाचे ठरविले त्यावेळी आर्य महिला समाजाने त्यास एक मानपत्र अर्पण केले व एक सोन्याचे घड्याळ व ऋग्वेद भाष्यांचे उत्तमरितीने बांधविलेले ग्रंथ आठवणीदाखल बक्षिस दिले. सदरप्रसंगी मानपत्रास उत्तर देताना घारापुरीच्या लेण्यात अर्धपुरुष व अर्धस्त्री अशी जी दक्षिणामूर्ति नामक मूर्ति आहे तिच्या आधारावर स्त्री-पुरुषांचा संबंध कसा होता ते मोठ्या मार्मिकतेने रमाबाईंनी दाखवून दिले. परंतु तीच मूर्ति आज कशी छिन्नविछिन्न झाली आहे! ही छिन्नविछिन्नावस्था हल्लीच्या स्थितीचे द्योतक आहे. परंतु प्रवाळ कीटक हे अतिसूक्ष्म प्राणी असता त्यांच्या दीर्घ प्रयत्नाने केवढाले खडक उत्पन्न होतात हे सांगून आपण कितीही शक्तिहीन असलो तरी दीर्घ प्रयत्न केला असता फल प्राप्त होईलच. आज आपण मला ही वेदभाष्यांची बहुमोल पुस्तके नजर करीत आहां. काही वर्षांपूर्वी स्त्रियांना वेदाध्ययनाचा अधिकार नाही असे मला स्वतःला वाटत होते. तसे मी कलकत्यास केशवचंद्र सेन ह्यांजपाशी बोलून दाखविले व मला त्यांनी यजुर्वेदाचे पुस्तक बक्षिस दिले आणि आता आपण मला वेदभाष्याचे ग्रंथ बक्षिस देत आहां. त्या प्रसंगी केशवचंद्र सेन यानी जसा मला वेदाधिकार दिला तसा आपण ज्या माझ्या देश भगिनी त्या मला देत आहां. यावरून आपण तो अधिकार प्रथम संपादिला आहे असे होते. स्त्री जातीचे इतके पाऊल पुढे पडलेले पाहून मला फार संतोष होतो.

पुण्यास गेल्यावर रमाबाईंनी आपली संस्था विशेष प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न केले. थोड्या दिवसानी शारदा सदनात बऱ्याच गतभर्तृका आल्या. लोकांचा संस्थेवर विश्वासही बसू लागला व रमाबाईंचे काम काही वर्षे चांगल्यारीतीने चालले होते. आपल्या हातून जे अल्पस्वल्प काम होत आहे, त्याची माहिती लोकांस व्हावी म्हणून पंडिताबाई वारंवार सदनामध्ये संमेलने भरवू लागल्या. एकदा तर सुबोध पत्रिकेने असे उद्‌गार काढले की, "परदेशी जावे की न जावे, गेले तर किती शेणमूत खावे याची वाटाघाट करीत आताची विद्वान मंडळी बसली आहेत, अशावेळी एकट्या स्त्रीने अमेरिकेसारख्या सातासमुद्राच्या पलीकडच्या देशी जावे, तिकडील लोकांच्या अंतःकरणात आपल्या भगिनीविषयी कळवळा उत्पन्न करावा, त्यांच्याकरीता सभेचे विद्यालय व १० वर्षेपर्यन्त त्याला लागणारा खर्च सर्व मिळवून आणावा. याला जर अलौलीक पराक्रम म्हणू नये तर म्हणावा कशाला? हे परकी लोकांचे सहाय्य सारे १० वर्षेच मिळावयाचे आहे. ह्या दहा वर्षांपैकी जवळजवळ चार वर्षे तर निघून गेली. अशीच बाकीची राहिलेली सहा निघून जातील. असे जर झाले तर आमच्या लोकांच्या निर्दयतेला किंवा कर्तव्यपराङ्‌मुखतेला काही सीमा राहील काय? अशी उपयुक्त संस्था १० वर्षे वाढवून तिला सर्व अज्ञजनकृत छळादि रोगातून मुक्त करून ती आमच्या हातात परकी लोकांनी द्यावी व पुढे तिचे रक्षण आमच्या हातून होऊ नये यासारखी आम्हाला शरमेची गोष्ट दुसरी कोणती होईल? अखेरीस वरील भाकितच बहुतेक खरे झाले. शारदा सदनाला हिंदू जनतेकडून थोडी बहुत मदत होऊ लागली होती. परंतु ती फार अपुरी होती. सदनामध्ये ख्रिस्ती नसणाऱ्या बायांना ख्रिस्ती धर्मासंबंधाने आग्रहाचा उपदेश होतच असे, असे जरी नाही त्याचप्रमाणे जुन्या आचार-विचारानुसार चालणाऱ्या विद्यार्थानीस जरी पूर्ण स्वातंत्र्य होते, जरी सदनासंबंधी लोकांमध्ये जो उत्साह असावयास पाहिजे होता तो कमी झाला होता. अनेक प्रकारच्या कंड्या उठवून संस्थेसंबंधाने गैरसमज व्हावयास प्रारंभ झालाच होता. एकदा एका सामान्य हितचिंतकानी एक तुळशीची कुंडी सदनात पाठविली, ती एके ठिकाणी ठेवून दिली. तेवढ्यावरून तिला लाथ मारली, तुळशीची पूजा करण्यास मनाई होत असते, असल्या गप्पा पसरल्या व ते एक मोठेच प्रकरण माजून राहिले. ही अशी प्रकरणे जुनी व्हावयाच्या पूर्वीच सदनातील काही विद्यार्थिनींनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्याचे बाहेर आले. त्यामुळे रमाबाईंच्या तटस्थपणावरील विश्वास उडाला व ही एक ख्रिस्ती संस्था आहे असे समजून पुष्कळांनी आपल्या मुली भराभर काढून घेतल्या. त्याच सुमारास १० वर्षे भरत आल्यामुळे रमाबाईंनी स्वावलंबनाचा मार्ग पत्करला! केडगाव येथे त्यांनी थोड्या किंमतीत पुष्कळशी जागा घेतली. तेथे भाजीपाला लावून शेती करून, मळे लावून आपले नवे सदन त्यास

अनुक्रमणिका

त्यांनी “मुक्ति सदन” असे नाव दिले, चालविण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणे पुण्याचे सदन त्यांनी केडगावास नेले. केडगाव येथील सदन पैशाच्या अभावामुळे कसेबसे चालू असतानाच मध्य प्रांतामध्ये १८९७ सालचा भयंकर दुष्काळ पडला. रमाबाईने सर्व प्रकारच्या आपत्ती सहन केलेल्या, सुबत्तेच्या दिवसांत त्यांनी दुष्काळ अनुभवलेला होता, अन्नावाचून दिवस काढणे म्हणजे काय हे त्या जाणून होत्या. दहा दिवसपर्यन्त झाडांच्या पाल्यावर राहून त्यांनी आपल्या जीवाची जतन केली होती. भाकरीच्या चतकोर तुकड्यासाठी शेजारणीकडे जाऊन तोंड वेंगाडताना मनाला काय वाटते याचा त्यांनी स्वतः अनुभव घेतला होता. म्हणून त्यावेळच्या त्या दारुण दुष्काळाची त्यांना योग्य कल्पना झाली व देवाची इच्छा दुष्काळात सापडलेल्यांच्या सहाय्यास आपण जावे अशी आहे. देव तशी आपल्याला आज्ञाच करीत आहे असे रमाबाईस वाटू लागले व जवळ पैसे नसताही त्या दुष्काळपिडीतास सहाय्य करावयाला निघाल्या.

**दुष्काळातल्या मुली का आणल्या** ?

पुष्कळांचे असे म्हणणे आहे की, संस्था ख्रिस्ती झाल्यामुळे आपण होऊन त्यात कोणी आपल्या मुली पाठवीतनासे झाले, म्हणून दुष्काळाची संधी साधून आयते आलेले पीक जमा करून आणण्यासाठी रमाबाई गेल्या. त्यांना कल्पनेच्या बाहेर तेथे लाभ झाला व त्या दुष्काळामुळेच मुक्ति सदनाचा एवढा पसारा वाढला. दुष्काळातील मुली व बाया रमाबाईंनी आणल्या व त्या सर्व ख्रिस्ती झाल्या ही गोष्ट खरी आहे; परंतु दुष्काळातले पीक पाहून त्यांचे अंतःकरण हळहळले, हजारो माणसे अन्नान्नदशेत असताना घरी बसून दोन घास सुखाने खाणे त्यांस बरे वाटले नाही म्हणून त्या बाहेर पडल्या आणि हे त्यांनी त्यावेळी लिहिलेल्या पुढील पत्रावरून स्पष्ट होत आहे. हे पत्र पंडिताबाईंनी बुंदेलखंडातील नौगावाहून लिहिले होते :-- “आज दोन-तीन दिवस मी पावसातच प्रवास करीत आहे. पाऊस आला याचा फार आनंद वाटतो, पण ह्या पावसाळ्यात त्या दुष्काळपिडीत लोकांची जी दुर्दशा झाली आहे ती पाहून हृदय दुभंग झाल्यासारखे होते. मी काल आणि आज गाडीतून प्रवास करीत असताना रानावनातून शेकडो गरीब लोकांना इकडेतिकडे हिंडताना पाहिले. बिचाऱ्यांना निवाऱ्याची जागा नाही. अंगावर चिंध्या, त्याही भिजून चिंब झालेल्या, पोटात भुकेचा जाळ, बाहेरून थंडीवाऱ्याची पिडा, कोणी झाडांना, कोणी पडित भिंतीत चिकटून कुडकुडत उभी राहिली आहेत, पुरुष, बायका, मुले, म्हातारी, तरणी सगळ्या प्रकारची माणसे अशी मरणपात्र स्थितीत देहभार कसातरी वहात आहेत. आज मी टांग्यात असून इकडे येताना चार तास पावसात भिजले ते मला जड गेले. पण एक गरीब बिचारी बाई माझ्याच वयाची रस्त्याने चालली होती. तिच्या अंगावरील चिंध्या सगळ्या भिजून गेल्या होत्या, मुसळधार पावसातून ती रानातून चालली होती. माझ्यापासून काही तरी मिळेल म्हणून सरासरी अर्धा तास ती माझ्या टांग्यामागे धावत चालली होती. मी तिच्याकडे पैसे टाकले. पण ते तिला मिळाले नाहीत. ती तशीच धावत येऊ लागली. टांगा मेल घेऊन चालला होता तो उभा करता येईना. अर्धा तास धावून थकून नंतर ती मागे राहिली. माझ्या आणि तिच्या स्थितीमध्ये कितीतरी अंतर होते. माझे भिजणे टांग्यात बसून आणि तेही दोन – तीन तासांचे, पण तिचे बिचारीचे केव्हाच न संपणारे. आता ती कोठे कुडकुडत मरत पडलेली आहे की काय कोण जाणे! आगगाडीच्या स्टेशनावर पुष्कळ लहान लहान मुले भीक मागावयास आली होती. ती सगळी निराश्रित – निराधार आहेत. सर्व पावसाने भिजत व भुकेने मरत आहेत. एक लहान बच्चा, सरासरी पाच – सहा वर्षांचा, देवीनी सबंध भरलेला होता. तरी पोटाच्या आहाळामुळे दुखणे विसरून त्या तशा पावसात भीक मागावयास आला होता. अरेरे! ह्या लहानशा लेकरासाठी काय करावे ते कळत नाही. आमच्या शाळेतल्या कित्येक मुली चांगल्या स्थितीत असूनही, मजवर नाही तर दुसऱ्या कोणावर रागावून “मी जाईन कोठेतरी भीक मागत” असे म्हणत असतात. त्यांची बिचाऱ्यांची मला कीव येते. त्यांना भीकेचे सुख माहीत नाही. म्हणूनच त्या असे म्हणतात. मनुष्याला पुष्कळ

अनुक्रमणिका

दुःखे आहेत, ती केव्हा असह्य होऊन त्रासून गेल्याने माणूस आपल्याला असलेल्या दुःखातून मुक्त करण्याकरिता दुसऱ्या एखाद्या दुःखाची इच्छा करतो. हे एक मूर्खपण जिकडेतिकडे मनुष्य जातीत असलेले दृष्टीस पडते. देव आम्हाला मूर्खपणापासून दूर राखो!" अशा वृत्तीने रमाबाई दुष्काळातल्या मुली, बाया, मुलगे जमा करीत होत्या. हे काम केवळ आपला कळप वाढवावा ह्या हेतूने त्या करीत होत्या असे मानावयास आमची मती धजत नाही. अशा प्रकारे उद्योग करून माणसे जमा करता करता रमाबाईंनी एकेकाळी जवळजवळ तीन हजार मुलांना दोन वेळ कोरडी भाकर खाऊ घालणे म्हणजे किती व्याप आहे, ह्या सर्व मुलांच्या नुसत्या निजण्याची व्यवस्था करणे म्हणजे किती त्रास आहे, याचा विचार रमाबाईंचे टिकाकार करीत नाहीत! तीन हजार मुलांना रमाबाईंने ख्रिस्ती केले याबद्दल आम्हालाही वाईट वाटते; पण त्या तीन हजार प्राणांची तर सोडाच पण तीनशे प्राणांची काहीतरी सोय लावावयाची आमची तयारी होती काय? हिंदुस्थानच्या दुर्दैवाने दुष्काळ हा नेहमीच लोकांच्या पाठी लागलेला आहे. १८९७ नंतर मुंबई इलाख्यात पुष्कळ दुष्काळ पडले. त्यावेळी रमाबाईंना दूषण देणाऱ्यांनी किती मुलांचे प्राण वाचविले. किती बायांना सोडवून आणले, किती मुलांची जोपासना केली! रमाबाईंनी ह्या मुलांना ख्रिस्ती न करता त्यांच्यासाठी सर्व श्रम करणे शक्य तरी होते काय? त्यांचा स्वतः ख्रिस्ती धर्मावर आत्यंतिक विश्वास, त्या स्वतः ख्रिस्ती आणि त्यांच्या सर्व उद्योगांचा बोजाही विशेषतः परदेशी ख्रिस्ती लोकांवर, मग त्यांनी ह्या मुलांना ख्रिस्ती का करू नये? रमाबाईंनी त्या सर्व मुलांना ख्रिस्ती केले नसते व ती सज्ञान झाल्यावर ख्रिस्ती व्हावयाचे किंवा नाही हे ठरविणे त्यांच्यावर सोपविले असते तर आम्हास आनंद झाला असता. तथापि त्यांनी जे केले ते मनुष्य स्वभावास अनुसरून केले व त्याबद्दल पंडिताबाईस दोष द्यावयास आम्ही मुळीच तयार नाही.

परंतु त्यांनी आपल्या ताब्यांतील ह्या मुलांसाठी काय केले, त्या काय करीत होत्या, एवढा मोठा संसार त्यांनी कोणाच्या जीवावर चालविला याचा विचार केला असताना मन क्षणभर आश्चर्यचकित झाल्यावाचून रहात नाही. प्रथमतः हे लक्षात ठेविले पाहिजे की, पंडिता रमाबाईंचा व्यक्तिमात्राचा बौद्धिक शिक्षणावर फारसा विश्वास नव्हता व मुक्तित त्यांनी त्या शिक्षणाचा फारसा पसारा घातलेला नाही. असे होते तरी पूर्वीचे शारदा सदन बंद झाले तरी शारदा सदन हे नाव अद्याप कायम असून 'शारदा सदन हायस्कूल' नामक संस्थेत प्रवेश परीक्षेपर्यंत आज शिक्षण दिले जात आहे. आपल्या मुलीचे परदेशी शिक्षण झाल्यावर त्यांना रमाबाईंनी ज्याप्रमाणे पदवीधर केले त्याचप्रमाणे कु. कृष्णाबाई गद्रे त्यांसही त्यांनी अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे बी.ए. केले आहे. त्यांना छापण्याचे काम वारंवार बाहेर द्यावे लागत असे, त्यामुळे फार गैरसोय होत असे. काम मनाप्रमाणे होत नसे व वेळेवरही मिळत नसे म्हणून त्यांनी आपल्या स्वतःच्या सर्व कामासाठी एक मोठा छापखाना काढिला. ह्या छापखान्यात सर्व कामे सुबक होतात. तेथील सर्व कामे मुलीच करीत असतात. टाईप जुळविणे, टाईप सोडणे, कागद मोडणे, पुस्तक बांधणे, वगैरे कामे स्त्रियांनी करणे फारसे अवघड नाही, आज आम्ही जे एक चित्र छापले आहे त्यावरून असे दिसून येईल की, छापण्याचे कामही स्त्रियाच येथे करीत असतात. त्याचप्रमाणे येथे अनेक हात रहाट आहेत. हातमाग आहेत, शेते आहेत, भाजीपाल्यांचे मळे आहेत, बुरूड काम येथे चालू आहेत, विणकाम येथे चालत असते, धोबीकामाचे घाट येथे आहेत! सारांश मुलींकडून करून घेता येतील अशी अनेक प्रकारची कामे येथे होत असतात. सर्व कामे ठरलेल्या शिस्तीप्रमाणे होतात. रमाबाईंना स्वतः सर्वत्र फिरणे शक्य नव्हते; तरी पण सदनांतील सर्व मुलींची त्यांना माहिती असे. सर्व मुलींना व स्त्रियांना आणि मुलांना त्या नावाने ओळखत. प्रत्येक मुलीचे गुण व दोष यांची माहिती बाईंना असावयाची.

अनुक्रमणिका

हा एवढा व्याप रमाबाईंनी कोणाच्या जीवावर वाढविला? पहिल्या दहा वर्षांपुरती सर्व जबाबदारी अमेरिकेतल्या रमाबाई असोसिएशनने घेतली होती हे खरे; त्यांना सरकारची मदत नव्हती. त्या कोणत्याही मिशनच्या तर्फे आपले काम करीत नव्हत्या. कोणत्याही एका मिशनप्रमाणे त्या चालत नव्हत्या. त्यांना ज्याप्रमाणे प्रेरणा होईल त्याप्रमाणे त्या वागत. त्यांचा सर्व भरिभार परमेश्वरावर आहे. आपल्या संस्थेची काळजी देवाला आहे. मी ह्या बायांची कितीशी काळजी घेणार? मी ह्या बाळांचे कितीसे रक्षण करणार? मी ह्यांना रोगांपासून किती दूर ठेवणार? प्रभू सर्व समर्थ आहे. प्रभूला या लेकरांची काळजी आहे. तो सर्व काही करीत आहे असे त्या वारंवार म्हणत. कोणापाशी आपल्याला सहाय्य करा अशी याचना करावयास त्या जात नसत. हिंदी व सधन ख्रिस्ती लोकांकडूनही त्यांस म्हणण्यासारखे द्रव्य सहाय्य होत नसे. ते सर्व परदेशातून येत आहे. आपल्या कामाची माहिती चांगली झालेली असल्यामुळे त्यास सहाय्य भरपूर मिळत असे. आपल्या कामाची काळजी देवाला आहे, तोच सर्व मदत करीत आहे असा त्यांचा विश्वास होता.

**रमाबाईचे विशेष गुण**

येथपर्यंत बाईंच्या चरित्रातील ठळक ठळक गोष्टी आम्ही नमूद केल्या. आता त्यांच्या कित्येक विशेष गुणांबद्दल येथे दोन शब्द लिहिले पाहिजेत आणि तसे करू लागण्यापूर्वी पंडिताबाईंच्या असामान्य कर्तृत्वशक्तीच्या रहस्यासंबंधाने थोडेसे विवेचन केले तर ते अस्थायी होणार नाही अशा समजुतीने पुढील विवेचन केले आहे. रमाबाई ख्रिस्ती झाल्या व आपल्या ताब्यात देवाने दिलेल्या स्त्रिया व मुले ह्यांस त्यांनी ख्रिस्ती केले म्हणून काय त्यांचे चरित्र आम्हांस कमी बोधप्रद व्हावे? मुक्ती सदनाची कृपासदन एक शाखा आहे. येथे सर्व प्रकारे निराश्रित, लोकांनी तिरस्कारलेल्या, दुर्वर्तनामुळे निंद्य झालेल्या बायांना रमाबाई आश्रय देत असत. लोकांच्या दृष्टीने पतित झालेल्या बायांना प्रेमाने वागवून त्यांना सरळ मार्गावर आणणारी हिंदू बायांनी चालविलेली एखादी संस्था सगळ्या हिंदुस्थानामध्ये आहे काय? Home for the Homeless अशा संस्थेमध्येही ह्या वर्गातील बायांना थारा मिळत नाही, मग त्यांच्याशी प्रेमाने वागून, त्यांना सद्‍बोध करून त्यांना सन्मार्गावरती करावयाची गोष्ट कशाला? रमाबाईना हे सामर्थ्य त्यांच्या प्रभू ख्रिस्ताकडून मिळाले ह्याविषयी आम्हाला तिळमात्र संशय नाही. लंडन येथे असताना अशा पतित स्त्रियांना किती प्रेमाने वागविले जाते, त्यांना त्यांच्या पापकृत्याची आठवणही न करून देता त्यांना पश्चातापाच्या मार्गात ठेवून त्यांचे चरित्र कसे निर्मळ केले जाते हे त्यांनी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले. पतित स्त्रीशी प्रेमाची वागणूक, समाजाने निंद्य मानलेल्या स्त्रीशी सारख्या नात्याने वागणे व अखेरीस अशा स्त्रियांनाच पुढे परोपकाराच्या कामास लावणे हा सर्व चमत्कार पाहून रमाबाई थक्क झाल्या. ख्रिस्ताने पतित स्त्रीचा धिक्कार केला नाही. म्हणजे येशू त्यांच्या सामर्थ्याचे उगमस्थान होता. आमच्या देशामध्ये बौद्ध धर्माचा ज्यावेळी सर्वत्र प्रसार झाला होता त्यावेळी अशाच प्रकारे पतित भगिनींवर प्रेम करणाऱ्या, दुःखितांचे समाधान करणाऱ्या, अडचणीच्या वेळी साहाय्य करण्यासाठी धावून येणाऱ्या, आपले अहित करणाऱ्यांचे हित करणाऱ्या भिक्षुणी सर्वत्र संचार करीत असत. ह्या सर्व गोष्टी अक्षरशः जरी खऱ्या असल्या तरी आज ही सर्व पुराणातील वांगी झाली आहेत! दोन हजार वर्षांपूर्वी ह्याहीपेक्षा अधिक चांगली कामे आमच्या समाजात होत असत असे म्हणून धन्यता मानून घेणाऱ्या पंडिता रमाबाई  नव्हत्या. एकीकडे पतित, तिरस्कृत बायांसाठी आपले आयुष्य वेंचणाऱ्या स्त्रिया व त्यांचे वर्तन आणि दुसरीकडे आमच्या लोकांचा कठोरपणा, अनितीस उत्तेजन व बेपर्वाई यांचा अनुभव घेतल्यावर रमाबाईसारख्या प्रेमळ अंतःकरणाच्या स्त्रीला ख्रिस्ती धर्माचा मार्ग पसंत पडला तर त्यात आश्चर्य ते काय? म्हणूनच ह्या वेळच्या आपल्या अनुभवासंबंधाने पंडिता रमाबाईंनी पुढील उद्‍गार काढले आहेत –

अनुक्रमणिका

“I had never heard or seen anything of the kind done for this class of women by the Hindus in my own country. I had not heard anyone speaking kindly of them, nor seen anyone making any effort to turn them from the evil path they had chosen in their folly. The Hindu commands that the king shall cause the fallen women to be eaten by dogs in the outskirts of the town. They are considered the greatest sinner and not worthy of compassion.”

लंडन येथे रमाबाईंनी जे पाहिले, त्याचा त्यांच्या कोमल अंतःकरणावर जो परिणाम झाला तो कायम राहिला व त्यांनी केडगावास Sister of Mercy चे काम अखेरपर्यंत चालविले होते. मुक्ति सदनामध्ये वर म्हटलेले कृपासदन ज्याप्रमाणे आहे त्याचप्रमाणे तेथे प्रीतिसदनही आहे. त्यात वयस्कर, म्हाताऱ्या, दुबळ्या बायांस आश्रय मिळतो. परंतु रमाबाईंचे विशेष लक्ष लंगड्या, लुळ्या, बहिऱ्या, पांगळ्या, आंधळ्या, थोट्या अशा ज्या बाया त्यांच्याकडे असावयाचे! त्यांना त्यांनी आपल्या प्रिय मैत्रिणी मानावे, त्यांच्या सुखासाठी, आरामासाठी परमेश्वर आपल्याला सामर्थ्य देत आहे, त्यांची जोपासना करणे, त्यांच्या दुःखाचा परावलंबी स्थितीचा त्यांना विसर पडावयास लावणे, त्यांना नित्य आनंदित ठेवणे हे आपले कर्तव्य आहे असे त्या समजत. ह्यासाठी वारंवार पंडिताबाई त्यांना मोठमोठ्या मेजवान्या देत. त्यांना आनंदाने जेवताना पाहून बाईंना आनंद वाटे व पुष्कळ वेळा आपण जातीने त्यांना वाढीतही असत. एवढ्यावरच बाईंचा दयाळुपणा थांबला नाही. वर म्हटल्याप्रमाणे पंगू, निराश्रीत स्त्रियांकडे त्यांचे जसे लक्ष असे त्याचप्रमाणे जनावरांवरही त्यांच्या प्रेमाचा वर्षाव व्हावा. मांजरे, कुत्री, पोपट, मोर, गायी, म्हशी, गाढवे हे सर्व त्यांच्या प्रेमास पात्र झाली होती. लंगड्या, लुळ्या ३० बायांसाठी ज्याप्रमाणे विशेष मेजवान्या होत असत त्याचप्रमाणे वरील मित्रमंडळीसाठी विशेष दिवशी मेजवान्या होत असून त्या दिवशी बाईंनी स्वतः त्यांच्या चाऱ्यापाण्यावर देखरेख करावी व शक्य असेल तेथे त्यांनी स्वतः आपल्या हातांनी चारा घालावा! त्यांच्या प्रेमाचा ओघ इतका जबर होता की, इतकी वर्षे त्या आता केडगावास राहिल्यामुळे त्या शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या बाईंना आसपासचे लोक आपली आईच होत असे वाटू लागले होते व सदनातील सर्व मंडळींना त्यावेळी आपली माताच जणू काय सोडून गेली असे वाटले. त्यावेळी बाईंच्या अखेरच्या दर्शनाला आसपासची जी जी माणसे गेली त्यांना त्यांना सर्वांना आपली आईच आपल्याला सोडून गेली असे वाटले. बाई तुमचीच आई गेली असे नव्हे तर माझीबी आई गेली असे मला वाटत आहे. बगा असे येणाऱ्या बाईने म्हणून आपल्या अश्रुंनी आपला आदर प्रेम व्यक्त करावा! आम्ही शहरवासी लोक, मोठमोठ्या प्रश्नांच्या उलाढालीमध्ये पडलेले, राष्ट्राच्या हिताच्या लढायामध्ये ज्यावेळी गुंतलो होतो, आपआपसात भांडणे जुंपवून मारामाऱ्या चालवीत होतो, त्यावेळी पंडिता रमाबाई आपल्या हजार दोन हजार मुलांबाळांना व स्त्रियांना एकत्र करून आपल्या प्रेमाचा त्यांच्यावर वर्षाव करून आपल्या परात्पर गुरूच्या उदाहरणाचे अनुकरण करून, बाहेरच्या लोकांना लाजवीत होत्या त्यात काही संशय नाही.

महाराष्ट्राच्या दुर्दैवाने महाराष्ट्राला, हिंदू समाजाला आणि ख्रिस्ती समाजाच्या दुर्दैवाने त्या समाजालाही (त्याचे स्पष्टीकरण पुढे करू) पारख्या झालेल्या ह्या असामान्य बाईंच्या ठिकाणी वसत असलेले कित्येक गुण फार थोर दर्जाचे होते ह्याविषयी आम्हांस मुळीच शंका नाही. त्यांचा साधेपणा पाहून फार आश्चर्य वाटे. त्यांनी एवढा प्रवास केला, अमेरिकेतल्या वैभवात त्या राहिल्या, इंग्लंडातील ऐषआराम त्यांनी पाहिला, परंतु त्यांनी आपला साधा पांढरा शुभ्र पोशाख, अगदी साधी राहणी सोडली नाही. लहान मुलांमध्ये मुलांसारखे वागताना पाहून अडाण्या बायका जमल्या की ह्यांच्याप्रमाणे वागताना अवलोकन, विद्वान माणसांशी बोलताना त्यांना पटेल अशा पद्धतीने त्यांच्याशी बोलणे व दुःखिताशी बोलतांना त्यांचा कळवळा पाहून त्यांच्याजवळ असणाऱ्यांना, फार आश्चर्य वाटे पण रमाबाई या सर्व गोष्टी सहज करीत.

अनुक्रमणिका

त्यांची कर्तृत्वशक्ती असामान्य दर्जाची होती असे म्हटले असता त्यांच्याविषयी अतिशयोक्ती केल्याचा दोष त्यांच्या शत्रूंनाही आम्हांस देता यावयाचा नाही. त्यांच्या सदनाची माहिती ऐकून व वाचून इतक्या सामर्थ्याची व कर्तृत्वशक्तीची ही बाई आहे तरी कशी हे पाहाण्यासाठी कित्येक लोक परदेशाहून येथे येत असत. येथे आल्यावर बाईंचा तो अवाढव्य संसार व बाईंची ती शुभ्रवस्त्रे परिधान केलेली शांत, गंभीर, सतेज मूर्ती पाहून या बाईंचे ह्या थोर कार्याबद्दल त्यांचा गौरव करावा की त्यांच्या विलक्षण साधेपणाबद्दल त्यांस धन्य मानून त्यांस धन्यवाद द्यावा हे त्यास कळत नसे! इतके असून बाईना आपल्या थोरपणाची, आपल्या सामर्थ्याची, आपल्या कर्तृत्वाची, आपल्या कार्याच्या महतेची काहीही जाणीव नव्हती. गंगाधर पंत ख्रिस्ती होण्यापूर्वी ज्यावेळी रमाबाई मध्य प्रांतात दुष्काळातील मुले आणावयास जात त्यावेळी गंगाधर पंतांनी बोलताना एकदा म्हटले, “बाई, आपण पुढल्या पाच पिढ्याचे काम आज करून ठेवीत आहो.” बाईंनी ते ऐकून घेतले. इतर व्यवसायांच्या गडबडीत त्यावेळी उत्तर दिले नाही. परंतु पुढे एक पत्र लिहिताना त्यांनी त्यांस त्या प्रसंगाची आठवण दिली व म्हटले, “तुम्ही परवा म्हणाला की, आम्ही चार पाच मागल्या व पाच सहा पुढल्या पिढ्यांचे काम करून ठेवीत आहो. त्याचवेळेला मी तुम्हास माझ्या मनातला विचार सांगितला नाही ती मोठी चूक झाली ती आता सुधारून टाकते. मी काही केले नाही. देवाने शक्ती दिली व त्यानेच सर्व काही केले ते त्याचे गौरव व त्याची स्तुती मी घेऊ नये. मी किती दुर्बल ज्ञान होत आहे ते मला प्रतिक्षणी कळते. परंतु मला देवाने ते काम करावयास लावले आहे ते तो स्वतः करीत आहे.” बाईंनी १८९७ साली लिहिलेल्या पत्रातील जरी हा उतारा आहे तरी त्यांत वर्णिलेली वृत्तीच त्यांची अखेरपर्यंत कायम होती असा अनुभव आहे. दुसरा त्यांचा विशेष गुण म्हणजे त्यांचा परमेश्वरावरील जिवंत, जागृत विश्वास. ही संस्था देवाची आहे, देवाला तिची काळजी आहे अशा भावनेने त्यांनी काम केले. कोठारात धान्य नाही, पेटीत पैसा नाही, असे जर कोणी म्हटले तर त्यांनी असे म्हणावे की, “देवाच्या कोठारात धान्य नाही काय? देवाला आपली काळजी आहे ना? मग आम्ही व्यर्थ काळजी का करावी?” “आई, आपण येथे तर बायका बायका आहो, आसपास चोऱ्या होत आहेत, दंगे, धोक्याचा हा काळ आहे, काही गडबड येथे झाली तर आपले रक्षण कोण करील?” अशा प्रश्नाला रमाबाईंचे उत्तर ठरलेले असे. “देव सर्व समर्थ आहे, देव आपले रक्षण करीत आहे, त्याच्या मनात जर आपले रक्षण करावयाचे नसेल तर कितीही पहारेकरी आपण ठेविले तरी आपली कोण रक्षा करू शकेल? ”रमाबाईंचा प्रार्थनेवर उत्कट विश्वास असे. हिंदी व परकीय ख्रिस्ती लोकांविषयी नवयुगाच्या ज्या वाचकास कमी अधिक माहिती असेल त्यांस हे सांगणे न लगे की, हिंदी व परस्थ ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनेवर कितीही विश्वास असला तरी त्यांच्या प्रार्थना ठरलेल्या, मोजक्या शब्दांच्या, आखून व नेहमीच्या सरावांतील विचार व कल्पना असलेल्या अशा असतात. मंदिरातील उपासनेच्या वेळच्या पुष्कळशा प्रार्थना लिहिलेल्या अगर छापील असतात. त्यामुळे प्रार्थना करणाऱ्या जीवाला मोकळेपणा वाटत नाही. पंडिता रमाबाई ह्या स्वतंत्र विचाराच्या होत्या. त्या कोणत्याही चर्चला बांधलेल्या नव्हत्या, त्याचप्रमाणे ठराविक पद्धतीनेच प्रार्थना करणे त्यांस पसंत नसे. कोणी काही म्हणो, केशव चंद्रसेन, भांडारकर, रानडे इ. ब्राह्मो प्रार्थना समाजातील पुढीऱ्यांची प्रार्थनेची पद्धत त्यांनी उचललेली होती. रमाबाईंच्या व्यक्तिगत प्रार्थना होत असताना जवळ बसणे हाच मोठा अधिकार समजला जात असे. त्यांच्या प्रार्थनेत सर्व विषय येत, प्रचलित विषयांवरून सुचलेले विचार देवापुढे ठेवीत, सर्वांचे कल्याण त्यांनी इच्छावे, सर्वांना देवाच्या मार्गात आणण्याची त्यांनी याचना करावी अशा प्रकारे उदारपणे त्या प्रार्थना करीत असत. अमुक विषयासंबंधाने प्रार्थना करू नये, अमुक विषय प्रार्थनेस योग्य नाही असे त्यांस वाटत नसे. प्रार्थनेवर असा जिवंत जागृत विश्वास फार क्वचित आढळतो.  त्यांची शिस्त फार कडक होती. त्यांच्या ताब्यात कोणत्या प्रकारच्या मुली, बाया व मुले होती याचा चांगलासा विचार न करता ह्या कडक शिस्तीबद्दल काही ख्रिस्ती लोकही त्यांस दोष देतात हे आम्हांस माहित आहे. दोनपासून तीन हजार रानवट, अक्षरशत्रू माणसांना माणसाळवण्याचे काम कोणी केले आहे? त्या कामातल्या अडचणींचा अनुभव

अनुक्रमणिका

कोणास आहे? त्या वर्गातील मुलींचे वर्तन इतर मुलींच्या शिलास बट्टा लावण्यासारखे होऊ लागले. म्हणून थोडा अधिक कडकपणाचा अवलंब करावा लागला तर त्याबद्दल रमाबाईंना दोष देता येत नाही. त्यांची शिस्त जेवढी कडक होती तितकी त्यांची प्रेम करण्याची शक्ती अमूप होती. त्यांच्या अंतःकरणात अप्रेमाला, द्वेषाला, तिरस्काराला जागा नव्हती यांत काही संशय नाही.

अशी पंडिता रमाबाईंची योग्यता व गुण असत. ख्रिस्ती समाजाच्या दुर्दैवाने त्या समाजाला त्या पारख्या झाल्या होत्या असे जे आम्ही म्हटले आहे त्याचा अर्थ काय? पंडिता रमाबाई १८८३ साली सप्टेंबर महिन्यात ख्रिस्ती झाल्या. ता. ५ एप्रिल १९२२ रोजी त्यांची इहलोकीची यात्रा संपली म्हणजे जवळजवळ ४० वर्षे त्या ख्रिस्ती धर्मात होत्या. ४० वर्षे त्यांनी ख्रिस्ताची सेवा केली. असे असता किती ख्रिस्ती लोकांना त्यांच्याविषयी आपलेपणा वाटत असे? मुंबई शहरात त्यांच्या संबंधाने दोन दुःखवट्याच्या सभा झाल्या. पहिल्या सभेच्या वेळी केडगाव येथील काही सेविका व येथील एका ख्रिस्ती बोर्डिंगातील काही मुली व इतर स्त्रिया आल्या होत्या. परंतु मोठी मोठी ख्रिस्ती मंडळी आम्हाला दोन्ही सभात पुढारी म्हणून दिसली नाहीत. रमाबाईंचा ‘बाप्तिस्मा’ चर्च ऑफ इंग्लंडच्या पद्धतीने झालेला पण पहिल्या सभेच्या वेळी कॅनन जोशांसारखे चर्च ऑफ इंग्लंडचे अधिकारी हिंदी गृहस्थ हजर नव्हते! त्याचे कारण रमाबाईंची किंमत ख्रिस्ती समाजाला झाली नव्हती असे समजावयाचे काय? हिंदुस्थानामध्ये ख्रिस्ताचा धर्म जिवंतरूपाने दिसत नाही. येथे “चर्चानिटी” आहे. कोणत्याही चर्चशी बाईंनी निकट संबंध ठेविला नाही. बायबलविषयी त्यांना अत्यंत अभिमान असे, तो ग्रंथ प्रत्यक्ष देवाकडून प्राप्त झालेला असा त्यांचा विश्वास होता. तथापि बायबल सोसायटीने केलेले मराठी भाषांतर त्यांना पसंत पडले नाही म्हणून मूळ हिब्रू व ग्रीक भाषांतील बायबलाचा आधार घेऊन त्यांनी बहुत वर्षे फार परिश्रम करून नव्या कराराचे मराठी भाषांतर तयार केले व ते आपल्या खर्चाने प्रसिद्ध केले. एकंदर ख्रिस्ती समाजाशी त्यांचा निकट संबंध फार थोडा येत असे. त्याचप्रमाणे स्वतः पंडिताबाई व इतर मंडळी यांच्या एकंदर मनोरचनेतही फार फरक असे. त्यामुळे पंडिताबाई संबंधाने आपलेपणा फार थोड्यांना वाटत असावा असे तर नसेलना? असो. ख्रिस्ती का झाल्या? आता आम्हाला फक्त एका विशेष प्रश्नाची थोडीशी चर्चा करावयाची राहिली आहे. तो प्रश्न असा रमाबाई ख्रिस्ती का झाल्या? पूर्वाश्रमी त्यांना देवाची ओळख झालेली नव्हती काय? देवाचा आपल्याला आधार नाही, देव आपला मार्गदर्शक नाही, देवाची ओळख करून घेण्यास आपल्याला काही साधत नाही असे त्यांना वाटत होते काय? मग त्यांचा प्रिय बंधू श्रीनिवास शास्त्री मरणोन्मुख स्थितीमध्ये पडला असताना व अखेरीस परलोकस्थ झाला, त्यावेळी पंडिता रमाबाईंनी जे उद्गार काढले त्याची वाट काय?

(And indeed in my loneliness, it seemed as if God was near me. I felt His pressure.)

त्याचप्रमाणे केवळ १९ महिने विवाहित जीवनाचा लाभ झाल्यानंतर रमाबाईंचे यजमान बाब निपित बिहारी मेधावी हे वारण्याचा उपद्रव होऊन त्यास सोडून एकाएकी गेले व त्याजवर जणू काय आकाशाची कुऱ्हाडच कोसळली, त्यावेळी त्यांनी आपला अनुभव लिहून ठेविला आहे. तो आपण दृष्टिपुढे आणिला तर देवाची रमाबाईंना ओळख झालेली नव्हती असे होत नाही.

(This great grief drew me nearer to God. I felt that he was teaching me and that if I was to come to him, he must himself draw me.)

अनुक्रमणिका

म्हणजे संकटाच्या वेळी “जेथे जातो तेथे तू माझा सांगाती” हा त्यांना अनुभव येत होता. तो आपले रक्षण करीत आहे, तो आपल्याजवळ आपल्याला नेत आहे असा त्यांचा अनुभव होता. आपले रक्षण करीत आहे. तरीसुद्धा त्या ख्रिस्ती का झाल्या? रमाबाई १८८३ साली विलायतेस गेल्या व त्याच साली ख्रिस्ती धर्माची दीक्षा त्यांनी घेतली हे आमचे वाचक जाणत आहेतच. जाण्यापूर्वी त्यांच्या मनाची धर्माच्या बाबतीत मिस् हर्फर्ड व रेव्ह. गोरे ह्यांच्या शिकवणुकीने चलबिचल स्थिती झाली होती.

“I was hungry for something better than what the Hindu Shastras gave.”

अशी त्यांची चित्ताची स्थिती असताना ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणाऱ्या व ख्रिस्ताची सेवा म्हणून माणसांची सेवा करणाऱ्या स्वार्थत्यागी भगिनींच्या आखाड्यात त्या जाऊन राहिल्या. ख्रिस्ताच्या चारित्राच्या, ख्रिस्ताच्या बोधाचा, ख्रिस्ताच्या जीवनाचा ह्या बायांच्या जीवनावर झालेला परिणाम त्यांनी पाहिला. पतित, तिरस्कृत, कंगाल स्त्रियांवर प्रेम करून, त्यांच्या ठिकाणी पापांचा तिटकारा उत्पन्न करण्याचे त्या बायांचे सामर्थ्य त्यांनी पाहिले व त्या सामर्थ्याचा उगम जो पुरुष त्याच्या जीवनाकडे त्यांचे अधिक लक्ष लागले व त्या ख्रिस्ती झाल्या. पुढील उताऱ्यावरून ह्या व आणखीन काही गोष्टी स्पष्ट होतात.

“That it is a philosophy, teaching truths higher that I had ever known in all our scriptures; to see that it not only gives precepts, but perfect example; that it does not give us precepts and an example only, but assurance of Divine Trace by which we can follow that example.”

सारांश काय की बाई ख्रिस्ती झाल्या त्या मुख्यतः उत्तम उपदेश, उत्तम आज्ञा त्या उपदेशानुसार वर्तन ज्याचे तंतोतंत आहे असे एक चरित्र त्यास आढळून आले व त्या चरित्रांचा इतरांवर झालेला परिणाम त्यांनी पाहिला म्हणून ह्याबद्दल त्यांच्याशी आम्ही केव्हाही वाद घातला नाही. आर्य महिला समाजाने त्यांस जे मानपत्र सादर केले त्यात ह्या गोष्टींचा उल्लेखही नव्हता! उलट ज्यावर रमाबाईचा विश्वास नव्हता अशी वेद भाष्यांची पुस्तके त्यांना बक्षीस देण्यात आली! ते सर्व व्यर्थ होते. त्यावेळी व नंतर ख्रिस्ती धर्मासंबंधाने टीकपर ग्रंथ वाचणे त्यांस पसंत नसे, ख्रिस्ती धर्माविरुद्ध टीका असलेली पुस्तके त्या पहात नसत, ख्रिस्ती सिद्धान्ताचे स्पष्टिकरण ज्यात केले अशी पुस्तकेही त्या वाचीत नसत! फक्त बायबल, फक्त बायबलातील विचार, त्यांत सांगितलेला धर्म, त्यात केलेला उपदेश, सर्व काळांचे जीवन देणारा त्यास भासला व त्यांनी आपले सर्व जीवन ख्रिस्ताच्या पायी वाहिले व ख्रिस्ताची सेवा मरेपर्यन्त केली.

**उपसंहार**

रमाबाईंच्या चरित्राचा विचार येथे संपला! रमाबाईंचे चरित्र आम्हांला ज्या अनेक गोष्टी शिकवित आहेत तिकडे आमचे लक्ष गेले पाहिजे. रमाबाईंनी जे दयेचे काम केले तशा तऱ्हेचे काम करावयास हिंदू समाजात पुष्कळ वाव आज आहे. पतित म्हणून समजलेल्या स्त्रियांचा उद्धार करणे रमाबाईंना शक्य झाले त्याचप्रमाणे ख्रिस्ती नसणाऱ्या बाईस तं शक्य नाही असे नाही. परमेश्वराच्या प्रेमाचा अनुभव प्रत्येक व्यक्तीस येतो. त्या प्रेमाचा लाभ घेऊन त्याचा वर्षाव इतरांवर करावयाचा तर प्रथमतः स्वार्थापरता, अहंभाव, आत्मश्लाघा, आत्मप्रौढी यांचा नाश झाला पाहिजे. देवाचे कार्य करावयास पुष्कळ स्वार्थत्यागी भगिनीस पुष्कळ अवसर आहे. रमाबाईनी आपल्या करारीवाण्याने इतरांच्या ठिकाणी दरारा उत्पन्न केला. बाईंनी आपल्या साधेपणाने सर्वांस थक्क केले. पंडिता रमाबाईंनी आपल्या धर्मशील वृत्तीने इतरांस धर्मशील केले,

अनुक्रमणिका

रमाबाईंनी आपल्या स्वतंत्र विचारांनी इतरांस पारतंत्र्याच्या, दासाच्या बिड्या तोडावयास लाविले! परमेश्वराने त्यांच्या सामर्थ्याच्या, त्यांच्या चारित्र्याच्या स्त्रिया ह्या देशात उत्पन्न करून तिरस्कृत, पतित, अज्ञ स्त्रियांचा उद्धार करावयास त्यांस समर्थ करावे एवढी ह्या दुबळ्या सेवकाची प्रार्थना आहे.

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

* * * *

अनुक्रमणिका